
# केशवसुतांचे अंतरंग

व. दि. कुलकर्णी



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# केशवसुतांचे अंतरंग

व. दि. कुलकर्णी

- **पुस्तकाचे नाव :** केशवसुतांचे अंतरंग
- **लेखक :** व. दि. कुलकर्णी
- **प्रथमावृत्ती :** १९७३
- **प्रथमावृत्तीचे प्रकाशक :** नितीन प्रकाशन,
  ११८२, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
- **पुनर्मुद्रण :** २०२२
- **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५५९९-००-१

**प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

- **© प्रकाशकाधीन :**

- **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

- **किंमत :** रुपये ४४.००

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

थोर समीक्षक डॉ. व. दि. कुलकर्णी लिखित ' केशवसुतांचे अंतरंग ' या पुस्तकाचे पुनर्मुद्रण करून मराठी रसिक वाचकांना उपलब्ध करून देतांना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला आनंद वाटतो आहे. सदर पुस्तकाची प्रथमावृत्ती १९७३ या वर्षी प्रकाशित झालेली होती. दुर्मिळ झालेल्या या छोटेखानी परंतु गुणवत्तापूर्ण ग्रंथातून डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी आधुनिक मराठी कवितेचे प्रवर्तक कवि कुलगुरु केशवसुत यांचे आणि त्यांच्या कवितांचे अंतरंग समीक्षकाच्या निकोप दृष्टीने उलगडून दाखविलेले आहे. म्हणूनच मराठी अभ्यासकांसाठी आणि रसिक वाचकांसाठी ' केशवसुतांचे अंतरंग ' हा ग्रंथ उपलब्ध करून देणे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला अगत्याचे वाटले.

(डॉ. सदानंद मोरे)

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

माझे वडील कै. मामासाहेब

आणि

वडील बंधू कै. उद्धवराव

यांच्या पुण्यस्मृतीस...

'सत्त्वपूर्ण ज्याची वृत्ति,

त्याची दैवते जागती'

हे केशवसुतांचे वचन आपल्या रूपाने मी साक्षात अनुभविले !

## अनुक्रमणिका


प्रास्ताविक / ( ९ )

१. कवी ! नव्हे, अपरब्रह्मा !! / १

२. स्वर्भू-मीलन : केशवसुतांचे एक 'मिथ्' / ९

३. केशवसुत : कवींच्या अस्मितेचा महोद्रेक ! / १६

४. केशवसुतांची इंग्रजी कविता / १९

५. केशवसुतांचा भृंगधर्म / ३९

६. कवीस सोडा कवितेबरोबरी / ४९

७. केशवसुत आणि दीर्घ कविता / ५५

८. केशवसुत-संप्रदाय : एक वदतोव्याघात ! / ६७

परिशिष्ट -

१. केशवसुतांचे भृंगप्रेम / ७७

२. केशवसुतांची जुन्या वळणाची कविता / ७९

## प्रास्ताविक

'The true poem is the poet's mind.'

- Emerson

१९५५ साली केशवसुतांची पन्नासावी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. त्या वेळी प्रा. दि. के. बेडेकर यांचा 'केशवसुतांची 'स्वर्गसमक्षते'ची कल्पना' हा लेख 'नवभारत' मासिकात प्रकाशित झाला (डिसेंबर १९५५). त्या लेखाने केशवसुतांच्या कवितेकडे पाहण्याची माझी दृष्टी अधिक स्पष्ट झाली. स्वाभिमानी, स्वावलंबी, सदाचारी, उद्यमशील आणि कर्तव्यकठोर अशा केशवसुतांचे हृदय कसल्यातरी दुःखाने जड झाल्याचे जाणवू लागले. पुरुषार्थाची ओजस्वी गीते गाणाऱ्या आणि लौकिकात नेटकेपणाने वावरणाऱ्या या कवीच्या मनाला कशाचा तरी ध्यास लागला होता, कुठल्या तरी दुर्दम्य वेडाने ते पछाडले होते, असे सारखे वाटत चालले. 'हा ध्यास कशाचा? हे वेड कोणते? ते कधीतरी सुटणार आहे काय? सुटणारे असेल तर केव्हा आणि कसे? ह्या वेडाची-ध्यासाची-फलश्रुती काय?...' असे अनेक प्रश्न माझ्या मनात उभे राहू लागले; आणि त्यांची अनेक उत्तरे त्या त्या भावक्षणी मला मिळू लागली. 'झपूर्झा, 'हरपले श्रेय' यांसारख्या भाववृत्ती चित्रित करू पाहणाऱ्या कविता वेगवेगळ्या अर्थाने प्रतीत होऊ लागल्या; आणि हे सारे अर्थ एकजिनसीपणाने कवी केशवसुतांच्या अंतरंगदर्शनाचे एकेक पदर हलकेच उलगडण्यास सहायक ठरू लागले. फेब्रुवारी १९५६ च्या 'नवभारत'मध्ये मी

माझ्या ह्या भावप्रतिक्रिया लेखरूपाने प्रकाशित केल्या.

केशवसुतांची कविता ही हरपल्या श्रेयाच्या शोधात, झपूर्झा घालीत, रानावनात, दूर विजनात, हिंडणारी कविता आहे.'माणूस' तिला आवडतो; 'माणसे' मात्र बिलकूल आवडत नाहीत. केशवसुत या पृथ्वीवर जिवाहून जास्त माया करतात, ती सुंदर आणि श्रीमंत व्हावी, ह्याचा त्यांना ध्यासच आहे. त्यांच्या मनातला महामानव-महाकवी ह्या गरीब पृथ्वीला तिचे मूळ लावण्य, तिचे मूळ तेज, तिचे वैभव, तिचे सौभाग्य प्राप्त करून देईल, अशी प्रबळ आशा केशवसुत मनी बाळगून असल्याचे दिसते. स्व-र्भू-मीलनाचे एक सुंदर, अद्‌भुत myth च त्यांनी निर्माण केले आहे. पृथ्वी आणि स्वर्ग ही जणू सदेह होऊन त्यांच्या कवितासृष्टीत अवतरतात. केशवसुतांची कविता ही स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या मुग्ध, विद्ध प्रेमभावनेची करुण कहाणी आहे, असा सारखा प्रत्यय येत राहतो आणि केशवसुत हे आपल्या पृथ्वीमातेच्या अंतरीच्या वेदनेने कासावीस होणाऱ्या प्रौढ पुत्राप्रमाणे अगतिक, दुःखीकष्टी झालेले दिसतात.

केशवसुतांच्या 'तुतारी, 'गोफण' इत्यादी कविता प्रतिक्रियात्मक आहेत; त्यामुळे त्यांतील भावनावेग उद्दाम, आक्रमक पण परिस्थितीसापेक्ष आहे.केशवसुतांच्या या कवितांमध्ये युगपुरुषाची क्रांति-वाणी तेजस्वितेने उमटली आहे. हे सारे खरे, पण केशवसुतांच्या अंतरंगाचे स्थल-काल- परिस्थिति-निरपेक्ष असे मूळ रूप पाह्यचे असेल तर आपणास 'भृंग', 'म्हातारी' यासारख्या आत्ममग्न कवितांकडेच वळावे लागेल. 'झपूर्झा', 'हरपले श्रेय' या कविता ह्या मूळ रूपाचीच परिणत अवस्थेतील भावचित्रे होत. स्वकालसंदर्भापलीकडील, त्रिकालसापेक्ष, सनातन, अशा मूलभूत दुःखाशी भिडणाऱ्या कविता मला अधिक खोल वाटतात. सामाजिक अन्यायापेक्षा माणूस म्हणून घेतानाच, अपरिहार्यपणे जे अनिवार्य पाश आणि शाप घेऊन माणसाला या जगात यावे लागते, त्यांतून मुक्त होण्याचा प्रयत्न आदिमानवापासून साधु-संतांपासून ते आजच्या जातिवंत कवि-कलावंतापर्यंत सतत चालू आहे. केशवसुतांच्या अंतरंगात या चिरंतन दुःखाने घर केले आहे.

१९६६ साली कवी केशवसुतांच्या जन्मशताब्दीचा समारोह महाराष्ट्रभर आणि बाहेरही, फार मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात आला.या वेळी वेगवेगळ्या सभांतून, परिसंवाद-चर्चासत्रांतून मी 'मला जाणवलेले केशवसुत' रसिकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केला; नियतकालिकांतून लेखनही केले.आज ते सर्व 'केशवसुतांचे अंतरंग' या नावाने येथे प्रकाशित होत आहे. 'वाग्देवीसुत' या विशेष मानवकोटीचे केशवसुतांनी गायिलेले माहात्म्य; केशवसुतांना या पृथ्वीवर भासमान होणारी स्वर्गरूपे; समकालीनांच्याहून त्यांना स्वतःला वेगळी जाणवणारी आपली कविवृत्ती; इंग्रजी रोमँटिक कविप्रकृतीशी त्यांचे असणारे साधर्म्य; त्यांच्या स्वतःच्या इंग्रजी गीतातून व्यक्त होणारी अस्सल रोमँटिक प्रवृत्ती; त्यांचा

भृंगधर्म; कवी आणि त्याची कविता यांतील स्वाभाविक सामरस्य; महाकाव्याचे त्यांना वाटणारे आकर्षण आणि त्यांच्या नावाने ओळखला जाणारा संप्रदाय यांतून या अंतरंगाच्या वाटा मला मोकळ्या होत गेल्या. हे सारे लेख यामुळेच पृथक् नसून एकसूत्रात्मकच आहेत. प्रसंगोपात्त त्यातून थोडीफार पुनरुक्ती झाली आहे; वाचकांनी ह्याची क्षमा करावी.

केशवसुतांच्या समग्र कवितेचा हा चिकित्सक अभ्यास नव्हे.कवी केशवसुतांचे अंतरंग जाणून घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या भावबंधातील सूक्ष्म, मनोरम छटांचे कितीतरी विविध संदर्भ केशवसुतांच्या कवितांत प्रारंभापासून अखेरीपर्यंत आलेले दिसतात. त्यांची सूची देण्याचा मोह मी मुद्दाम टाळला आहे. येथील लेखनाला 'निबंध-रीती' पेक्षा 'भाषण-पद्धती'चेच रूप आल्याचे वाचकांना जाणवेल. (केशवसुतांची इंग्रजी कविता आणि त्यांची दीर्घ कविता यावरील लेख याला अपवाद ठरतील.)

केशवसुतांच्या विशिष्ट परिभाषेचा अभ्यासही येथे समाविष्ट करावा असे वाटले होते. उदाहरणार्थ 'आत्माराम-अक्का', 'हृदय-आत्मा', 'क्लृप्ति-कल्पकता-प्रतिभा', 'मी-आम्ही' इत्यादी संज्ञांचा केशवसुतांना अभिप्रेत असलेला अर्थपरीघ दृष्टिगोचर होणे अगत्याचे आहे.यास धरूनच केशवसुतांच्या शब्दकलेचा, त्यांच्या अभिव्यक्ती रीतींचा, आणि कलात्मक व्यक्तित्वाचा शोध घेणे आवश्यक ठरणारे आहे.पण हे सारे इतके मोठे आणि महत्त्वाचे आहे की, ते स्वतंत्रपणे करणेच अधिक योग्य ठरेल.

मराठी काव्यरसिकांना केशवसुतांचे हे अंतरंग कितपत भावते ते मी काय सांगू? काव्य-कला-प्रांतात अखेर रसिकांची अंतःप्रतीतीच प्रमाण होय.

माझे मित्र प्रा.गंगाधर पाटील यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या.त्यांचा मी आभारी आहे.'नितीन प्रकाशन'चे श्री.वसंतराव गोगटे यांनी प्रकाशनाचे श्रम मोठ्या प्रेमाने सोसले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

**व. दि. कुलकर्णी**
मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ
मुंबई ३२

## १. कवी ! नव्हे, अपरब्रह्मा !!

पंधरा, सोळा आणि सतरा मार्च, १९६६ रोजी 'मालगुंड' या केशवसुतांच्या जन्मग्रामी, तेथील सर्व ग्रामस्थांनी अतिशय मनोभावे केशवसुतांची जन्मशताब्दी साजरी केली. या महोत्सवाची समाप्ती शाहीर अमर शेख यांनी केलेल्या 'कवींचे कवी केशवसुत' या प्रदीर्घ जयजयकाराने झाली.'हे तात, कृष्ण, केशवा!' अशी सादच त्यांनी घातली. हजारोंनी जमलेले मालगुंड-पंचक्रोशीतील ग्रामस्थ सतरा मार्चच्या उत्तररात्री आपापल्या गावी-घरी परतले ते काना-मनात हा केशवसुतांचा जयनाद घेऊनच !

केशवसुतांना आपण 'कवींचे कवी' व्हावे अशी आकांक्षा होती का ? मला तसे वाटत नाही.असे काही त्यांच्या स्वप्नीही नसावे. पण आपण 'कवी' व्हावे; अगदी खऱ्या अर्थाने पूर्णपणे आपण 'कविधर्म' आचरावा, असे मात्र त्यांना मनोमन वाटत असावे; नव्हे ! वाटत होते.'खरा कवी होणे' हीच त्यांच्या लेखी जीवनाची परमोच्च फलश्रुती होती. आपण 'वाग्देवीसुत' आहोत याचा त्यांना खराखुरा अभिमान होता.

**'वाग्देवीसुत जन्मला**
**अपुलिया ग्रामात, यालागुनी**
**जै जै  कार करा, सुरां परिसवा**
**हा मंगलाचा ध्वनी'**

'नैऋत्येकडला वारा' या बव्हंशी आत्मवृत्तपर कवितेत त्यांचा हा सात्विक स्वाभिमान अशा निर्मळपणे, वाच्यार्थरुपात प्रकट झाला आहे. केशवसुतांची जन्मशताब्दी साजरी करणे, म्हणजे देवांना, दानवांना आणि मानवांना हा कविमाहात्म्याचा ध्वनी ऐकविणे होय ! कारण या पृथ्वीवर केशवसुतांना महनीयाहून महनीय, स्पृहणीयाहून स्पृहणीय आणि श्रेष्ठतमाहूनही श्रेष्ठतम जे काही वाटते ते म्हणजे 'वाग्देवीसुत' हे बिरुद होय; अन्य काहीही नाही ![१]

---

[१] केशवसुतांची 'To A Poet' ही कविता पाहावी. पृष्ठ ३१.

केशवसुतांची समग्र कविता माझ्या अंतःकरणात एक उदासरम्य भावकथाच उभी करीत जाते. ही भावकथा आहे स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या प्रेमाची; त्यांच्या जुळलेल्या आणि तुटलेल्या जीवित धाग्यांची! कोणे एके काळी, म्हणजे मनुष्य जन्मालाही आला नव्हता तेव्हा, स्वर्ग पृथ्वीपासून फार दूर नव्हता.आपल्या प्रसन्न दृष्टीने तो तिला सदैव सुखवीत होता.पृथ्वीचेही त्याच्यावर मन जडले होते. तिने आपल्या अंगाच्या मळीपासून मानव निर्माण केला; इच्छा ही की, त्याने गाणे गाऊन स्वर्गाला आळवावे; मोहून टाकावे आणि अखेरीस स्वर्गाने खाली येऊन पृथ्वीजवळ मोठ्या प्रेमाने कायमचे राहावे! पण या दुष्ट मानवाने पृथ्वीमातेस लाथाडून स्वतःच स्वर्गावर जाण्याचे योजिले.मानवाची ही कृतघ्नता पाहून स्वर्ग कोपला आणि आवेगात दूरवर आकाशी जाऊन बसला.तेव्हापासून ही पृथ्वी झुरत आहे.सर्व मानवांचे प्रतिनिधित्व स्वीकारून, मोठ्या पश्चात्तापाने केशवसुतांचे कविमन स्वर्ग आणि पृथ्वी यांची क्षमायाचना करीत आहे.

**''... माते ! चुकी जाहली !**
**स्वर्गा ! तूहि अम्हा क्षमस्व सदया ! –ये खालता भूतली–**
**ये बा ! आणिक या धरेस अगदी देऊ नको अंतर ! –**
**आहे तूजवरि तसेच बसले स्वर्गा ! तिचे अंतर''**

मानवाचा जो दुष्ट आणि असात्त्विक संपर्क पृथ्वीला घडला तो तिच्या आड सतत येत राहिला आहे.कृतघ्न आणि स्वार्थी मानवाच्या संपर्काने तिचे रंगरूपच कलुषित झाले आहे. कवी हाच ह्या पृथ्वीला आपले स्वतःचे मूळ विशुद्ध रूप पुन्हा प्राप्त करून देऊ शकेल आणि स्वर्भू-मीलन घडवू शकेल, ही केशवसुतांची अढळ श्रद्धा आहे.केशवसुतांची कविता ही स्वर्ग, पृथ्वी, मानव आणि कवी यांच्या भावबंधाची मूळ लय पकडू पाहते.स्वर्ग-पृथ्वीच्या या myth मध्ये कवीची भूमिका असामान्य आहे. सौंदर्यावर चढलेली मलिनतेची, स्वार्थवृत्तीची पुटे त्याला पुसायची आहेत; मूळ सौंदर्याचा विलास घडवायचा आहे; नवसौंदर्याचे सर्जन करायचे आहे आणि पृथ्वीला अंती सुरलोकसाम्य मिळवून द्यायचे आहे ! कवी हा या भावविश्वातील अपरब्रह्माच आहे; तो स्वर्गस्त्रष्टाच आहे.त्याचे सर्जन निर्मम वृत्तीचे आहे; या निर्ममतेतच त्याचे खरे सामर्थ्य आहे; त्याच्या हेतूची मंगलता आहे.

महाकवी हा या पृथ्वीचा पुत्र नाही; तर तो म्हणजे दुसऱ्या एखाद्या श्रेष्ठ ग्रहावरून चुकून या पृथ्वीवर उतरलेले तेजस्तत्त्वच होय ! ज्या धरणीवरून हा कवी चालतो तेथील धूली 'कनकिता' होते; त्याचे गंभीर स्वर ऐकताच मुक्या पृथ्वीला लक्षसंख्य श्रुती फुटल्याचा दिव्यानुभव येतो; त्याने वर दृष्टी फिरविताच आकाश खाली लवते; त्याच्या स्फूर्तिक्षणी साऱ्या सुंदर वस्तू त्याच्यापुढे येऊन उभ्या ठाकतात; त्याच्या श्वासोच्छ्वासाने अनिष्टाचा नाश आणि इष्टाचे पोषण होते. कवीचा या पृथ्वीवर जर मुक्काम असेल तर प्रत्यक्ष देव विहार करण्यासाठी या भूमीवर येतात आणि तो जर निघून गेला असेल तर त्याला शोधण्यासाठी घाईघाईने स्वर्ग खाली पृथ्वीवर उतरतो.

या मृण्मय पृथ्वीला हिरण्मय करण्याची किमया फक्त या कविप्रतिभेच्या ठायीच आहे; त्याच्याचमुळे तिला देवांचा आणि स्वर्गाचा सहवास लाभणार आहे. कवी म्हणजे या मलिन पृथ्वीला निर्मळ आणि अक्षय सुंदर करणारी दैवी शक्तीच होय! या वृद्ध वसुंधरेच्या अंगी तारुण्य ओथंबून टाकण्याची जादू या कविकरांमध्ये आहे. रवि-शशीची सुरम्य किरणे, इंद्रचापाचा रंगपट, मोहक मेघच्छटा, कुटिल विद्युत्, लाटांचे गर्जित, पर्जन्याचे संगीत, पक्ष्यांचे कूजित, उल्कांचे पतन, ग्रहगोलांचे भ्रमण, या साऱ्या दिव्य तेजांचे, रंगांचे, ध्वनींचे आणि गतीचे भव्य आणि सुंदर वस्त्र विणून कविकल्पकता पृथ्वीला ते परिधान करावयास लावते. हे वस्त्र परिधान करताच पृथ्वी तारुण्याने झळंबून जाते आणि 'आता स्वर्ग मला स्वयेच वरण्या येईल!' असे हर्षातिरेकाने गाते, नाचू लागते.

कविप्रतिभेत पृथ्वीचा कायाकल्प करण्याचे जसे सामर्थ्य आहे, तसेच तिचा मनःकल्प करण्याचेही सामर्थ्य आहे.प्रतिभा ही अति-अद्‌भुत गूढ शक्ती आहे. ती संचारली की तो पुरुष मुक्तात्म होतो.त्याच्या अंगी दैत्याचे बळ प्रादुर्भूत होते आणि अंतर्यामी देवसत्त्व चढत जाते. पिंडी ब्रह्मांडाचा विलोप होतो आणि त्याच्या मुखातून प्रकटणारे शब्दब्रह्म ऐकून ब्रह्म्यालाही 'नवीन-रचना-कार्यक्रमी' क्षमता लाभते. ब्रह्मदेवाच्या सृष्टीपेक्षा कविसृष्टी ही स्वतंत्र आणि अधिक सुंदर असते, ती 'अनन्यपरतंत्र' असते, ती या अर्थाने ! ती ब्रह्म्यालाही नवी सुंदरतर दृष्टी देते !

या कविसृष्टीपुढे गद्य जग तुच्छ वाटू लागते.'खा, पी, नीज, तसा उठुनि फिरुनी ते तेच चिंतीत' आपल्या ठरीव आवर्तात हळूहळू रांगणाऱ्या जगाचे आणि कवीचे गणित जुळत नाही.रानात एकटेपणाने हिंडणारा कवी जगाला अडाणी वाटतो. झऱ्याकडे टक लावून पाहणारा हा कविजीव म्हणजे वेडा, मंदबुद्धीचा अशीच जगाची भावना होते.ह्या वेडेपणातले शहाणपण व्यवहारी स्थूल दृष्टीला कधीच आकलन होत नाही. जगाच्या वर्दळीत हे कवी

एखाद्या विचित्र पुतळ्यासारखे वाटतात. '''पुष्पे वनात कसली खुडितो फिरोन?' असा प्रश्न मला करू नका'', असे केशवसुत उद्योगमग्न जनांना सांगतात; कारण जगाच्या चर्मचक्षूंना दिसणारी सृष्टी आणि कविदृष्टीला प्रतीत होणारी सृष्टी, आपाततः एकच असल्या तरी तत्त्वतः त्या अगदी भिन्न असतात. कवी जेव्हा वनातले नक्षत्रासारखे फूल हातात घेऊन घरी आणतो, तेव्हा ते फूल, हे नित्याचे साधे फूल राहिलेले नसते, तर ते 'सत्क्लृप्तिपूरित' झालेले असते : म्हणजे चांगल्या कल्पनांनी भारलेले-भरलेले असते.

**पुष्पामध्ये प्रकट होय न जे जराही**
**सृष्टीत एकहि रहस्य असे न काही;**
**ज्याचा ध्वनी न उमटे खग-कूजितात**
**नाही निगूढ इतिहास असा जगात !**

केशवसुतांना प्रिय असलेली ओढे-वनराजी, किंवा पुष्प-पतंग-स्थिती म्हणजे काय हे स्वार्थपरायण, उपयुक्ततावादी, स्थूल गद्यवृत्तीला समजणे नुसते कठीण असते, असे नाही; तर तिला ते समजून घेण्याचीही गरज वाटत नाही; उलट तिला हा साराच वेडगळपणाचा प्रकार वाटतो.

या गद्यग्रथित जगाची दुःखद जाणीव केशवसुतांना सतत तीव्रतेने होत होती; आणि या गद्यतेविरुद्ध ते सारखे फिर्याद करीत होते. जगाची बहिर्दृष्टी आणि स्वतःची अंतःसृष्टी यांतील विरोध त्यांना अस्वस्थ करीत असे. माणसांचे जग त्यांना अप्रिय होई. त्यामुळे ते कधी विजनात जात; एकटेच वेडेवाकडे वाद्य वाजवीत नदीतीरावर बसत.कधी 'आम्ही कोण? म्हणूनि काय पुससी?' असा चक्क एकवचनात खडा सवाल टाकीत, आणि 'ते आम्हीच शरण्य मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभते!' असा त्याचा रोखठोक जबाबही देत; तर कधी, गाणे ऐकण्यासाठी एके काळी कवीपुढे जेथे राजेश वाकत, तेथे कवीला मान तर जावोच, पण त्याची अपेक्षाही केली जात नाही, हे पाहून त्यांच्या मनाला सर्पदंशाच्या प्राणांतिक वेदना होत, आणि

**द्या उत्तेजन हो कवीस,**
**न करा गाणे तयाचे मुके,**
**गाण्याने श्रम वाटतात हलके,**
**हेही नसे थोडके !**

असे पडत्या मनाचे बोल ते काढीत. 'कविता अशी असावी आणि तशी नसावी' असे सांगणाऱ्या जुन्यापुराण्या टीकाकाराला ठणकावणारे केशवसुत, तसेच काव्य करून ते जनात आणण्यापेक्षा मनात गुंगत दंग होणे, हाच काव्याचा सुंदर हेतू आहे, असे प्रतिपादणारे केशवसुत-जेव्हा महत्प्रयासाने, खडतर तपश्चर्येने पृथ्वीवर आणलेल्या प्रतिभेच्या 'दिव्य ठिणगी'चा लोक धिक्कार करताना पाहत, तेव्हा ते तीव्र विषादाने घेरले जात. गद्यग्रथित जगाला काडीवजा लेखल्याने, त्याने जो शाप दिला, त्यामुळे भडकलेल्या चिंताग्नीने केशवसुतांची 'हृदयहरितता' कधी कधी पार नष्ट होई.

पृथ्वीवरचा सामान्य पोटभरू, सत्तालोलुप, स्वार्थी मानव आणि दिव्यतेचा, उदात्ततेचा विश्वसौंदर्यरहस्याचा ध्यास लागलेला केशवसुतांमधील कवी यांचे कधीच जमले नाही, जमणे शक्य नव्हते. ही जीवाची ओढाताण, ही तगमग-तडफड, त्यांच्या कवितेत स्पष्ट दिसते.केशवसुतांची भाषा कधी धिक्काराची असते, तर कधी बेफाम उपेक्षेची असते; कधी तीमध्ये अनावर त्वेष असतो तर कधी उद्वेग, विषाद, खिन्नता असते; क्वचित आर्जवही असते.

केशवसुतांच्या कल्पनेतील जो आदर्शरूप महाकवी आहे, तो या साऱ्या विकारांपासून मुक्त आहे, त्या पलीकडे तो गेलेला आहे.त्याची दृष्टी दिक्कालांतून आरपार पाहू शकते, त्याचा पाणिस्पर्श वस्तूला सौंदर्यातिशय देऊ शकतो-त्याच्यापुढे या व्यवहारी मानवाचे सारे बडिवार फिके पडतात-केशवसुत या आदर्श महाकवीचे मनोरूप पाहू शकतात. त्यांना स्वतः त्या पदापर्यंत चढता येत नाही; त्या मूळ, अविकृत, अतिविशुद्ध परमश्रेष्ठ आदर्श कवीरूपाची ओढ लागलेले केशवसुत आणि पार्थिवतेला पंचमहाभूतात्मक देहधर्माने जखडलेले केशवसुत, यांचा करुणोदात्त संगर हा केशवसुतांच्या कवितेतील काव्यदृष्ट्या परमरमणीय असा भाग आहे. ह्या संघर्षाचे अंतिम रूप पाहायचे असेल तर ते 'हरपले श्रेय' मध्ये सुंदर रित्या उमटलेले आहे, तेथे पाहावे.

**किरण झरोक्यातून पडे,**
**अणूंसवे त्यातून उडे,**
**परोक्ष विषयी मन माझे**
**विसरुनिया अवघी काजे;**
**हयगय त्यांची मज जाची**
**परि न मला पर्वा त्याची ।**

**वेडी होउन**
**बसल्ये अनुदिन**
**एकच घेउन –**
**मज माझे लाभेल कसे ?**
**न परि हरपले ते गवसे !**

कविमनातल्या अलौकिक, उदात्त, निःस्वार्थ, निर्मळ अशा स्वर्गरूपाची, स्वर्गसौंदर्याची काही साक्ष त्यांना विजनात, ओढे-वनराजीमध्ये पटते. पण ही साक्ष, हा साक्षात्कार तरी खरा आणि पुरा असतो का ? हे परम श्रेय स्वभास दाखवून झटदिशी लोपून जाते.दर्शन तर दूरच, पण दर्शनाभासालाही मुकलेला कविजीव मग हाका मारीत राहतो; लौकिकातून उठतो.

**भीडभाड माझी फिटली,**
**जग म्हणते की, 'ही उठली !'**
**जनमर्यादा धरुनि कसे**
**अमर्याद ते मज गवसे ?**
**एक शब्द बोलेन जरी**
**सकलां कुण्ठित करिन तरी !**
**अशी आगळी**
**परी बावळी**
**आहे दुबळी**
**का की त्याविण सुचत नसे !**
**न परि हरवले ते गवसे**

पृथ्वीला सुरलोकसाम्य देण्यास समर्थ असणाऱ्या महाकवीच्या आदर्शरूपाची भव्य, अलौकिक, मानसचित्रे चितारणाऱ्या केशवसुतांची, या पृथिवीपुत्र कविमनाची ही अवस्था, म्हणजे त्याच्या ह्या दिव्य स्वप्नादर्शाच्या मार्गावरील प्रवासातील त्यांनी स्वतः गाठलेला अंतिम टप्पा होय ! हर्षखेद, हास्य-अश्रू, प्रकाश-तिमिर या द्वंद्वांतून बाहेर पडता पडता त्यात अडकून पडलेले कवी केशवसुत, महात्म्यांनाच सहजसाध्य अशा द्वंद्वातीत 'झपूर्झा अवस्थेची' अनुभूती घेता घेता तिला हरवून बसतात ! केशवसुत म्हणजे लौकिक-अलौकिकाच्या वाटेवरील उदात्तरमणीय दुःखांचे सूर आळविणारे पहिले अर्वाचीन कवी होत!

केशवसुतांच्या कवितेने 'स्वर्ग' आणि 'पृथ्वी' यांना नवे अर्थ, नवे संकेत प्राप्त करून दिले. 'कल्पकता' या कवितेच्या प्रारंभी आलेल्या गद्यटीपेत केशवसुत म्हणतात, ''सर्व जग आपल्या आहारनिद्रादी ठरीव व्यवसायात निमग्न असता देवी कल्पकता ही एकांतात बसून भारत-रामायणासारखी काव्ये लिहिते, शाकुंतल-हॅम्लेट यांसारखी नाटके रचिते, गुरुत्वाकर्षणासारखे गहन शास्त्रीय सिद्धांत सुचविते आणि एडिसनच्या फोनोग्राफसारखी यंत्रे तयार करते. तेणेकरून नवीन आयुःक्रम पृथ्वीवर सुरू होतो, आणि स्वर्ग पृथ्वीला जवळ होतो.'' 'देवी कल्पकते'चे स्तवन करणारे केशवसुत स्वर्गनिर्मितीच्या कार्यात कलाक्षेत्रातील आणि विज्ञानक्षेत्रातील 'कल्पकता'जातितः भिन्न आणि परस्परविरोधी मानीत नाहीत. ही गरीब धरा श्रीमंत व्हावी, अंतर्बाह्य समृद्ध व्हावी, ह्याचा केशवसुतांना ध्यास लागलेला आहे. महाभारत-रामायण यांसारख्या आद्य आर्ष महाकाव्यात चित्रिलेल्या विराट जीवनदर्शनातून स्फुरणारे उदात्त तत्त्वज्ञान आणि आदर्श मानवधर्म, व शाकुंतल-हॅम्लेट यांसारख्या विदग्ध ललितकृतींतून उमलणारे अलौकिक भावनाविश्व, या दोन्हींना अविरोधी आणि पोषक अशा भूमिकेत जेव्हा भौतिक शास्त्र विकास पावते तेव्हा पृथ्वी आतून-बाहेरून ऐश्वर्यसंपन्न होते... तीच स्वर्गरूप होते. केशवसुतांची कल्पनाशक्ती ही कवीची- कलावंताची-असल्याने त्यांनी प्राधान्याने कविमाहात्म्याचीच स्तोत्रे गायलेली आहेत, इतकेच !

स्वर्गावतरणाच्या गूढानुभूतीचे एक रम्य भासचित्र 'सतारीचे बोल' या कवितेत उमटवून गेले आहे. सतारीतून जेव्हा उदात्ततेचे पोषक सुस्वर निघू लागले तेव्हा

**' तो मज गमले विभूति माझी**
**स्फुरत पसरली विश्वामाजी;**
**दिक्कालांसही अतीत झालो;**
**उगमी विलयी अनन्त उरलो;**
**विसरुनि गेलो अखिला भेदां '**

अशी अनुभूती कविमनाला येऊ लागली; आणि पुढे तर जेव्हा सतारीतून 'प्रेमरसा'चे बोल उमटू लागले, तेव्हा कवी केशवसुतांना

**'स्वर्ग धरेला चुंबायाला**
**खाली लवला-मजला गमला'**

असा दिव्य भास झाला.पृथ्वीवर होणारे हे स्वर्गावतरण म्हणजे भेदातीत, विश्वव्यापक प्रेम-रसाचेच अवतरण होय.

पण हे असे दिव्य भास पकडून ठेवता येत नाहीत, ते क्षणात अन्तर्धान पावतात; आणि पृथ्वी पुन्हा कंगाल आणि करंटी दिसू लागते. केशवसुतांची कविता म्हणजे ह्या पृथ्वीसतीच्या 'हरपल्या श्रेया'चे करुणोदात्त गीत आहे! पृथ्वीसतीला आपले 'हरपले श्रेय' सापडावे आणि 'सत्त्वा'च्या उदयातून 'शान्ती'चे साम्राज्य स्थापिले जावे, ही कविमनीषा आहे. जीवनसतारीची अंतिम गत 'शांत' असावी असेच केशवसुतांना वाटते!

**'शान्त वाजली गती शेवटी**
**शान्त धरित्री, शान्त निशा ती,**
**शान्तच वारे, शान्तच तारे,**
**शान्तच हृदयी झाले सारे !**
**असा सुखे मी सदना आलो**
**शान्तीत अहा ! झोपी गेलो !'**

जीवनातल्या साऱ्या चंचल, विकारी आणि मनोहारी रसांच्या अंती येणारा अमृतरस म्हणजे हा 'शान्त'रस! स्वर्गाने पृथ्वीचे केलेले अधरामृतपान!! 'नवा शिपाई' हा या शांत रसाचा प्रेषित आहे, पाईक आहे.तो अखिल भेद विसरून गेलेला आहे.आपल्यामध्ये अखिल विश्व अनुभविणारा आणि म्हणून 'मी' हा शब्दच ज्याला लागू पडत नाही असा हा 'नवा शिपाई' आहे. 'सतारीच्या बोला'तील 'शांती'ची अनुभूती ही प्रत्यक्ष श्रुतिसंवेदनांतून लाभलेली आहे; तर 'नवा शिपाई' मधील 'शांती'ची घोषणा ही दृढ, अचल, तात्त्विक भावानुभूतीतून स्फुरलेली आहे. 'सत्त्वगुणोत्कर्षातून शांतीचे साम्राज्य स्थापित होणे' म्हणजेच पृथ्वीवर स्वर्ग प्रकटणे, हे केशवसुतांचे तत्त्वज्ञान होय. याचसाठी गोफण चालवायची, तुतारी फुंकायची, मूर्ती फोडायची आणि नव्याने जोडायची! सतारीच्या बोलासाठीच तुतारीचे बोल घुमावयाचे!

* * *

मूळ लेख : 'केशवसुत : विराट स्वप्न पाहणारा वाग्देवीसुत!'
'केशवसुत विशेषांक', 'लोकराज्य' ऑक्टोबर १९६६

## २. स्वर्भू-मीलन : केशवसुतांचे एक 'मिथ्'

केशवसुतांच्या काव्यप्रतिभेला आणि आविष्काराला 'स्वर्भूमीलनाच्या ध्यासा'च्या विशिष्ट कल्पनेचे एक केंद्र लाभले आहे, हे खरे; हा स्वर्ग दुःखापासून पळून जाण्यासाठी निर्माण केलेला कल्पनेचा गंधर्वलोक नाही, हेही खरे; पण हा 'स्वर्ग' प्रत्यक्षात अवतरेलच अवतरेल, असा निःसंदेह आत्मविश्वास मात्र केशवसुतांची कविता वाचकांमध्ये निर्माण करू शकत नाही. मनुष्याला या जीवनातच 'स्वर्गसमक्षता' लाभू शकते अशी केशवसुतांच्या कवितेची प्रतिज्ञा नाही. खरोखर 'समग्र केशवसुत' अनुभविल्यावर रसिकाचे मन स्वर्गसमक्षतेच्या दुर्दम्य आशावादाने, पौरुषपूर्ण वृत्तीने फुलून जात नाही; तर ते अधिकच अंतर्मुख, विचारमग्न आणि भावसंकुल होते. एखाद्या विराट शोकांतिकेचा अनुभव घेतल्यासारखा काही तरी उदात्तरमणीय पण नैराश्यपीडित आनंद साऱ्या चेतोवृत्ती व्यापून टाकतो.

केशवसुतांची कविता दुःखानुगामी नाही, पण 'खंती'विना लाभणाऱ्या निरागस आनंदाचे विशुद्ध दान करणारीही नाही. तेजाचा स्पर्श ती घडविते, पण ती सर्वांगी तेजःपुंज झालेली नाही. 'तम अल्प, द्युति बहु' याचा प्रत्यय तिला होतो, पण तो क्षणजीवी, परिस्थितिसापेक्ष आहे. मानवी मनाच्या अमर्याद आकांक्षा तिने बोलून दाखविल्या आहेत. पण वास्तवात त्यांना पडणाऱ्या मर्यादा तिला स्वतःला लपविता आल्या नाहीत. स्वर्ग हा पृथ्वीचा आदर्श आहे, याचा वारंवार उच्चार करूनही, या भिकार जगात इच्छित काही मिळत नाही, हे कटू सत्य नाइलाजाने तिला कबूल करावे लागले आहे. ज्याला चिकटून राहावे असे या जगात काय आहे? असा सरळ प्रश्न केशवसुतांच्या कविवृत्तीने टाकला आहे. आनंदाविषयी बुरसटलेली अव्हेरवृत्ती केशवसुतांच्या कवितेत आढळणार नाही, हे खरे; पण आनंदोत्सवात उत्फुल्ल मनाने समरसून गेल्याचे दृश्यही आपणास सापडणार नाही. उलट 'दिवाळी'च्या प्रेममधुर, प्रसन्न वातावरणाचे निकोप मनाने चित्र काढून झाल्यावर अखेरीस ते उद्गारतात -

**‘खाणे आणि पिणे, विनोद करणे, गाणेहि वा खेळणे**
**जैसे ज्यांस रुचेल, त्यापरि तुम्ही या उत्सवी वागणे;**
**मी संध्यासमयी खुशाल गिरणातीरावरी बैसुनी**
**कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी!’**

केशवसुतांना विजनाचे, एकांताचे खरेखुरे प्रेम आहे.तेथेच त्यांचा आत्म्याशी खराखुरा संवाद सुरू होतो. तेथेच त्यांचे कोमल, अतिशुद्ध, महन्मंगल, चिरंजीव असे काही भावबंध जडलेले दिसतात. दूर कोठे एकला जाऊन बसलेला कविजीव आकाशातल्या तारकेशी आपले स्वर्गीय नाते जुळल्याचे पाहून आनंदित होतो. या जड जगात अशी विमल नाती क्वचितच जीव धरू शकतात, याची त्यांना खंत वाटते.

केशवसुतांनी स्वर्गाला उद्देशून एकही कविता लिहिली नाही, किंवा स्वर्ग म्हणजे काय हेही कोठे स्पष्ट केलेले नाही.तरी पण स्वर्गाच्या खुणा त्यांना कोठे कोठे दिसत, हे सहज समजण्यासारखे आहे.

मातेच्या प्रेमळ नेत्रांत, मातामहांच्या पावक आशीर्वचनात, आप्तस्वकीयांच्या निरपेक्ष त्यागात, ऋषि-मुनींच्या तेजस्वितेत, सतीच्या आत्मबलिदानात, निद्रामग्न मुग्धेच्या मुखमंडलात, शुभमुखीने रेखलेल्या आदित्यादी रंगावलीत, माहेरच्या मुक्ततेत, मुग्ध मधुबाल्यात, प्रज्ञा आणि प्रतिभा यांच्या दिव्य विलासात, सतारीच्या दिडदा-दिडदात केशवसुतांना स्वर्ग-खुणा दिसत ... निसर्गाच्या अढळ सौंदर्यात, पक्ष्यांच्या मधुर कुजनात, झुडुपावरील पुष्पांच्या हास्यात, स्वच्छंद फुलपाखरांच्या भ्रमंतीत, ओढे वनराजींच्या सान्निध्यात, नदीतीरावरील एकांतात त्यांना काही अलौकिक, दिव्य भासे. केशवसुतांचे खरेखुरे आवडते जग हे आहे. हवेत मुक्तपणे तरंगणारी ‘म्हातारी’ आणि झरोक्यातून पडलेल्या किरणांत प्रकाशमय झालेला मुक्त ‘अणू’ ही त्यांना या नावडत्या जड जगातून चटकन आपल्या आवडत्या विश्वात नेत असत.या विश्वाशी केशवसुतांचे मन भावैक्यमय होत असे.

येथे अढळ सौंदर्याची ओढ आहे, शैशवाच्या अनुभूतीने पुलकित होण्याची वृत्ती आहे, आंतरिक महात्मतेपुढे अवनम्र होण्याचा सहजधर्म आहे.तेजाचे मनोभावे पूजन आहे, उपचारासाठी सौजन्याचा बाह्यात्कारी स्वीकार करणारे हे जग नाही. सरळ हृदयाच्या आणि निर्मळ मनाच्या ह्या विश्वाला प्रौढ मानवाचा स्वार्थी वारा लागताच केशवसुतांना परम खेद होई. जेथे साधेपण, शुचिता, शांती आहे; मधुरता, कोमलता, सुंदरता आहे; प्रीती, पावित्र्य

आणि मांगल्य आहे, -तेथे स्वर्ग आहे, हे सारे अमर आहे, चिरतरुण, चिररुचिर आहे अशी केशवसुतांची भावना आहे. त्यांच्या स्वर्गात क्षुधा आणि काम या प्रमाथी वासना धर्माला अविरोधी राहून सुफलित होतात. आहारनिद्रादींच्या आवर्तातून सुटून गेल्याने आणि कला व शास्त्र यांचे उपासक बनल्याने तेथे सदैव नूतन व सुंदर निर्मिती चालू असते. ह्या स्वर्गात 'खंतीविना आनंद' आहे.नष्ट होणाऱ्या दिव्याभासांना पाहून 'काही सुंदर देखिले खचित मी, यामाजि शंका नसे' अशी हळहळ नाही; उलट 'काही सुंदर देखितो सतत मी, यामाजि शंका नसे' असा चिरंतन अनुभव आहे.केशवसुतांच्या ध्यानीमनी हा स्वर्ग जागा असतो.

या दिव्य वस्तूंच्या सान्निध्यात केशवसुतांना आनंदाचा उमाळा येई, पण लगेच त्याहूनही तीव्र दुःख होई. वनश्रीतून चाललेला फुलपाखरांचा निर्वेध, स्वच्छंद संचार पाहून उद्याच्या विवंचनेत कंठाव्या लागणाऱ्या स्वतःच्या जिण्याची आठवण त्यांना होते; आणि आत्महीनतेच्या जाणिवेने (Negative self-feelingने) ते विकल ( Paralysed ) होतात. 'म्हातारी'ला पाहताच त्यांना स्वतःच्या वयस्कतेची खंत वाटते; ते 'आजच्या चिंतांची व लटक्या हसण्याची' आठवण टाळू पाहतात. भुंग्याचा गुंजारव म्हणजेच सृष्टीचे खरे गान असून स्वतःचे गान हे त्यापुढे केवळ 'चिंध्यादान' आहे, असे त्यांना वाटे. भुंग्याची परमानंदपरिपूर्ण वृत्ती पाहून 'अस्मदीय ह्रदयी ठरले, की जग हे दुःखे भरले' हे उद्गार त्यांच्या मुखावाटे तत्काळ बाहेर पडतात. फुलाला पाहताच ते घेण्यासाठी ते हात पुढे करतात, पण त्याला कंप सुटतो. दिव्यत्वाला स्पर्श करावयास त्यांना भय वाटू लागते.पूर्वीची त्याच्याशी असलेली समता आठवून 'गेला गेला काळ अहह तो ! फेर किती आता' असा शोक सुरू होतो. फुलाचा सहवास बरा अशी इच्छा ते बोलून दाखवितात. पण एका बाजूला सदैव सुंदर व तरुण असे पुष्पाचे हास्य आणि दुसऱ्या बाजूला मृत आशांच्या चितांवरून अशांतपणे भटकणारे स्वतःचे पिशाच्च पाहून निदान स्वप्नसृष्टीत तरी पुष्पसहवासाची इच्छापूर्ती होवो अशी ते करुणा भाकतात. 'फुलांची पखरण' या कवितेच्या प्रारंभीचे पुण्यमय प्रभातकाळाचे वर्णन कवीने किती मुक्तमनाने व आनंदाने केले आहे ! पण हा आनंद फार काळ टिकणार नाही या भयाने

**'असे जोवर बहर, तोवरी, टीप् फुले टीप्'**

अशी घाई ते करू लागतात. सकाळ संपूर्ण ऊन तापले आणि गद्य जगाचे धंदे सुरू झाले की फुले विसरली जाणार, ही तापद जाणीव त्यांना सतावते.

यौवनाने जिच्या कौमार्याचा अंत केलेला नाही अशा बारा-तेरा वर्षांच्या एका निद्रामग्न मुलीच्या मुखमंडलावर केशवसुतांना स्वर्गीय भाव उमटलेले दिसले.ब्रह्मानंदनिमग्न लयीत

ती जणू समाधिस्थ झाली होती.तिच्या कोमल गालांचा वात्सल्याने पापा घ्यावा, असे कवीला वाटले.पण ह्या निष्पाप आनंदापासून त्याला परावृत्त व्हावे लागले.या स्वर्गीय भावनांच्या (Heavenly promptings of the heart च्या) आड दोन गोष्टी येतात. एक म्हणजे समाजमन; आणि दुसरी म्हणजे मुलीच्या सानंद सुषुप्तीच्या नाशाचे भय. रूढ नीती ही येथे निर्मळ भावनांचा कोंडमारा करताना दिसते, आणि 'जागृती' म्हणजे आनंदनाश, हा भयप्रद विचार येथे प्रकट होतो. या अनिश्चित जगात ह्या बालिकेची पुढे काय दशा होईल या विचाराने ते शोकाकुल होतात. आज तिच्या गालावर जे अजाणतेपण शोभत आहे, तेथेच पुढे कटू जाणतेपण नांगर ओढणार आहे, आणि कालांतराने तिच्या मुखावर आजच्याप्रमाणेच मधुर चेतोवृत्तीचे समप्रमाण  दिसणार नाही—हा विचार कवीला विषण्ण करतो.

केशवसुतांच्या कवितेत सुंदरतेला अशी कुसे लागलेली आहेत; आत्यंतिक आनंदाला दुःखाचा पदर लगटला आहे. प्रकाश अंधाराची सोबत सोडू शकत नाही.''खंतीविना निरागस आनंद देणारा स्वर्ग, त्रिखंड हिंडूनही सापडत नाही; माझा असून मला तो का लाभत नाही ?'' यामुळे व्याकुळ झालेले कविहृदय दृष्टीस पडते. 'हरपले श्रेय' -या गीताचे नाते आदर्शावस्थेच्या-स्वर्गाच्या चिंतनाशी आहे हे खरे, पण त्यात आर्त नैराश्य, 'जीव पाखडणे' आहे; स्वर्गसमक्षता' घडली तर प्रेमाने प्राणाहुती द्यावयाची सिद्धता आहे; पण ती घडत नाही.

हा हातचा स्वर्ग कोणी हिरावून नेला ? 'प्रौढपण' हा ह्या स्वर्गाचा खरा मारेकरी आहे. मुलाने मोठे होणे हा त्याचा अपराध आहे, असा याचा अर्थ नाही. जे हवे आहे ते

**'प्रौढत्वी निजशैशवास जपणे'**

हे आहे. हा कवीचा बाणा आहे.'स्वर्गसमक्षता कोठे प्रगटते' ते ह्या प्रौढत्वी जपलेल्या शैशवाने प्रत्ययास येते. ही बालपणाची जपणूक महात्मे मोठेपणीही करतात, म्हणूनच ते महात्मे ठरतात. सज्जन हे सृष्टीचे स्वयंभू नियम पाळतात; पण 'लौकिक मूर्ख' 'अशुद्ध स्वार्थाने' प्रेरित होऊन ते नियम सुधारू लागतात. धर्म आणि नीती यांमधील उद्धारक शक्तीचा नाश रूढी करू लागते. स्वर्गावर प्रेम करणाऱ्या केशवसुतांचे ह्या व्यवहारी, उदरभरू गद्य जगाशी हाडवैर आहे. कठीण शब्दांच्या धोंड्यांनी ते हाणाहाण करीत सुटतात; डोंगरीचे द्वाड आडदांड बनतात. आळशी खुशालचंद, आपल्याच तोऱ्यात बडबडणारे, मुलाम्याचे जिणे जगणारे, थप्पड बसताच गाल चोळणारे, बालांस गरिबी शिकविणारे, वैऱ्याच्या पायधुळीत लोळून प्राप्त तूपपोळीत कृतार्थ होणारे, पैशासाठी न्याय टाकणारे, दांभिकतेने नटणारे, 'मी'-चा संकुचित अर्थ करून अनर्थ माजविणारे, ह्यावर आणि ह्यांच्यासारख्यांच्यावर केशवसुत घाव घालीत सुटतात. 'स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य' ह्या कवितेत निर्देशिलेल्या कृतघ्न मानवाची ही निर्लज्ज संताने होत.

केशवसुतांचा स्वर्गसमक्षतेचा अनुभव सर्वस्वी आत्मनिष्ठ होता, आणि तोही ओझरता, क्षणा-दोन क्षणांचा, हुलकावणी देत जाणारा, भासात्मक! ह्या अनुभवाने केशवसुतांना नैराश्याचे धनी बनविले. हे नैराश्य उदात्त आहे. अमर्यादाला कवटाळता न आल्याने येणारे हे नैराश्य मर्यादित अशा जगातील उच्चतम यशाहूनही वरच्या पातळीवरचे आहे.प्रतिभावंतांची अहंता केशवसुतांच्या ठायी इतकी आहे की ते हे नैराश्य पचवू शकतात. दैवी गुणांवरील त्यांची निष्ठा कधी ढळत नाही. त्यांची कविता स्वतःच्या दैनंदिन जीवनातील लौकिक हर्षामर्षात कधीच गुरफटत नाही. केशवसुतांची कविता ही अथपासून इतिपर्यंत दैवी गुणांची पूजक आहे.ही पूजा सुफलित होवो न होवो; त्यांची कविता स्वतःची उच्च बैठक ढळू देत नाही. ती दैववादी नाही की स्त्रैणही नाही. ती आत्मकेंद्रित नाही, तर आत्मनिष्ठ आहे.

केशवसुतांच्या ह्या आत्मनिष्ठेला सामाजिक नेत्र लाभले आहेत; कधी कधी हे नेत्र अखिल विश्वावर खिळून राहतात आणि मग आपल्यामध्येच विश्व पाहून विश्वाची पूजा आरंभिली जाते. अशा क्षणी विषाद आणि खेद लुप्त होतात. पद्यपंक्तीच्या तरफेची शक्ती, कलावंताचे कलासौंदर्य आणि शास्त्रज्ञांचे बुद्धिसामर्थ्य यांचा बडिवार ते तडफेने गाऊ लागतात. स्वतः 'स्वत्वाचे चोर' बनून 'सत्त्वाचा उदयोऽस्तु' असे ललकारत 'शांतीचे साम्राज्य' स्थापण्याचा उद्‌घोष करतात. 'धीराला दे प्रसंग हिंमत' हे जाणून आणि 'जग हे बदलायाचे' याची खात्री बाळगून ते सत्य, सच्छील, ज्ञान आणि उद्यम यांची कास न सोडण्याची, उत्तेजनाची भाषा बोलतात. 'तुतारी', 'स्फूर्ति', 'आम्ही कोण?', 'मूर्तिभंजन', 'नवा शिपाई' आणि 'गोफण' या त्यांच्या कविता अंतर्बाह्य ओजस्वी आहेत. कसलेही भय किंवा कोणताही खेद ह्या कवितांना स्पर्श करू शकलेला नाही. स्वर्गाचा सत्यानाश करणाऱ्या नीच मानवावर तुटून पडणाऱ्या ह्या कवितांची जात तुकारामाच्या दंभपरिस्फोटक अभंगांच्या जातीची आहे.

फूल, फुलपाखरू, शैशव यांचे चिंतन, पूजन आणि जतन ज्यासाठी करावयाचे, त्यासाठीच ह्या स्वार्थी, पोटभरू, अनुदार जगाशी वैर धरावयाचे. दिव्यतेच्या सान्निध्यात स्वाभाविकपणे जागी होणारी आत्महीनतेची भावना आणि कृतघ्न जगाच्या दर्शनाने उफाळून येणारा त्वेष-संताप या दोन्हींच्याही मुळाशी केशवसुतांचे 'स्वर्गप्रेम'च आहे. त्याचा सामाजिक आविष्कार आक्रमक आणि बराच भंजनात्मक आहे.आणि व्यक्तिगत आविष्कार mystic आहे.ह्या अंतर्बाह्य दृष्टीमुळे केशवसुतांची कविता ऐहिकतेचा जाच सोसूनही 'स्वर्गीय' गुणांची पूजा करीत राहिली; ती स्वप्नरंजनात रंगली नाही.

केशवसुत स्वप्नाळू असते तर ह्या गद्यजगाच्या जहराने त्यांना मृत्यूची ओढ लागली असती.केशवसुतांच्या कवितेत आत्मघातकी वृत्ती (Suicidal tendency) दिसून येत नाही. क्वचित दुःखप्रभव शरीराचा त्याग किंवा चिरसुषुप्ती, निःस्वप्न दीर्घ निद्रा यांचा मोह झाल्याचे दिसते. पण तो मोह जगाविषयीच्या तीव्रतम कडवटपणाचा परिणाम म्हणून नव्हे.तसेच केशवसुत जड जगाला तुच्छ लेखीत असले तरी त्या जगाची त्यांना किळस आल्याचे प्रत्ययास येत नाही. 'नरेच केला हीन किती नर' येथे चीड आहे, घृणा नाही. मानवाच्या चांगुलपणावर व सामर्थ्यावर त्यांचा उदंड विश्वास आहे.ऋषि-मुनी, द्रष्टे कवी हे त्यांचे सर्वश्रेष्ठ मानव होत. ह्यांचे तेज आणि तपस्या ही पृथ्वीला सुरलोकसाम्य मिळवून देण्यास झटत आहेत. ही केशवसुतांच्या कवितेची धारणा आहे. केशवसुतांच्या कवितेतील नैराश्यामागे हे देदीप्यमान प्रभामंडल आहे.

केशवसुतांचा 'नवा शिपाई' समता आणि विश्वबंधुत्व ही महातत्त्वे मोठ्या हिरीरीने मांडतो.पण ही तत्वे मानवसमाजाच्या दर्शनाने त्यांच्या हृदयात उस्फूर्त झालेली नाहीत. 'निसर्ग, फुले आणि मुले' यांच्याकडे दृष्टी वळताच ह्या भावनांना नकळत जाग आली आहे.

**'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत**

**सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत'**—कारण :

**'सावलीत गोजिरी मुले**

**उन्हात दिसती गोड फुले**

**बघता मन हर्षून डुले'**

**'ती माझी, मी त्यांचा-एकच ओघ अम्हांतुनि वाहे !'**

ही केशवसुतांची प्रतीती आहे.केशवसुत स्वर्ग न्याहाळतात तो या पृथ्वीच्या निष्पाप रूपात; प्रौढ मानवाच्या विश्वात नव्हे. त्यांची 'एक खेडे' ही एकच एक कविता अशी आहे की, जीमध्ये विशुद्ध आनंद आणि आत्मसमाधान प्रगट झाली आहेत. प्रेम, कीर्ती, सत्ता, संपत्ती यांच्यामागे धावत सुटलेल्या मानवजातीला अखेर काय हवे आहे, याचा पुनःपुनः विचार करावयास लावणारी ती कविता आहे.

मानवजातीला अखेर खरोखरी काय हवे आहे? त्याला 'अजाणतेपण'चा स्वर्ग जाणतेपणी हाती यायला हवा आहे.'तो केव्हा येणार? माझे मज लाभेल कधी?' या प्रश्नांनी केशवसुतांसारख्यांचे कविमन व्याकुळ होते; आणि हे घडून येणे प्रायः संभवनीय

नाही, याचीही जाणीव अशा कविमनाला असते. ती जाणीव केशवसुतांनी ‘अक्का’च्या हुकुमतीत सापडलेल्या ‘आत्मारामा’च्या अगतिकत्वातून अभिव्यक्त केली आहे. अतींद्रिय, अपूर्व, अलौकिक अनुभूतीच्या क्षणी विस्मयानंदित होणारे, स्वतःला हरवणारे कलावंताचे जे चैतन्यशाली व्यक्तिमत्त्व (=आत्माराम) त्याला, दैहिक उपाधी, ऐहिक व्यवहार आणि सांसारिक विवंचना, म्हणजेच कलावंताचे लौकिक पाश (=अक्का) जखडून टाकतात! आणि ‘पृथ्वी’ ही ‘पृथ्वी’च राहते; तिच्या मातीला स्वर्गीय कांती लाभत नाही. ‘अमर्याद, दिव्य, स्वर्गीय’ या विशेषणांनी जे जे म्हणून आपण गौरविले त्यातले काहीही या दरिद्री जगात मिळत नाही म्हणून केशवसुतांचे कविमन दीनानाथाच्या पायी भिक्षांदेही म्हणते; अनाथांचा वाली जवळ करते. केशवसुतांच्या स्वर्भू-मीलनाच्या स्वप्नाच्या अनावर आतुरतेचे हे अंत्यदर्शन एक प्रकारे माझ्या मनश्चक्षूंपुढे युगायुगांतून चालत आलेल्या महात्म्यांच्या दिव्य जीवनाची शोकांतिकाच उभी करते.

केशवसुतांची ‘सामाजिक कविता’ ही पृथ्वीला स्वर्ग बनू न देणाऱ्या कृतघ्न, दुष्ट, स्वार्थी मानवांवर चाल करून जाणारी, उद्दाम, आवेगी अशी क्रांति-कविता आहे; तर त्यांची ‘कविविषयक कविता’ ही पृथ्वीला स्वर्गसौंदर्य प्राप्त करून देऊ शकणाऱ्या महामनस्क, उदारचरित, प्रज्ञाचक्षू, प्रतिभासंपन्न, आदर्शरूप कलावंतांचे माहात्म्य गाणारी अनिवार स्तोत्रगीते आहेत; आणि त्यांची ‘गूढवादी कविता’ म्हणजे मानवी मर्यादा सोसणाऱ्या, पण अमर्याद होऊ बघणाऱ्या एका बद्ध-मुक्त जीवात्म्याची करुण रम्य निःश्वसिते आहेत. या त्रिविधरूपांतील केशवसुतांची कविता एकात्मतेने पाहण्यातच खरे स्वारस्य आहे.

* * *

मूळ लेख : ‘केशवसुत आणि स्वर्गसमक्षता’

‘नवभारत’ - फेब्रुवारी 1956

## ३. केशवसुत : कवीच्या अस्मितेचा महोद्रेक !

प्राचीन मराठी काव्यात कविमाहात्म्यकथन भरपूर प्रमाणात आलेले आहे. 'कवीश्वर हे शब्दसृष्टीचे ईश्वर' मानले जात आणि 'कवींचा व्यापार नसता तर जगदुद्धार झाला नसता' असे म्हटले जाई. पण ह्या शब्दसृष्टीतले शब्द वेगळे होते आणि 'जगदुद्धारा'ची कल्पनाही पूर्वी अगदी वेगळी होती. 'कवी हे अध्यात्मग्रंथांच्या खाणीतले बोलके चिंतामणी होत. ते निरंजनाची खूण असून, मुमुक्षूंचे अंजन होत. ते वैराग्याचे संरक्षण असून, भक्तांचे भूषण होत. कवी म्हणजे मनुष्याद्वारे प्रगट झालेली विवेकनिधीची भांडारे होत,' हीच ती दृष्टी होती. रामदास्वामींच्या 'दासबोधा'तील कविवंदनात आलेले हे कविस्वरूपवर्णन आणि काव्यप्रयोजन म्हणजे सर्व प्राचीन संतकवींच्या भूमिकांचे प्रतिनिधिरूप मानावयास हरकत नाही. प्राचीन संतकवींचा गूढवाद, त्यातील अतींद्रियता, त्यांचा गूढानुभवाचा मार्ग आणि त्या मार्गावरील प्रवास याहून केशवसुतांच्या ह्या अनुभूती वेगळ्या आहेत; प्राचीन पंडितकवींशी तर केशवसुतांचे नाते जुळणे सुतराम् अशक्यच! पण फार काय, अव्वल इंग्रजीतील इंग्रजी कवितांचे अध्ययन केलेल्या आणि तिचा रसास्वाद घेतलेल्या समकालीन कवींच्या कवितेहूनही केशवसुतांची कविता प्रकृतीने अगदी भिन्न होती.

केशवसुतपूर्व अव्वल इंग्रजीतील कवी इंग्रजी शिकले होते, तरी मनाने ते जुनेपुराणेच राहिले होते. संस्कृत विदग्ध काव्याची, खंडकाव्याची अथवा नेमलेल्या संस्कृत गद्य-पद्य वेच्यांतील काव्यखंडाची मराठी भाषांतरे करण्यात त्यांचा 'वेळ जात' असे; कधी वाचनात-अभ्यासात ज्या इंग्रजी कविता येतील त्यांना मराठी पेहराव चढविण्यातही त्यांनी पद्याला राबविले. जेथे त्यांनी स्वतंत्र रचना केली, तेथे लौकिक दैनंदिन व्यावहारिक विषय, व्यावहारिक-लौकिक पातळीवरूनच त्यांनी हाताळले.कधी माहिती पुरव, नीतीचा बोध दे, संदेश सांग, उपदेश कर असाच सारा त्यांच्या काव्याचा जीवितहेतू होता. समाजात 'विषय' तयारच असत, त्यांना यथाशक्ति पद्यरूप देण्याचे काम ते कधी करीत; 'कौशल्य सारे रचनेत मोठे,' हेच त्यांचे ध्येयवाक्य ! मोरोपंती आर्या, मोरापंती कसब हेच त्यांचे आदर्श!!

**सरसा सालंकरा सुपदन्यासा सुवर्णमयमूर्ती,**

**आर्या तथाहि भार्या गुणहीनाला करो न बा वर ती ।**

वामन दाजी ओक यांच्या या आर्येत ही भूमिका सुस्पष्ट होते. त्यातील काहींना जे थोडेफार नवे विचार सुचत ते जुन्या वळणाने मांडले जात. ऐहिक बोध आणि पारमार्थिक तात्पर्य काढून दाखविण्याची त्यांना घाई होई. त्यांची भूमिका तिऱ्हाइताची असे. त्यांच्या दृष्टीत विषयनिष्ठता होती, चित्रणातही भावोद्रेकापेक्षा बाह्यरचनेकडेच सारे लक्ष होते.दीर्घ विलापिकांची भरपूर निर्मिती या काळाने केली पण त्यातही काव्यापेक्षा करामतीलाच महत्त्व लाभले.क्वचित 'राजा शिवाजी'सारखा दीर्घ कथात्मक काव्यप्रकार वास्तववादी रूप घेऊ पाहात होता.तर महाजनींच्या 'कुसुमांजली'त आत्मपर अनुभवचित्रणाच्या काही पाऊलखुणा उमटत होत्या. असे अपवादात्मक काहीसे वगळले तर जे पद्य तयार होत होते, ते गद्याचे विषयस्पष्टीकरणाचे, कथनाचे, ज्ञानदानाचे, बोधवादाचे कामच पाहात होते, पाठ्यपुस्तकांची गरज भागवीत होते, 'प्रैज कमिटी'च्या प्रेरणेने नेमलेल्या विषयाप्रमाणे हुकमेहुकुमी रूप बदलीत होते, संस्कृत-इंग्रजीचे तर्जुमे करीत होते. देशकालपरिस्थितीच्या गरजेनुसार मराठी पद्यरचना चालू होती.चालली होती.काव्य प्रसिद्ध करणारी मासिकेही निघत होती.

केशवसुतांच्या लेखणीने या अव्वल इंग्रजीतील कवितेचे प्रारंभी थोडेसे वळण गिरविले आणि पुढे मधून मधून प्रासंगिक, नैमित्तिक म्हणून, अथवा एक क्रीडा म्हणूनही तशी थोडी कविता लिहिली. रघुवंश, किरातार्जुनीय-मधील काही काव्यभागांची त्यांची भाषांतरे, त्यांनी लिहिलेली सुभाषिते, किंवा स्फुट श्लोक यांतील कल्पनाचमत्कृतीचे आणि रचनापद्धतीचे चक्क संस्कृत वळण, त्यातील अन्योक्ती, अर्थांतरन्यास, तसेच 'खाणावळीतील धृतधारे'चे भाषांतर करण्याचा त्यांना झालेला मोह, या संदर्भात विसरता येत नाही. तसेच 'विद्यार्थ्याप्रत', 'घड्याळ', 'दोन बाजी', 'उत्तेजनाचे दोन शब्द', या आणि यासारख्या आणखी काही कवितांचा हेतू उपदेश करण्याचाच आहे; फरक इतकाच की, यामागे कविमनाची प्रामाणिकता उभी असलेली जाणवते.

केशवसुत जे सांगत ते स्वतःचे सांगत; त्यांनी इंग्रजी कवितांची भाषांतरे केली, ती त्यात स्वतःचे मन प्रतिबिंबित झालेले दिसले म्हणूनच ! केशवसुतांनी अनात्मपर मराठी काव्याची परंपरा सोडली; विषयापेक्षा विषय सांगणाऱ्याला महत्त्व आले - म्हणजेच काय सागंतो यापेक्षा किती तळमळीने, अनावरतेने कोण सांगतो याला विशेष महत्त्व आले ! मराठी कविता आत्मपर बनली.आत्मपर भावकवितेची शक्ती केशवसुतांच्या इतकी इतर कोणास ओळखता

आली नाही. केशवसुतांनी तिच्यावर जिवापाड प्रेम केले, तिचे 'माहात्म्य' गाताना त्यांनी भीडलज्जा बाळगली नाही; केशवसुतांनी मराठी भावकवितेची एकनिष्ठपणे उपासना केली; तिच्या सर्वांगीण विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. केशवसुत त्यात रमले; स्वतःला हरवून बसावे इतके रमले ! कवी आणि काव्यातील अनुभूती यांच्यात एक जिवाभावाचे नाते जडले !

जुने काव्य किंवा जुने काव्यशास्त्र, जुने संकेत किंवा जुन्या कल्पना, जुने विषय किंवा जुने हेतू केशवसुतांनी आपल्या नव्या गीतांत आणले नाहीत. पाश्चात्त्य कवितेने प्रभावित झालेला आणि प्रकृत्या समानधर्मी असणारा हा कवी पूर्णपणे नवी कविता निर्माण करीत होता; कवित्वशक्तीने वेडावून गेला होता; कविप्रतिभेत असे काही अलौकिक सामर्थ्यशाली क्रांतिकारक सत्त्व असू शकते की त्या, बळावर जुने जग उलथून देऊन नवे सुंदर जग निर्माण करता येते. या कल्पनेने भारावलेल्या मानसावस्थेत जगणारे पहिले कवी म्हणजे 'केशवसुतच' होत ! केशवसुत म्हणजे कवींच्या अस्मितेचा पहिला प्रबळ हुंकार होय ! पहिले महास्फुरण होय ! !

वस्तुतः 'केशवसुतांनी' मराठी कवितेला अध्यात्मातून, पारमार्थिक वृत्तीतून, कथापुराणातून, लौकिक नीत्युपदेशातून, सामान्य तपशीलपर निवेदनातून, कृत्रिम वृत्तालंकारातून; विषयनिष्ठ बहिर्दृष्टिवादातून सोडविले; तिला आत्मपर आणि निर्भरशील, सौंदर्यवादी बनविले. प्रतिभामाहात्म्य, प्रज्वलित सामाजिक जाणिवा आणि अतींद्रिय गूढानुभवाची ओढ या अनुभूतींच्या आत्मपर, निर्भरशील चित्रणात केशवसुतांना स्वाभाविकता लाभली; त्यात ते पराकोटीचे उत्कट आणि प्रतीतिकारक ठरले. आत्मपरतेची आणि निर्भरशीलतेची खरी जाणीव झालेल्या कोणत्याही कवीची कविता ही अनुकरणात्मक असूच शकत नाही. केशवसुतांच्या कवितेमुळे जर काही महनीय घडले असेल, तर ते हे की, अस्सल कविता ही अननुकरणात्मक, अ-सांकेतिक असते; तिला भावानुभूतीचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असते; ती जिवंतपणे कविहृदयातून आपले योग्य ते शब्दशरीर घेऊन अवतरते; याची प्रचीती मराठी कवींना घडविली गेली. केशवसुतांच्या नंतर मराठी कवितेला जुने वळण घेणे शक्य झाले नाही. केशवसुतांच्या कवितेच्या सत्त्वाची हीच खरी कसोटी- अगदी काळाने ठरविलेली ! केशवसुत हे 'कवींचे कवी', 'अर्वाचीन मराठी कवितेचे जनक,' इत्यादी बिरुदांचे मानकरी होतात, ते या अर्थाने !

* * *

## ४. केशवसुतांची इंग्रजी कविता

केशवसुतांना ज्या कवितेने वेडे केले होते ती कविता इंग्रजी रोमँटिक कवीची कविता होती.पालग्रेव्हने संपादित केलेल्या 'गोल्डन ट्रेझरी'तील भावकवितेने (Lyric) केशवसुत भारावले गेले होते. पण 'गोल्डन ट्रेझरी'चे वाचन हे वस्तुतः निमित्तमात्रच म्हणावयास हवे. केशवसुतांच्या ठायी असलेल्या आत्मपर, निर्भरशील वृत्तीला या कवितेने जाग आणली. केशवसुतांच्या इंग्रजी कविता अभ्यासिल्या तर हे आणखी स्पष्ट होईल.

केशवसुतांचे धाकटे बंधू सीतारामपंत दामले यांनी केशवसुतांचे इंग्रजी चार 'चुटके' (=कविता) 'चित्रमयजगत्'च्या १९२१ च्या डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध केले. 'आणखी' दोन-तीन (चुटके) प्रसिद्ध करण्यासारखे आहेत असे त्याच वेळी सीतारामपंतांनी म्हटले होते, पण हे चुटके काही प्रकाशात आलेले नाहीत. प्रा. भवानीशंकर पंडित यांनी संपादित केलेल्या 'समग्र केशवसुत' या ग्रंथात उपरिनिर्दिष्ट चार 'चुटक्या'हून आणखी एक नवा 'चुटका' समाविष्ट करण्यात आलेला आहे. तेव्हा केशवसुतांच्या प्रकाशित अशा इंग्रजी कवितांची संख्या 'पाच' होते. त्यांची शीर्षके, उपलब्ध लेखनकाल आणि स्थले पुढीलप्रमाणे आहेत -

1.'TO A POET.'

(कल्याण, २१ एप्रिल, १८९१)

2.'FLOWERS FROM A GRAVE'

(मुंबई, २३ फेब्रुवारी, १८९२)

3. 'THE WAVES'

(२१ डिसेंबर १८९३)

4. ‘AN APOLOGY TO A FLOWER’

5. ‘THE STAR OF CONSTANT LOVE’

यातील पाचव्या कवितेच्या शेवटी ‘K. K. D.’ अशी केशवसुतांनी आपल्या नावाची आद्याक्षरे घातली आहेत.

या पाच कविता पुढीलप्रमाणे आहेत :

**1. TO A POET**

Whenever dark clouds flit apart
To drink sweet Luna’s liquid ray;
whenev’r high dreams wing up my heart
To tread bright heaven’s Milky Way: 1

Whenev’r my wither’d tree of life
Can blossom forth a charming flower,
Regarding not Want’s cutting knife,
To get it pearl’d in Fancy’s shower; 2

And, when by chance the cuckoo free
Comes to my bower desolate,
To catch its song and try to be
A song incarnate soon or late; 3

Such are my wishes ever sweet;
But sweeter far to find a time
To bend low at a Poet’s feet,
And, at its source to taste his rhyme ! 4

## १) कवीस

‘‘चंद्रबिंबातले अमृत (किरण) प्राशन करण्यासाठी
जेव्हा जेव्हा कृष्ण मेघ पांगतात -
‘‘अलौकिक स्वप्नांच्या पंखांवर बसून
जेव्हा जेव्हा माझे हृदय उंच झेपावत जाते,
आणि शुभ्रधवल स्वर्गंगेवरून पायी विहार करण्याची इच्छा करते-
‘‘माझ्या विशीर्ण जीवनतरूवर जेव्हा जेव्हा एखादे फूल फुलून येते,
आणि
दैनंदिन चिंतांच्या मन कापीत जाणाऱ्या धारदार पात्याची
तमाही न बाळगता,
माझा जीवनतरू, कल्पवृष्टीत न्हाऊन मौक्तिकमय होऊ इच्छितो-
‘‘माझ्या विजनातील कुंजात जेव्हा जेव्हा
मुक्त कोकिल विहंग सहज म्हणून शिरतो,
आपले गीत पकडू पाहतो, आणि
‘‘क्षणा-दो क्षणात, स्वतःच मूर्तिमंत गीत होतो...
तेव्हा...’’ (खरं म्हणजे) ही माझी चिरंतन मधुर
अशी इच्छास्वप्नं आहेत;
पण याहूनही माझं एक आणखी कितीतरी मधुर असं
वेगळं इच्छास्वप्न आहे !
मला वाटतं की, ‘साक्षात ‘कवी’ला भेटण्याची मला संधी मिळावी,
त्याच्या चरणांशी मी नमावं अन् ती ‘भावलय’ आस्वादावी...
अगदी तिच्या उगमबिंदूपाशीच !

## 2. FLOWERS FROM A GRAVE

Sick of the busy haunts of men,
With wand'ring spent and care,
I sought a cool and quite glen,
To find some solace there. 1

Sick of the busy haunts of men,
Though I'd be busy there,
Still, fortune having play'd me false
And dragg'd me to despair, 2

I sought the calm of solitude,
To muse and absent be
From thoughts that on the mind intrude
The hive of word to see 3

I brush'd along my grass grown round
And on a mound espied
A lowly grave with flowers crown'd,
An there at once I hied 4

To see the grave so overgrown
With flowers-was it a joy ?
I can't say "No' although I own
A touch did me annoy. 5

I thought - The heart that slumbers here
Beneath the grave so green,
And feeds the bloom of buds so rare,
How sweet it must have been ! 6

"But for the grave the heart that would
In living music breathe,
Should only send a flow'r a bud
Its ashes to enwreathe !'' 7

As thus I mused my heart did send
An echo of the same,
I did my list'ning inward bend,
When from my heart this came: 8

"Ah ! should in me the Poet die,
- And die he likely may
If this ill luck would always cry
Against me in my way - 9

"And should I continue to be
- How hard to speak it out !
A living tomb of poesy
Far worse than death no doubt; 10

"Then, from that tomb of song might rise
A few rhymes now and then,
To indicate the spot where lies
The spark Promethean 11

"Would, then, a passer-by halt there,
And think of me, as I
Now do about the heart that here
Entomb'd for aye doth lie?'' 12

No more my heart its voices gave,
When, O'ercame forth I stept,
And bending over the lowly grave,
I kiss'd the flowers and wept. 13

**२) कबरीतून आलेली फुले**

माणसांच्या वर्दळीचा उबग आला, भटकंतीला कंटाळलो, काळजीनं थकलो आणि एका शांतशीतल पर्वत-प्रदेशात आलो; हेतू हा की, मनाला काही समाधान मिळवावं !

माणसांच्या वर्दळीचा मला उबग आला, पण खरं तर, तिथं माझी खूप कामं होती; परंतु दैवाचा फासा उलटा पडला आणि त्यानं मला नैराश्य (भूमीत) फरफटत नेलं.

मी अतिनिवांत अशी एक जागा शोधली, आणि मधमाश्यांच्या पोळ्याप्रमाणे गजबजलेल्या घोंगावणाऱ्या जगाचे आगंतुक विचार मनात घुसू नयेत, त्याविषयी मन बंद करावे, म्हणून मी कल्पनाविहारात रमायचं ठरविलं.

सभोवताली वाढलेलं गवत बाजूला करीत मी निघालो, तोच एका लहानशा उंचवट्यावर फुलांनी झाकून गेलेली एक साधी कबर मला दिसली. मी लगेच तडक तिकडं निघालो.

फुलांनी इतकी झाकून गेलेली कबर मी पाहिली, पण खरंच मला त्यानं आनंद झाला का? 'नाही' असं मी म्हणू शकत नाही; तरी पण माझ्या मनात काही तरी खळबळलं !

मनात विचार आला, ''या हरितसुंदर कबरीखाली जे हृदय गाढ निद्रा घेत आहे, तेच

या फुलवेलीचं पोषण करीत आहे, तिच्या अनुपम कळ्या फुलवीत आहे. ते हृदय किती गोड असेल नाही ? ...

''ज्या हृदयानं जिवंतपणी संगीताचे सूर आळवावे, त्यालाच आता आपली रक्षा भूषविण्यासाठी फक्त एखादं फूल, एखादी कळी अर्पण करता यावी ना ?''

मी अशी कल्पना करतो आहे तोच, माझ्या अंतर्हृदयातून तिचाच प्रतिध्वनी उठला. आणि मी आतल्या आत कान देऊन ऐकू लागलो. माझ्या हृदयातून बोल उमटत होते की-

''अरे तुझ्या ठिकाणी जो 'कवी' वास करीत आहे, तो समजा मृत्यू पावला, (माझं दुर्दैव जर असंच नेहमी माझ्या वाटेत येऊन माझ्या विरुद्ध ओरड करू लागलं, तर हे घडणं अगदी संभवनीय आहे ! ) आणि मागं केवळ देहमात्रच मला जगत राहावं लागलं तर ? ह्या स्थितीचं वर्णन शब्दांनी करणं फार कठीण आहे; मी सांगतो, मी म्हणजे माझ्या काव्यकलेचं जिवंत थडगंच बनेन;'' निःसंशय मरणाहून हे महाभयंकर आहे.

''आणि दिव्याग्नीची (दैवी प्रतिभाज्वालेची) ठिणगी (स्फुलिंग) येथे अंतर्हित आहे याची साक्ष म्हणून या माझ्या कबरीतून अधूनमधून काही भावलयी जेव्हा उठतील तेव्हा एखादा पांथस्थ इथं थांबेल का? या कबरीखाली पहुडलेल्या जिवासंबंधी जसं मला काही वाटतं, तसं त्याला माझ्यासंबंधी काही वाटेल का ?''

बस्स ! माझ्या हृदयभूमीतून याहून आणखी काही शब्द उमटले नाहीत. मी अगदी भारावून गेलो, पुढं सरलो, त्या कबरीवर वाकलो, फुलं चुंबिली ! अन् मला रडूच फुटलं !

**3. THE WAVES**

They dance upon the sunlit sea,
The frisk and play and do not mind,
The world so full of misery,
But move on with the sportful wind ! 1

What can they know of woe and wail
Which, on the hard earth ev'rywhere,
For men and creatures must prevail?
Ah blessed they ! why should they care? 2

The breezes call them from the deep,
And quick they rise with spirit's grace,
The solar beams kiss them to sleep,
And dimpling sunless the ocean's face ! 3

### ३) सागरलहरी

... उन्हात चमकणाऱ्या सागरावर लाटांचा नाच सुरू आहे; त्या खेळत आहेत, खिदळत आहेत. दुःखानं गांजून गेलेलं जग त्यांच्या ध्यानीमनीही नाही. खेळकर वाऱ्याबरोबर त्या हलतडुलत आहेत.

... या कठीण जगात सर्वत्र, पशु-पक्षी आणि मनुष्यप्राणी यांच्या नशिबी येणारी दैन्य आणि दुःख त्यांना काय कळणार आहेत? आणि त्यांनी त्यांची चिंता तरी का करावी ? त्या भाग्यवंत आहेत !

... वायुलहरी येतात आणि त्यांना साद घालतात; झटकन सागरतळापासून एखाद्या जलपरीसारख्या मोहकपणे त्या वर येतात. सूर्यकिरण चुंबन घेऊन त्यांना झोपवू लागतात- सूर्य निघून जातो अन् सागरपृष्ठावर लाटांची खळी पडत राहते !

## 4. AN APOLOGY TO A FLOWER

I pluck thee, flow'r forbear my touch,
For, self is not at all my shrine;
I am enslaved by love so much
That I all claims of self resign. 1

I pluck thee for my Tara's brow,
With all thy tender bloom there shine,
And sweetly breathe to her my vow-
I'll serve her who is so divine ! 2

### ४) पुष्पाची क्षमायाचना

''हे पुष्पा, मी तुला खुडीत आहे; क्षमा कर; रागावू नकोस! अरे, मला स्वतःची पूजा करायची नाही! कारण (हे पाहा), मी प्रेमाचा इतका काही दास बनलो आहे की, माझा 'मी'-पणाचा सारा बडिवार मी केव्हाच टाकून दिला आहे.

''हे पुष्पा, मी तुला खुडतो आहे ना, ते माझ्या 'तारा'साठी, तिच्या मुखप्रसाधनासाठी! तुझं सारं नाजूक सौंदर्य तिथं उमलू दे, खुलू दे! आणि (हे पाहा) पुष्पा, तुझ्या गंधोच्छ्वासातून तिला माझी गोड प्रतिज्ञा कळू दे की, 'मी' तिचीच-अलौकिक देवतारूप अशा तिचीच-अनन्य सेवा करणार आहे!''

### 5. THE STAR OF CONSTANT LOVE

Two months are well neigh past, my dear
Two months are well neigh past,
Since when we two met last, my dear
And flew the night so fast ! 1

The night so quickly fled, my dear,
We wished it were longer still
Because we knew the morning was near
When we should fare but ill ! 2

For, then, I was to drag my feet
O'er dreary downs and dales
And leave thee lonely to repeat
The tearful tender tales ! 3

The thoughts of parting at the dawn
Then made us, Dear, the dearer,

To warmer hearts together drawn
We were by love the nearer ! 4

We slowly drew the lattice neigh,
And saw a Polar Star
Said with a sigh both thou and I -
Like that we constant are ! 5

Indeed, my Love, we constant are,
Whatever the space between;
For that same star of Constant Love
Shines on us both serene ! 6

**५) चांदणी, अढळ प्रीतीची**

''प्रिये, तुझी माझी भेट झाली,
त्याला दोन महिने झाले
दोन महिने होत आले !
ती रात्र ! - किती झर्कन् संपली...
वाटत होतं, की सारखी वाढतच राहावी !
कारण माहीत होतं तुला अन् मला,
पहाट होत आली आहे
अन् निरोप घ्यायचा आहे
तुला माझा, मला तुझा,
नकोनकोसा !
अन् ठाऊक होतं हेही आणखी-

जायचं होतं मला
पाय ओढीत कष्टानं,
ओलांडीत दरी-खोरी,
ओसाड-भयंकर;
मागं सोडून, तुला एकटीला,
अश्रूंनी न्हालेल्या,
नाजूक आठवणींची
करीत उजळणी !
पहाटेचा वियोग !
कल्पनेनंच त्याच्या, झालो आपण प्रिये,
'प्रियतर' (प्रियतम)
एकमेकां !
दोन हृदयं, प्रीतीनं त्या,
ओढली जवळ-आणखी जवळ-अगदी जवळ !
त्या रात्री, हलकेच उघडली
जाळी सरकती गवाक्षाची
आणि पाहिली चांदणी ध्रुवाची
आपण दोघांनी, (अगदी दोघांनी)
निःश्वसलो, अन् वदलो,
आहोत अढळ, अगदी आपण
चांदणीपरी-ध्रुवाच्या या !
खरंच प्रिये असलो दूर
कितीही आपण,

तरीही आपुली प्रीती अढळ,
अगदी अचल...
पहा की, चमकत आहे
तुझ्यावरी माझ्यावरी
एकच ती चांदणी,
अढळ प्रीतीची, उदात्त सुंदर
'ध्रुवाची चांदणी'

ह्या कविता केशवसुतांनी वयाच्या पंचविशीत केलेल्या आहेत. १८९१ ते १८९४ या तीन-चार वर्षांतल्या या कविता. या काळात केशवसुतांचे वास्तव्य मुंबईत व अल्पकाळ कल्याणमध्ये होते.त्यांचे या वेळी इंग्रजी काव्यग्रंथांचे वाचन बरेच होते. कीट्सचे 'Endymion' व शेलेचे 'Prometheus Unbound'चे त्यांनी वाचन केल्याची नोंद आढळते (समग्र केशवसुत : सं. भ. श्री. पंडित, ५७). 'ते नेहमी आपल्या नादात गर्क दिसत, ते आपली काव्ये म्हणून दाखवीत, त्या वेळी त्यांच्या नजरेत चांगलेच तेज चमकू लागे' ... इत्यादी तपशीलही (या काळातला) आपणांस मिळतो. 'या वेळी केशवसुतांनी टेनिसनचे काहीच वाचले नसावे.' असेही वि. रा. जोशी यांनी आवर्जून नोंदविले आहे. ह्या माहितीच्या आधारे केशवसुतांची इंग्रजी कविता आणि याउलट त्यांच्या इंग्रजी कवितेच्या आधारे ही माहिती, आपणांस परीक्षून घेता येईल, आणि त्यातून निघणारे निष्कर्ष फार महत्त्वपूर्ण आणि मूलगामी ठरतील, असे वाटते.

केशवसुतांच्या ह्या इंग्रजी पाच कवितांमध्ये प्रकट झालेली जीवनानुभूती आणि कविप्रकृती थोडक्यात अशी आहे -

'... हे जग दुःखाने परिपूर्ण भरले आहे; येथील जीवमात्राच्या कपाळी दैन्य-यातना लिहिल्या आहेत. येथे दैनंदिन गरजांची सुरी जिवाला उभी चिरीत जाते - ही पृथ्वी अंतर्बाह्य कठीण (hard) आहे...

---

(या पाचही कवितांचे मराठी अनुवाद येथे दिले आहेत. हे अनुवाद पद्यरूपात नाहीत आणि अगदी शब्दशःही केलेले नाहीत; शेवटच्या कवितेच्या अनुवादासाठी मुक्तशैलीचा अनिर्बंधपणे वापर केला आहे. केशवसुतांच्या इंग्रजी कवितांची सुरस आणि समर्पक अशी मराठी काव्यरूपे मराठी सिद्धहस्त कवींनी करणे इष्ट आहे; तोवर हा गद्यानुवाद बराच उपयुक्त ठरेल !)

‘आपले दैव प्रतिकूल आहे; ते नेहमीच आपल्या आड येते, वैर साधते; आपला जीवनवृक्ष त्यामुळे विशीर्ण झाला आहे. ...

‘या व्यावहारिक गद्य जिण्याची केशवसुतांना चीड आहे; माणसांच्या वर्दळीचा त्यांना उबग आला आहे.हे जग म्हणजे घोंघावणाऱ्या मधमाश्यांचे पोळे आहे. हे सोडून एकांतात, विजनात केशवसुतांना काही विशेष समाधान लाभते...

‘या जगाचा विचारही मनात यायला नको म्हणून ते कल्पनाजाल विणीत बसतात; कल्पनेच्या बरसातीत न्हाऊ पाहतात. काळे ढग दूर जावेत आणि चंद्रामृत पिण्यास मिळावे; हृदयाला पंख फुटून आकाशगंगेच्या पट्ट्यावरून फिरावयास जावे, कोकिळपक्षाने आपल्या घरी यावे, अशी स्वप्ने ते पाहू लागतात, आणि त्यात इतके रंगून जातात की ती स्वप्ने प्रत्यक्ष साकारच झाली आहेत, असेच त्यांना वाटू लागते. कल्पनाविलास आणि स्वप्नरंजन यांत ते रमतात...

‘निसर्ग त्यांना भाग्यवान (Blessed) वाटतो; त्याला मानवी दुःखाची दाद ना फिर्याद! सुंदर, खेळकर, आनंदी असा हा निसर्ग आहे.त्याच्या ठायी ‘Spirit’s grace’ आहे. ‘कवी होणे’ हे केशवसुतांचे महत्तम स्वप्न होय; महत्तम ध्येय होय!

“To bend low at a Poet’s feet,
And at its source to taste
his rhyme!’

ही त्यांची मधुरतम जीवनेच्छा होय! आपली प्रतिभा आटली, कवित्वशक्ती गेली तर आपण ‘काव्या’चे जिवंत थडगे होऊ ही त्यांची भावना आहे.आपल्या ‘कवित्वा’चे भविष्यकाळात रसिकांना स्मरण व्हावे, ही त्यांची इच्छा आहे (?).

‘कवी आणि कविता याबरोबरच केशवसुतांची ‘अपरकवितादैवता’वरील भक्तीही दृढ आणि खोल आहे. पत्नी ही देवतागुणरूप आहे; या भक्ताने फुले खुडायची ती तिच्या पूजेसाठी! ‘अहंकार तिच्या पायी अर्पण करून हा पूजाप्रारंभ होतो. हे प्रेम ध्रुवताऱ्यासारखे अविचल, स्थिर आणि हृदयंगम आहे... ...’

केशवसुतांच्या इंग्रजी कवितांतून आढळून येणारी जीवनप्रवृत्ती ही Romantic प्रवृत्ती होय. रोमँटिक वाङ्मयात अगत्याने आढळणाऱ्या, अगदी निवडून काढलेल्या गुणधर्मातील ‘Delight of desolation’, ‘Silence’, ‘Remoteness’ या गुणधर्माचा उघड

आविष्कार या कवितांत आहे. इतका की, इंग्रजी रोमँटिक कवितेतील नित्य आढळणारी ‘A lowly grave with flowers crowned’ हीएका गीतात भावचिंतनाचा विषय झाली आहे. केशवसुतांच्या मराठी कवितेत अशी कबर किंवा समाधी कुठेही येत नाही. ‘‘Flowers From a Grave’ मध्ये कबरीत चिरनिद्रा घेणारी व्यक्तीच कबरीवरील फुलवेलीचे पोषण करते, अशी जी कल्पना आहे ती उमर खय्यामच्या

And this delightful Herb
Whose tender Green
Fledges the River's Lip on
which we lean -
Ah, lean upon it lightly !
for who knows
From what once lovely lip
springs unseen ! (रुबाई - १९)

या रुबाईची आठवण करून देणारी आहे.अर्थात केशवसुतांच्या काळी मराठी काव्यरसिकांना आणि कवींना उमरचे वेड लागलेले नव्हते; टागोरांच्या ‘गीतांजली’च्याही वेडाआधी वीस वर्षे ही कविता केशवसुतांनी केलेली आहे. शेली, बायरन, कीट्स यांच्या भावकवितांशी समरस, तन्मय झाल्याने, आणि मूलतःच त्यांच्याशी समानधर्मित्व असल्याने केशवसुतांची कल्पनाशक्ती अशी सहजतेने भावस्पंदने चित्रित करीत होती.

पालग्रेव्हच्या ‘Golden Treasury’ मध्ये कवी ‘ग्रे’ची ‘Elegy written in a country Church-Yard’ या शीर्षकाची जी कविताआहे तीमध्ये कबरीतील जीवात्म्यासंबंधीच्या कविभावना व्यक्त झाल्या आहेत;

Perhaps in this neglected
spot is laid
Some heart once pregnant
with celestial fire;
Hands, that the rod of
empire might have sway'd,

Or waked to ecstacy
the living lyre :

इत्यादीमधील भावना बीजरूपाने केशवसुतांच्या अंतर्मनात असणे संभवनीय आहे. केशवसुतांची Golden Treasury ची पारायणे आणि त्यातही 'ग्रे'च्या ह्या कवितेची लोकप्रियता ध्यानी घेता केशवसुतांचा 'कबरीशी' झालेला हृदयसंवाद कसा प्रकटत गेला ते समजून येते. कवी 'ग्रे'च्या याच कवितेत 'Far from the madding crowd's ignoble strife' ही वृत्तीही व्यक्त झाली आहे.केशवसुतांनी 'Sick of the busy haunts of men' या शब्दरूपांनी तेच म्हटले आहे. येथे 'ग्रे'च्या कवितेशी केशवसुतांच्या 'Flowers from a Grave'या कवितेची तुलना करायची नाही; दोन्हीतील अनुभवसृष्टी अगदी भिन्न आहेत; पण काही कल्पना, काही अभिव्यक्तीचे सादृश्य आढळते, हे मात्र खरे !

'To a Poet' मधील स्वप्नरंजनात जितकी विमुक्तता आणि अलौकिक सौंदर्याच्या आस्वादाची उत्सुकता आहे तितकी केशवसुतांच्या मराठी भावकवितेत ती उतरलेली नाही. या इच्छास्वप्नांतून त्यांचे रोमँटिक मन एका आदर्श विश्वाच्या भेटीला निघाले आहे; जे अलौकिक आणि अमर आहे त्याच्याशी आपले नाते जोडून बसले आहे ! कोकिळ पक्ष्याला मरण आहे पण त्याच्या संगीताला मृत्यू स्पर्शू शकत नाही ! आकाशातील चंद्रामृताचे तळे कधीही आटणारे नाही ! स्वर्गंगेचा दिव्य मार्ग विशुद्ध आणि अक्षुण्णच राहणार ! केशवसुतांना हवा आहे तो ह्या निष्कलंक, परमनिर्मळ, नितांतसुंदर, अक्षयानंदरूप, निर्लेप सृष्टीतला मुक्त रम्य विहार ! या स्वप्न-सृष्टीत मानव नाही. पृथ्वीवर स्वर्गसमक्षता पाहू बघणारे नंतरचे केशवसुत ऐन पंचविशीत स्वर्गीय वास्तवातच जणू प्रत्यक्ष विहरत होते आणि या दिव्यत्वाचे द्रष्टे म्हणून 'कवि'-कोटीची पूजा करीत होते ! केशवसुतांच्या स्वर्ग-धरेच्या चुंबनाची ही वेगळी प्राथमिक मनोभूमी आहे; उत्तरकालीन गूढवादाची पूर्वावस्था (pre-mystic and pro-mystic) येथे जाणवते.

प्रत्यक्षपणे निसर्गाला वाहिलेली अशी केशवसुतांची मराठी कविता आढळत नाही. फुलपाखरू, भृंग, पुष्पाप्रत इत्यादी कविता या निसर्गदर्शनात्मक म्हणण्यापेक्षा आत्मचिंतनपरच अधिक आहेत, आणि या आत्मचिंतनातून जीवनार्थ व्यक्त झालेला दिसतो. 'The Waves' मध्येही कविमनाची हीच भावप्रतिक्रिया असल्याचे स्पष्ट होते; आणि त्यातील जीवनचिंतनार्थही तोच-म्हणजे 'Nature is blessed and, men and creatures are miserable' हाच ! फक्त पुष्प-पतंग यापेक्षा 'The Waves' हा विशाल-विस्तृत-विलोल

दृक्-संवेदना घडविणारा असा विषय आहे आणि त्या दृक्-संवेदनांचे काहीसे चित्रण येथे केशवसुतांनी केलेही आहे.शिवाय सूर्यकिरण आणि सागरलहरी यांच्यातील एक भावबंधही येथे सूचित झाला आहे. सूर्यकिरणांच्या स्पर्शाने भावपुलकित झालेल्या सागरलहरींचे खेळकर हसणे-नाचणे, आणि दिनान्तीच्या सूर्यकिरणांच्या निरोप-चुंबनाने लहरींचे आतल्या आत विरत-विरत जाणे, यात काही भावनिक संबंध केशवसुतांना अभिव्यंजित करायचा आहे. 'Sunlit Sea' आणि 'Sunless Ocean' या दोन विरोधी अवस्थांतील सागरलहरींचे जीवन येथे चित्रित झाले आहे.केशवसुतांच्या मराठीतील निसर्गकवितांपेक्षा 'The Waves'मध्ये निसर्गसौंदर्यचित्रण आणि निसर्गदर्शन याकडे केशवसुतांचे बरेच स्वतंत्र असे लक्ष गेलेले आहे.

'An apology to a Flower' आणि 'The Star of Constant Love' या कवितांतील प्रणयभावनांचे चित्रण केशवसुतांच्या मराठी कवितेतील प्रणयभावनेपेक्षा अधिक अशारीर म्हणजे मानसिक स्वरूपाचे आहे. केशवसुतांच्या मराठीतील प्रेमकवितांतून चित्रित झालेला विप्रलंभ शृंगार आणि उत्तानता ही संस्कृत काव्यातील रीतीशी जुळणारी आहेत, तर इंग्रजी कवितांतील प्रेमदर्शन हे इंग्लिश रोमँटिक कवींच्या कवितांतील चित्रणाशी अधिक जवळचे आहे. यात 'The thoughts of parting at the dawn' आणि 'all claims of self' टाकून दिल्याची अनुभूती आहे. प्रेमानुभूतीतील एकनिष्ठता, अचलता, आत्मलोप, ऐकांतिक भक्ती यांचाच भावोत्कट आविष्कार या गीतांतून झाला आहे.

काव्यकलेला किंवा कविप्रतिभेला केशवसुतांनी 'Promethean Spark' असे म्हटले आहे.('Flowers from a Grave') प्रॉमेथिअस ही ग्रीक पुराणातील मुळात अग्निदेवता.'Prometheus, the Fire bearer' असे संबोधिले गेलेही आहे. शेलीच्या 'Prometheus Unbound' या 'काव्यरूप नाटका'त (Lyrical Drama) 'प्रॉमेथिअस' जो दाखविला आहे, तो 'आदर्श मानव' म्हणूनच. या नाटकाच्या प्रस्तावनेत शेली म्हणतो, ''Prometheus is, as it were, the type of the highest perfection of moral and intellectual nature, impelled by the purest and the truest motives to the best and noblest ends.'' प्रॉमेथिअस हा मानवधर्माचा प्रवक्ता होता; त्याने 'अग्नी' आणि 'कला' मानवांना दिल्या. याचा क्रोध येऊन झीअसने त्याला विजनातील एका मोठ्या शिळेवर खिळ्यांनी ठोकून टाकले होते; तरीही तो शरण गेला नाही; त्याची इच्छाशक्ती आणि सहनशक्ती कल्पनातीत होती. ... ... 'In addition to courage and majesty, and firm and patient opposition

to omnipotent force, he (Prometheus) is susceptible of being described as exempt from the taints of ambition, envy, revenge and a desire for personal aggrandisement', असे प्रॉमेथिअससंबंधी शेलीने आणखी म्हटले आहे. १८९१ ते १८९४ या काळात केशवसुतांनी Prometheus Unbound वाचल्याचा उल्लेख मागे आला आहे. तेव्हा 'Promethean Spark' हा शब्दप्रयोग करताना केशवसुतांना काय अभिप्रेत होते, ते सहज ध्यानी येईल. मानवाला पूर्णत्व आणून देणारी, पृथ्वीला सुरलोकसाम्य देऊ शकणारी सर्जनशक्ती, म्हणजे ही 'प्रॉमेथिअन स्पार्क' होय.

या 'प्रॉमेथिअन स्पार्क'चा उल्लेख ज्या कवितेत आला आहे ती कविता २३ फेब्रुवारी १८९२ रोजी लिहिलेली आहे.या आधी एक वर्ष केशवसुतांनी 'कल्पकता' (१७ फेब्रुवारी १८९१) आणि त्याही आधी सहा महिने 'दिव्य ठिणगी' (२७ ऑगस्ट १८९०) ह्या दोन कविता लिहिल्या. ही 'दिव्य ठिणगी'च पुढे 'Spark Promethean' म्हणून अवतरली असावी. कवी, कविप्रतिभा, काव्यहेतू, काव्यप्रभाव यासंबंधीच्या त्यांच्या मराठीतील साऱ्या कवितांचे अर्थ 'Spark Promethean' या एका संज्ञेत स्पष्ट होतात. अनन्वित हालअपेष्टा भोगल्याशिवाय प्रॉमेथिअसला आपली तत्त्वे आचरता आली नाहीत; कलावंत, शास्त्रज्ञ किंवा कवी यालाही दिव्यतत्त्वांसाठी असेच तपश्चरण करावे लागते; आत्मबलिदानाची तयारी ठेवावी लागते ! केशवसुतांनी आपल्या 'दिव्य ठिणगी' या कवितेत हे व्यक्त केले आहे; शिवाय कवी आनंदीरमण यांना लिहिलेल्या पत्रातही त्यांनी म्हटले आहे की, कविता म्हणजे आकाशीची वीज आहे; ती धरू पाहणारे शेकडा ९९ आपणास होरपळून मात्र घेतात... वाणी ही फार मोठी देणगी आहे. सामान्य देवतांच्या आराधनास सुद्धा फार जपावे लागते; मग या देवतेच्या आराधनास किती जपावे लागेल बरे!' ... कवी आणि कल्पकता यासंबंधी केशवसुतांच्या कल्पना किती विशाल आणि उच्च आहेत, ते ध्यानी घेतले म्हणजे

- ''Ah ! should in me the poet die,
... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...
And should I continue to be
- How hard to speak it out !
A living tomb of Poesy

Far worse than death no doubt-''

या कवी केशवसुतांच्या उद्‌गारात अतिशयोक्ती नाही तर सत्यता आहे हे पटते! केशवसुत म्हणजे 'The Spark Promethean'चे अर्वाचीन मराठी कवींतील पहिले उद्‌गाते! पहिले प्रवक्ते!!

केशवसुतांच्या मनावर, कल्पनाशक्तीवर, प्रतिमासृष्टीवर आणि रचनापद्धतीवर इंग्रजी रोमँटिक कवींचा किती प्रभाव पडला आहे, याची प्रतीती त्यांच्या या इंग्रजी कवितांवरून अधिक उघडपणे येते. भाषा बदलली की कलावंताचे हृदयधर्मही बदलतात, असे नाही. केशवसुतांच्या इंग्रजी कवितांनी उलट केशवसुतांचा मूळ कविधर्म 'रोमँटिक'च आहे, हे पटण्यास साहाय्यच होते.ह्या इंग्रजी कविता वाचताच केशवसुतांच्या कवितेचे 'नवेपण' निर्भेळ स्वरूपात झटकन दृष्टिगोचर होते. एक गूढवाद आणि सामाजिक बंडखोरीची जाणीव वगळली तर केशवसुतांच्या मराठी कवितांतून प्रकट झालेल्या साऱ्या नव्या जाणिवा, आपल्या अनिर्बंध मूळ रूपात या पाच कवितांतून प्रकट झाल्या आहेत. केशवसुतांचे समानधर्मित्व शेली, कीट्स, वर्डस्वर्थ या रोमँटिक कवींशी आहे. त्यांच्या ठायी असलेला कवी, जे अनुभव घेतो आणि त्यांची अभिव्यक्ती करतो, ते या रोमँटिक कवींच्या रीतीने! केशवसुतांची इंग्रजी कविता पूर्णतः रोमँटिक आहे, आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी! मराठी आणि संस्कृत काव्यपरंपरेहून अगदी भिन्न जातीची आणि परंपरेची ही कविता आहे; फार काय सामाजिक क्रांतीच्या जाणिवेचा रंग येथे तिच्या अंगकांतीत उतरलेला नाही. त्यामुळे तिच्यातील भावनांचे, स्वप्नांचे रूप एकेरी असले तरी ते ठळक आणि स्पष्ट आहे!

शेली, कीट्स, वर्डस्वर्थ आदींच्या कवितांपुढे केशवसुतांच्या या कविता जातितः वेगळ्या वाटणार नाहीत. याच प्रकृतीचे त्यांचे इंग्रजी कवितांचे लेखन आणखी होत गेले असते, तर त्यांना इंग्रजी कवींमध्ये स्वतंत्र स्थान मिळाले असते का? असाही प्रश्न मनात उपस्थित होतो. ह्याबाबत एवढे म्हणता येईल की, इंग्रजी रोमँटिक कवींमध्ये केशवसुतांना, आत्मानुभूतीचे प्रामाणिक आणि भावोत्कट चित्रण करणारा, आपला एक समानधर्मा म्हणून ओळखण्यास कोणासच कठीण गेले नसते ! मराठी कवितेतील जनकत्वाचा मान मिळविणारे केशवसुत, रोमँटिक कवींच्या घराण्यातील एक जातिवंत कवी म्हणूनच राहिले असते.केशवसुत हे इंग्रजी रोमँटिक कवींचे केवळ अनुकरण करणारे कवी होते, असे म्हणणाऱ्यांसाठी, मला शेलीचे, या संदर्भातले, एक स्पष्टीकरण आवर्जून द्यावेसे वाटते. -

... 'It is impossible that any one who inhabits the same age, with such writers as those, who stand in the foremost ranks of our own, can conscientiously assure himself that his language and tone of thought may not have been modified by the study of the productions of those extraordinary intellects. It is true, that, not the spirit of their genius, but the forms in which it has manifested itself, are due less to the peculiarities of their own minds than to the peculiarity of the moral and intellectual condition of the minds among which, they have been produced. Thus a number of writers possess the form, whilst they want the spirit of those whom, it is alleged, they imitate; because the former is the endowment of the age in which they live, and the latter must be the uncommunicated lightning of their own mind...'

कवी केशवसुत हे मनाने शेली-बायरन-कीट्स-वर्डस्वर्थ यांच्या काव्यसृष्टीत वावरत होते; कविप्रवृत्तीने ते त्यांचे समानधर्मी होते. पण समानधर्मित्वामुळेच त्यांच्या कवितांतून त्यांची स्वतःची स्वतंत्र 'Spark Promethean' सतत चमकत, झळाळत होती! त्यांची मराठी कविता जितकी त्यांची आहे, तितकीच त्यांची इंग्रजी कविताही त्यांची स्वतःचीच आहे! तिच्यामध्ये उथळ अनुकरणापेक्षा समानधर्मी कलावंताचे आत्मानुभूतीचे उत्स्फूर्त उन्मेषच अधिकांशाने प्रत्ययास येतात. कवीला अशा समानधर्माची, त्याच्या समस्पंदनाची खूप अपेक्षा असते; कवी केशवसुतांनाही ही अपेक्षा आहे. 'Flowers from a Grave' मध्ये हे हृदयातले सूर ऐकून कोणी पांथस्थाने क्षणभर थांबावे, ही अपेक्षा साशंकपणे व्यक्त झाली आहे. उमर खय्यामची एक रुबाई आठवते -

That ev'n my buried
Ashes such a snare
Of Perfume shall fling up
into the Air,
As not a True Believer
passing by

But shall be overtaken

unaware.

( रुबाई ६८ )

भास्करराव तांबे यांच्या ‘रे अजात अज्ञात सखे जन !’ या गीतातील भविष्यकाळातील समानधर्मी रसिकांपुढे कवीने केलेल्या हृदयाविष्करणातील आर्तताही अशीच तीव्रतेने जाणवते.

* * *

मूळ लेख : ‘केशवसुतांची इंग्रजी कविता’

‘युगवाणी’ - ऑक्टोबर १९६६

## ५. केशवसुतांचा भृंगधर्म

केशवसुतांची 'भृंग' ही कविता वाचताना आपण नकळत बालकवींची तर कविता वाचीत नाही ना, अशी भावना होते.केशवसुतांच्या 'भृंग' या कवितेचे बालकवींच्या 'निर्झरास' या कवितेशी कितीतरी अंतरंगसाम्य आहे. वृत्तीची तन्मयता आणि उद्गारातील अपरिहार्यता, सहजता यांनी तर ही भावना बळावते. एक धुंद आणि बेहोष अनुभव या दोन्ही गीतांत उस्फूर्तपणे प्रकट झाला आहे.

'भृंग' ही कविता म्हणजे, आत्मानंदात पूर्णपणे मग्न असलेला एक दिव्य गायक भेटताच, एका कविहृदयाला जे उत्कटत्वाने जाणवले त्याचे उत्स्फूर्त गीत होय. भृंग हा सृष्टीचा गायक आहे, त्याचे गान म्हणजे सृष्टीचे कवन आहे, भृंग हा केशवसुतांचा आदर्श कविगायक आहे. हा भृंग 'नादी' आहे; आपल्याच गुंजारवात तो 'दंग' झाला आहे.तो सृष्टीशी तन्मय झाला आहे; जगाविषयी तो उदासीन आहे; आणि यामुळेच त्याचे गान 'परमानंदे परिपूर्ण' झाले आहे.लौकिकाचे भान हरपलेल्या या भृंगाच्या गीतातून 'प्रीति-चारुता-आनंद' यांचे निस्यंद झरत आहेत.

**– फुले फुलति, परिमल सुटती,**
**रस गळती–गुङ् सौख्य किती !**

असे कवी उद्गारतो.भृंगासारखे आपणही गुंग व्हावे, 'प्रीति-चारुता-आनंद' यांचे मधुरच्छंद गात गात, गोड फुले चुंबीत चुंबीत भुंग्यामागून लहरत जावे, असे केशवसुतांना होऊन जाते. केशवसुतांच्या रोमँटिक कविहृदयाला निसर्गाच्या या स्वच्छंद गायकाच्या जीवनात अलौकिकत्व, दिव्यत्व, अमरत्व, आदर्शत्व प्रतीत होते ! त्यानेच ते वेडावून जातात.

कवी केशवसुत हे मराठी काव्योद्यानातील एक 'नादी भ्रमर' होते; सृष्टीतल्या नादी भ्रमराच्या आदर्शाने वेडावलेले ते मराठीतले पहिले भावकवी होते.भृंगाची विशुद्ध रसिकता, त्याची मधुसेवनवृत्ती, आत्मलीन स्थिती, जगाविषयी उदासीनता आणि हृदयांतरीची परमानंदपूर्णता यांची केशवसुतांच्या मनाला स्वाभाविक ओढ होती. या ध्यासाने ते स्वतः 'भृंग' होऊ पाहात होते, पण त्याच वेळी त्यांना हेही समजत होते की, मानवदेहधारी बद्ध आत्म्याला हे जमणे शक्य नाही.

आपण 'जग' विसरू शकत नाही, 'वयस्कता' टाकू शकत नाही; आपणांस 'प्रौढत्वी निजशैशव' जपता येत नाही, 'मुग्ध मधुबाल्यी' आपणास रमता येणार नाही, तल्लीनतेच्या आड आपले प्रौढत्व नित्य येत राहणार, यामुळे आपल्या नशिबी सुंदरतेलाही कुसे लागलेली असणार प्रत्यक्षानुभूतीमुळे केशवसुतांना, जगाविषयी बेफिकीर असलेल्या आणि स्वतःमध्ये पूर्णपणे दंग असलेल्या भुंग्याची पराकोटीची ओढ लागते. वस्तुतः आपण आणि आपली कविता यांमध्ये तिसरे कोणी आलेले केशवसुतांना नको आहे. कवीला त्याच्या कवितेबरोबर सोडून द्यायला हवे, म्हणजे मग कवितेमध्ये स्वाभाविक गोडी प्रकट होते आणि 'कवी आणि कविता यांच्या गोड लीलांनी' रसिकांना आपोआपच आनंदलाभ होतो. 'काव्य करायचे आणि ते गुणगुणत त्यातच गुंगून जायचे' हाच काव्याचा खरा सुंदर हेतू होय, असे केशवसुत झटकन बोलून जातात. कवी आणि काव्य यांच्यामधली ही आदर्शावस्था म्हणजेच हा 'भृंगधर्म' होय. आपल्या प्रिय पत्नीच्या विरहाने तिच्या आठवणींची जी भावकवने केशवसुतांनी गायिली, ती कवने नव्हतीच तर, जसे

**'विदेशी गे भुंगा प्रियकर कळीला स्मरूनि तो**
**स्वगुंजालापाला फिरुनि फिरुनी घेत असतो'**

तसे फिरून फिरून घेतलेले, गायिलेले ते गुंजालापच होते.('अपरकविता दैवत'). भृंग होऊन तादात्म्यगीत गाण्यासारखा दुसरा कोणताच परमानंद केशवसुतांना वाटत नसावा.[२]

भुंग्यासारखे बेभान झाल्याशिवाय, तल्लीन झाल्याशिवाय, स्वतःला हरविल्याशिवाय खरे संगीत जन्मूच शकत नाही, हे केशवसुतांनी अनुभविलेले असावे. ह्या अनुभूतीविना कलासंभव नाही, हाच 'झपूर्झा'चा बीजमंत्र आहे.'झपूर्झा' ही स्थिती तल्लीनतेची, बेभानतेची, आत्मलीनतेची आहे; ही अवस्था आदर्शरुपात हर्षशोकातीततेची असते; म्हणजेच ती

[२] परिशिष्ट १ पाहावे.

'परमानंदे परिपूर्णते'ची असते. जगाचे भान विसरून, जरा निःसंगपणा धरल्याशिवाय देहा-मनाचा 'झपूर्झा' होत नाही.

**– 'मारा फिरके**
**मारा गिरके'**
**नाचत गुंगत म्हणा म्हणा –**
**'झपूर्झा गडे झपूर्झा !–'**

ही मनोवस्था आत्मविसर्जनाची आणि तदुद्‌भव परातत्त्वदर्शनाची होय; अंतिम सत्याचा सुंदर साक्षात्कार या मनोवस्थेतच घडतो.भृंगाची स्थिती ही 'झपूर्झा'चीच स्थिती आहे.

**'गुङ् गुङ् गुङ् गुङ् ! – भान नसे !**
**सृष्टि अहा गुङ् ! मधुर असे !'**

भृंगाचे गान हे स्वभावसुंदर आहे. ते जन्मते तेच स्वतःची स्वरलय घेऊन; गणमात्रा जुळविण्याचा कृत्रिम खटाटोप त्याला करावाच लागत नाही. 'पिंजऱ्यातील पोपटाला आम्ही मानवांची वाणी बोलायला लावू, श्रुतिवैचित्र्य साधू; पण निसर्गसुंदर गुंजारव गानाची सर आमच्या गीताला येणार नाही; आमची वाणी अपुरी, असमर्थ, असुंदर होय. आमची गीते म्हणजे वाणीची लक्तरे होत. दिव्यत्वाचे रूप चित्रिण्याला आमच्या शब्दांच्या चिंध्या अगदी निरुपयोगी आहेत; पुष्पाच्या दिव्यतेचे स्तोत्र गायला कवीची मानवी वाणी अपात्र आहे; भुंगेच हे स्तोत्र सुरेख गाऊ शकतात.' असे केशवसुत आवर्जून सांगतात. ('पुष्पाप्रत' क्र. ६४) भृंगगान हे स्वरसौंदर्याचे, नादमाधुर्याचे, पूर्णानंदावस्थेचे प्रतीक आहे; ते जणू सर्वांगाने संपूर्ण असे भावगीत आहे; तादात्म्यगीत आहे, केवलानंद आहे, असा की त्याच्या श्रवणाने सर्व 'खंती' पळून जातात.

**'प्रीति, चारुता, आनंद**
**सिंचिति सृष्टीचा कंद !'**

याची प्रचीती घडविण्याची अलौकिक शक्ती भृंगगानात असल्याचे केशवसुतांना जाणवते.

केशवसुतांची 'फुलपाखरू' या नावाची एक कविता आहे. (क्र. ११५). या कवितेत 'पुष्पपतंगस्थिती' हा एक सामासिक शब्द आढळतो; त्याचा थोडासा अधिक विचार या

संदर्भात करावासा वाटतो. 'भृंग' आणि फुलपाखरू' यांच्या संबंधीची केशवसुतांची भावनात्मक प्रतिक्रिया मूलतः सारखीच आहे. 'कलिकांवरून, पुष्पांवरून गंधयुक्त अवकाशामधून पुष्पपराग सेवीत हिंडणारे, वनश्रीतून निर्वेधपणे इकडे तिकडे बागडणारे फुलपाखरू, त्याला 'उद्या'चा विचार करायला नको, सृष्टीच्या दाहकतेचा त्याला स्पर्श होत नाही, त्याला 'मरण'च नाही-केशवसुतांचे 'फुलपाखरू' किंवा 'भृंग' हे वास्तव सृष्टीतील जीव नाहीत; ते केशवसुतांच्या भावसृष्टीतील 'निर्वेधता, स्वच्छंदता, निरामयता, केवलानंदमयता, अमरता' या गुणांचे, प्रतीक आहेत. फुलपाखरापेक्षा भृंगाच्या ठायी 'संगीताच्या सामर्थ्याची जोड असल्याने तर 'भृंग' हा केशवसुतांच्या कल्पनासृष्टीत एका आदर्श-अमर कवि-गायकाचीच पदवी मिळवून राहिला आहे. 'भृंग' आणि 'फुलपाखरू' या दोन्ही : कवितांत निसर्गस्थिती आणि भ्रमर किंवा फुलपाखरू यांची तरलगती यांवर काही अमूर्त कल्पना करण्यात आल्या आहेत. 'अरुणोदयांनंतर प्रकाश-तिमिर-धुके यांनी काहीशी अंधुक, काहीशी उज्ज्वल दिसणारी सृष्टी ही जिच्या अंतःकरणात अर्धस्फुट काव्यकल्पना प्रकाशल्यामुळे अर्धतिमिरावस्था दाटली आहे अशा एखाद्या कवयित्रीसारखीच भासते. फुललेल्या कलिका म्हणजे या सृष्टिकवयित्रीच्या प्रतिभेमध्ये फुलणाऱ्या कल्पना होत; आणि त्या कलिकांतून पसरणारा सुगंध म्हणजे या काव्यातील रस होय. अशा या सृष्टीचे कवन म्हणजे 'भृंगाचे गाणे!' - याचा अर्थच हा की भृंगगीत म्हणजे पुष्पसुगंधित, प्रसन्न अशा सृष्टीच्या आत्मानंदाचे सहजोच्छ्‌वास-सहज हुंकारगीत! कमल-भृंग, पुष्प-पतंग यांच्या अखंड साहचर्यातून, सामरस्यातून हे भृंगगीत जन्म पावते.ही 'पुष्प-पतंग-स्थिती' आम्हा मानवाला मिळत नाही, यामुळे केशवसुतांचे मन खिन्न होते.

केशवसुतांची पुष्पाकडे पाहण्याची दृष्टीही पार्थिव नाही किंवा वस्तुनिष्ठ नाही; ती रोमॅन्टिक आहे.पुष्प हेही चिरतारुण्याचे, चिररुचिरतेचे, दिव्यतेचे मूर्तरूपच त्यांना वाटते. फूल म्हणजे उषेचे सुरेख मूल असून आपल्या सुवासजालाने जगातले सारे दृष्ट दर्प मारून टाकण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी आहे : (पुष्पाप्रत-क्र. ४१). 'फुलातले गुण'(क्र. ७७) सारख्या काव्यदृष्ट्या साध्या कवितेतही बांधावरल्या (साध्या) झुडपावरील एका फुलामध्ये दिसणारा सद्‌गुणसंघच केशवसुतांनी निवेदिला आहे. सुंदरता, प्रीती, मार्दव, सुगंधाची जादू हे तर नित्याचे पुष्पधर्म तेथे आहेतच; पण त्याहीपेक्षा फुलामध्ये मूलतः नसणारी संगीतशक्तीही

केशवसुतांनी जणू अनुभवून घेतली आहे. 'फुलातले गुण' ह्या गीतातील नऊ आणि दहा ही कडवी पाहावी.

**– आणिक या फुलामधी काय हो असे ?**
**ते काय हो असे ? –**
**तो जवळूनि मधमाशी**
**आली गुणगुणत अशी**
**''गाणे ते फुलामधे आणखी असे !''**
**ती बोलली असे !**
**पेल्यामधि पुष्पाच्या,**
**गुंगत ती त्याच वचा**
**शिरली; त्या वचनाची सार्थता भली**
**तो व्यक्त जाहली !**

अशी क्लुप्ती करून केशवसुतांनी फुलांमध्ये मधाबरोबर संगीतही असावे, ही आपली इच्छा जणू पूर्ण करून घेतली आहे. पुष्प आणि भृंग (फुलपाखरू, पतंग, मधमाशी) यांची मिळून जी एक सृष्टी केशवसुतांच्या भावविश्वात दिसून येते, तीत अविभाज्यता, तन्मयता, समरसता, आत्मविसर्जन, दिव्यता, परमानंदता यांचेच रंग भरलेले आहेत. या पुष्प-पतंग-स्थितीची ओढ कवी केशवसुतांना लागलेली आहे. भुंग्याच्या किंवा फुलपाखराच्या सान्निध्यामध्ये स्वतःच्या कमीपणाची, अपराधित्वाची आणि दुःखपूर्णतेची जी भावना कविमनाला व्यापून टाकते तीच, तशीच भावना पुष्पाच्या सान्निध्यातही त्यांच्या अनुभवास येते. पुष्प-पंतग-सृष्टीतील सौंदर्य, सुगंध, संगीत आणि सुमरंद हे पापघ्न, पावक आणि सुखद असे धर्म होत. भान हरपून या सृष्टीत गुंगून जावे, असे केशवसुतांच्या कविमनाला सारखे वाटत राहते, ते या गुणांच्या मोहाने ! इमर्सनच्या 'The Apology' या कवितेच्या भाषांतरात (सृष्टी आणि कवी, क्र. ८७) हा विचार सुंदर शब्दात परिणामकारकपणे व्यक्त झाला आहे.

**पुष्पामध्ये प्रकट होय न जे जराही**
**सृष्टीत एकही रहस्य असे न काही;**
**ज्याचा ध्वनी न उमटे खगकूजितात**
**नाही निगूढ इतिहास असा जगात !**

केशवसुतांची निसर्गकविता म्हणजे निसर्गसौंदर्यदर्शनाने होणाऱ्या बेभानतेची, त्यातून स्फुरणाऱ्या आत्मचिंतनाची, निसर्गाच्या ठायी आदर्श देखून त्यापुढे नम्र होणाऱ्या वृत्तीची, रोमँटिक प्रवृत्तीची कविता आहे.

केशवसुतांना पुष्पसृष्टीही अलौकिक, दिव्य, गुणमयी वाटली आणि भृंगाचे गान हे सृष्टीचे परमानदंपरिपूर्ण कवन वाटले, तरी एकूण निसर्गच आणि सारे खगकूजितच त्यांना सुंदर वाटते आणि वेड लावते.

**जेथे ओढे वनराजी**
**वृत्ति रमे तेथे माझी;**
**कारण काही साक्ष तिथे**
**मम या श्रेयाची पटते;**

'जेथे जन नाहीत' तेथे जाऊन त्या 'श्रेयाला' केशवसुत स्वच्छंदाने आळवितात, पण ते श्रेय 'स्व-भाव' दाखवून झटकन लोपून जाते, हरपते! हे 'श्रेय' म्हणजे 'स्व'-चे भान हरपणे; शुद्धता-उदात्तता-दिव्यता यात विरून जाणे आणि परमानंदपरिपूर्ण होणे, हे होय. भुंग्याला हे निजश्रेय सापडले आहे; नव्हे, जात्याच ते त्याच्या ठायी आहे. यामुळे त्याचे गान हे सृष्टीचे दिव्य, अक्षय आनंदगान होय, आणि म्हणूनच स्व-मध्ये गुरफटलेल्या मानवाचे गान हे चिंधी-किंमतीचे होय! प्रौढत्वी निज शैशव ज्याला जपता येईल त्याला हे गान गाता येते, कारण मग त्याला जनमर्यादाच उरत नाही. (कारण त्याला तिचे भानच नसते.) त्याचा सौदाही चुकत नाही (कारण 'सौदा' म्हणजे काय हे त्याला ठाऊकही नसते) आणि त्यामुळे काहीतरी चुकचुकल्यासारखे होऊन बावरून जाण्याचे त्याला कारणही उरत नाही. मधुसेवन करीत गुंजनगीत गात गात, स्वतःचे आणि स्वतःभोवतालच्या सृष्टीचे भान हरपून आत्मानंदात लहरत जाणारा जणू भृंगच तो बनतो; अणूंसवे उडून जाऊ पाहणाऱ्या त्यांच्या मनाला सारे 'हिरण्मय' दिसू लागते; पार्थिवाच्या अनुभूतीतून अशा हिरण्मयाची प्रतीती येणे, हा आधुनिक अध्यात्मयोगच होय! या अपार्थिव, अक्षय आनंदाच्या प्राप्तीसाठी जगाची सारी भीडभाड सुटावी लागते; जगातून उठावे लागते, म्हणजे मनातून स्व-अर्थी, संकल्प-विकल्पात्मक 'मानव' उठून निघून जावा लागतो, तरच 'परोक्ष'विषयी मन निगडित होते, आणि ते 'हिरण्मय श्रेय' एकदा हाती आले की कायमचे हाती राहते; ते स्वभाव दाखवून झटकन लोपून जात नाही, की हरपत नाही! त्याच्या दर्शनाने अखंडपणे आपल्या सर्व चित्तवृत्तीत आनंद स्रवू लागतो. कमलिनीच्या अंतःकोशात भान हरपलेला भृंग या आनंदाचे प्रतीक होय. केशवसुतांना काव्योद्यानातील भृंग व्हायचे आहे, म्हणजे 'भानहरपल्या मनाची,

तंद्रीची, अक्षयानंदाची स्वच्छंद गीते गायची आहेत. आकाशातील बंधनापलीकडील आणि पृथ्वीवरील सौम्यव्रत भृंग त्यांना व्हायचे आहे. लुटुपुटीच्या खेळातील स्वतःचा विसर पाडणारी आणि विशुद्ध क्रीडानंद देणारी स्वार्थशून्य बालवृत्ती, जाणत्या प्रौढवयी हवी असेल तर भृंगाची रसिकता आणि त्याची गुंगी लाभणे आवश्यक आहे.

**'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे;**
**गाणे मनात मग होय स्वयेचि जागे'**

अशी स्थिती व्हायला हवी आहे.हे मनात जागे झालेले गान हरवून जाऊ द्यायचे नसेल तर 'पुष्प-पतंगस्थिती' प्राप्त करून घेता आली पाहिजे.

या संदर्भात पाहिले असता केशवसुतांची 'म्हातारी' ही कविता 'भृंग', 'पुष्पाप्रत', 'फुलपाखरू' या आणि यासारख्या कवितातील भावानुभूती एकवट घेऊन आलेली आहे, असे दिसून येईल. हवेत म्हातारी स्वैरपणे भ्रमत आहे; केशवसुतांना ती 'मूर्त यदृच्छाच' वाटते.ती अजर आणि अमर आहे. अक्षययौवना अशा यक्षिणीच्या कुंजातून ती लहरत बाहेर पडली असावी, असे कविमनाला भासत आहे. म्हणजे पुष्पाप्रमाणेच 'म्हातारी' चिरतरुण आणि चिररुचिर आहे. फुलपाखराप्रमाणे तिला मरणही नाही. 'म्हातारी'वर खपुष्पाच्या कल्पनेचा आरोप केल्याने रंग आणि सुगंध हे पुष्पगुणही केशवसुतांना तिच्या ठिकाणी दिसून येत आहेत. तसेच 'म्हातारी' म्हणजे गंधर्वाचे विमान असून, सूक्ष्म देह धारण करून गंधर्व दिव्य गाणे आनंदाने गात गात विहरत आहेत, या कल्पनारोपाने म्हातारीजवळ मूलतः नसलेले संगीतसौंदर्यही केशवसुतांनी तिला देऊन ठेविले आहे. म्हातारीच्या मूळ स्वच्छंद विहाराला भृंगाच्या दिव्य संगीताची आणि पुष्पाच्या सौंदर्यसुगंधाची जोड लाभताच, म्हातारीसारख्या सामान्य गोष्टीतही प्रत्यक्षातून परोक्षात नेण्याचे महान सामर्थ्य अवतरल्याचा प्रत्यय केशवसुतांना येतो. बंधनरहितता, मुक्तमनस्कता, स्वच्छंदता या गुणांवर तर केशवसुतांना जीव ओवाळून टाकावासा वाटतो. या गुणांच्या दर्शनाने त्यांच्या चित्तावरचे संस्कृतीचे दडपण निघून जाते. पण 'वयस्कता' विसरू म्हटली तरी विसरली जात नाही; मुग्ध-मधु-बाल्याचे, कोवळ्या किरणी खेळण्याचे, पुष्पांचे दिन पार निघून गेलेले असतात. 'पातकी' प्रौढतेला गंधर्वगान ऐकूही येत नाही, की खपुष्पाचे दिव्य गंध आणि वर्ण त्याला कळतही नाहीत. कडेवरच्या तान्हुल्याला मात्र ते कळतात; प्रौढाला ते कळले तर पृथ्वीवर स्वर्गच अवतरेल. केशवसुतांचा स्वर्ग बालवृत्तीत, भृंगगानात, पुष्पगंधात, फुलपाखरू किंवा म्हातारी यांच्या स्वच्छंद विहारात सारखा मूर्त रूप घेत असतो.

भृंग, पुष्प, पतंग, फुलपाखरू किंवा म्हातारी यांच्याकडे केशवसुत वस्तुनिष्ठतेने पाहू शकत नाहीत तर त्यांच्या ठायी असलेल्या Spirit ने, प्राणतत्त्वाने मंत्रित झालेल्या दृष्टीने ते त्यांच्याकडे पाहतात-काही अलौकिक अनुभवतात. ते म्हातारीला उद्देशून म्हणतात,

**''स्वरूप सत्य तुझे मुळीही ते मजला नुमजे**
**तरी तुझ्या ठायी वसतसे अद्‌भुत ते काही,**
**प्रत्यक्षातुनि ते परोक्षी शीघ्र मला नेते;**
**तेथे स्वच्छंदे विचरता मोद मनी कोंदे.''**

आणि हा मनात कोंदलेला आनंद कवी गणमात्रात बांधू पाहतो.केशवसुतांच्या रोमँटिक कविमनाला पार्थिवतेत अपार्थिव, सामान्यात असामान्य, सुंदरतेत काही अद्‌भुत, असे भासमान होत होते.'भृंग' आणि 'पुष्प' याकडे पाहणारे त्यांचे रोमँटिक कविहृदय 'म्हातारी'मध्ये गूढतेकडे चाललेले दिसते. केशवसुत हे Nature-mystic आहेत. निसर्गदर्शनातून, निसर्गानुभूतीतून ते गूढतेत प्रवास करू लागतात. निसर्गसौंदर्य, पुष्पमाधुर्य आणि खगकूजित यांनी त्यांचे चित्त वेडे-बावरे होते. अज्ञातामधल्या ध्वनींचा अर्थ समजून घेण्यास ते व्याकुळ होतात. 'हा अर्थ कळला तर साऱ्या जगात भरून राहिलेला अंधार हटवून टाकण्याची ताकद माझ्या ठायी येईल', असे काहीसे भारून जाऊन ते उद्‌गारतात. पण आपल्यापुरतेच जगणाऱ्या प्रौढ माणसाला हे सौंदर्य, हे ध्वनी, हे गुंजारव आणि त्यांचे अर्थ कळू शकत नाहीत, आणि मग सारे जिणे कवडीमोलावरी विकले जाते !

ओढे आणि वनराजी, भृंग आणि पुष्प म्हणजे संगीत आणि सौंदर्य, प्रीती आणि चारुता, आत्मविस्मृती आणि दिव्यानुभूती. केशवसुतांना यांमध्ये खरा अक्षय आनंद मिळतो. बोल सतारीचे असोत की भुंग्याचे असोत, 'झपूर्झा'चे बेभान गान असो की म्हातारीचे कल्पनाकलित गंधर्वगीत असो, केशवसुत त्याने उन्मन होतात; दिवाळीच्या दिवसांत गावाबाहेर पडून गावाकडे खुशाल पाठ फिरवून, गिरणातीरावर वेड्यापरी गाऊन ते कालक्षेप करू पाहतात. पण केशवसुतांच्या मनाला आनंदाचे खरे भरते येते ते, जेव्हा संगीत हे पुष्पांचा सुगंध घेऊन येते; जेव्हा पुष्पे ही सकाळच्या कोवळ्या उन्हात तेजाळून निघतात; जेव्हा सकाळ ही मुलीच्या माहेरासारखी सुंदर असते; जेव्हा या मनाच्या माहेरी व्याप-संताप आणि पाप जन्मलेलीच नसतात, तर केवळ पुण्यच असते; जेव्हा ह्या पुण्यवेळी, आपल्याच नादात नाचत गात लहान मुली केवळ मौजेने फुले टिपतात, आणि आशेच्या वेलीवर जेव्हा गाणी फुलतात तेव्हा ! केशवसुतांचे हे खरेखुरे प्रिय विश्व आहे !

**किती सकाळ ही सुंदर,**
**जसे मुलींचे माहेर -**
**जगाचे ते व्याप**
**दुरि तैसे संताप**
**मनि न शिरे मुळि पाप;**
**पुण्याची ही वेळ पहा गे ! सूर्याने उजळली;**
**आशेचिया ग वेलीवरती गाणी ती फुलती;**
**तर, मौजेने या वेलीखाली**
**टिप् फुले टिप् ! माझे गडे ग ! टिप् फुले टिपू !**
**पहा फुलांची पखरण झिप् !**

मानवी जीवनातल्या परमानंदाची ही क्षणभंगुर घटिका केशवसुत मोठ्या त्वरेने पकडून ठेवू पाहतात. त्यांच्या हृदयाच्या हृदयातले दिव्यानंदाचे स्वप्न येथे भूवर अवतरले आहे. हे स्वप्नच त्यांना चिरंतनचे कोरून ठेवायचे आहे! निसर्गातला हा ताजेपणा आणि माहेरचे मोकळेपण घेऊन आलेल्या मनाची टवटवी केशवसुतांना प्रौढ जीवनातही यायला हवी आहे! मानव आणि निसर्ग यांचे हे प्रकाशप्रसन्न, सुगंधोल्लसित, जीवन-संगीत सकाळ संपून, ऊन तापताच पार वितळून जाते. 'हरपले श्रेय'मध्ये जे हरपले आहे ते म्हणजे ही 'सुंदर सकाळ' ! अस्वर्गीय, अशुचिष्मन्त, गद्य औदरिक मानवाच्या मलिनतेने ही सकाळ झाकोळून गेली आहे; नव्हे, सकाळ मरून तिच्या जागी केवळ काळ्या छायाच भरून राहिल्या आहेत; सुंदर सकाळी टिपलेल्या फुलांचे दुपारच्या उन्हात झालेले जे निर्माल्य, त्यात सुगंध, सौंदर्य आणि टवटवी शोधणाऱ्या, त्यासाठी जीव पाखडणाऱ्या आत्म्याचे, हृदयाच्या तळातून उठलेले खिन्न, आर्त, विषण्ण सूर यांनी 'हरपले श्रेय'चे अलौकिक संगीत भारावलेले, जड आणि खोल झाले आहे! भर दुपारीही पृथ्वीवर दिव्य पहाट फुटावी आणि सदैवची पुण्यमय घटका नांदावी, ही केशवसुतांची 'आर्ती' आहे.

ही आदर्श जीवन-स्वप्ने उद्ध्वस्त करून टाकणाऱ्या वास्तव शक्तींचीही केशवसुतांना पूर्णपणे जाणीव आहे; त्यामुळे त्यांची कविता स्वप्नाळू बनलेली नाही. या 'पुण्यमय पहाटे'च्या जपणुकीसाठी, त्या उद्यानातील 'भृंग-गाना'च्या रक्षणासाठी ते 'तुतारी' फुंकतात. 'गोफण' हाती घेतात, कवितेची 'तरफ' बनवू बघतात, 'नवा शिपाई' म्हणून उभे ठाकतात! केशवसुतांची सामाजिक कविता ही त्यांच्या भृंग-पुष्प-प्रिय कवितेची 'दुजी

मूर्ती'च होय ! 'भृंग', 'पुष्पाप्रत', 'झपूर्झा', 'म्हातारी', 'हरपले श्रेय' या कविता म्हणजे कवी केशवसुतांच्या आत्म्याचे मूळ स्वाभाविक 'ध्वनी' होत. 'तुतारी', 'स्फूर्ति', 'नवा शिपाई', 'गोफण', 'मूर्तिभजन' या कविता म्हणजे आत्म्याचे परिस्थितिसापेक्ष आवेगी उद्गार होत; त्यांचे रूप प्रतिक्रियात्मक आहे; त्यांचे प्रयोजन लौकिक-सृष्टि-संबद्ध आहे. 'तुतारी'सारख्या कवितांतील भावनाक्षोभ एका मानवाचा दुसऱ्या मानवाविरुद्ध आहे; मानवाने निर्माण केलेल्या आत्मघातकी नियमांविरुद्ध आहे; 'रूढिराक्षसी'बरोबर हा लढा आहे, यात यशाची आशा आहे. पण 'भृंगा'दी कवितांमधील दुःख जे आहे ते मूळ 'मानवरूपा'संबंधीचेच आहे; बाल्य हरवून बसलेल्या प्रौढ मानवाचे ते सनातन दुःख आहे. केशवसुतांनी स्वतःवर केलेली ती फिर्याद आहे ! भृंगाचे वेड लागलेल्या, पण भृंग होऊ न शकणाऱ्या, आपल्या मानवरूपाचा शाप भोगणाऱ्या एका मानवाची ती अगतिक, असहाय वेदना आहे; आणि म्हणूनच 'भृंगा'दी कवितांतील करुणार्त स्वर हा मानवी विश्वापलीकडील निसर्गशक्तीला, किंबहुना त्यापलीकडील गूढ, अतर्क्य आदिशक्तीला-अलौकिकाला आळविणारा, साद घालणारा असा आहे. पृथ्वीला सुरलोकसाम्य लाभले तरी मानव हा मानवच राहणार; आणि 'मानव' म्हणून त्याच्या मर्यादांचे शल्य त्याला सतत सलत राहणार ! ह्या वेदनेला अंत असेल का ? ह्या वेदनेचे रक्त-मांस घेऊन जन्मलेला मानव प्रत्यक्षातून परोक्षात जाऊ शकेल का? तो अंतर्बाह्य परमानंदे कोंदून जाईल का? ह्याच मूलभूत शंकेने व्याकुळ झालेल्या केशवसुतांच्या 'भृंगा'दी कविता 'तुतारी' आदी कवितांपेक्षा अधिक खोल आणि शाश्वत जीवनदर्शी वाटतात. मानवाच्या अस्तित्वाच्या आणि त्याच्या प्रस्थापित महत्त्वाच्या मूळ स्वरूपालाच त्या हात घालतात, आणि त्यामुळेच 'तुतारी' फुंकणाऱ्या 'नव्या शिपाया'ला भृंग-गीताची ओढ का लागते ते पटू शकते ! ह्या ओढीला अंत नाही, कारण मानव 'भृंग' होऊ शकत नाही; केशवसुतांच्या रोमँटिक मनाने आकारित केलेला भृंग त्याला होता येतच नाही ! आणि म्हणूनच

**'येते मनात तुझियासम भृंग व्हावे'**
**वेलींमधूनि कलिकांवरुनी झुकावे'**

हे कवीचे स्वप्नही कधीच न संपणारे असे आहे !

* * *

मूळ लेख : 'केशवसुत : मराठी काव्योद्यानातील भृंग'

'दीपावली' - ऑक्टोबर १९६६

## ६. कवीस सोडा कवितेबरोबरी

केशवसुतांनी 'कविता आणि कवि' ही कविता कोणत्या प्रसंगाने लिहिली, हे कळायला मार्ग नाही; पण कवीला उपदेश करू पाहणारे जे कोणी असतील त्यांना या कवितेत केशवसुतांनी अगदी खडसावले आहे. या उपदेशकांच्या मोठेपणालाच त्यांनी प्रथम सुरुंग लावला आहे.हे 'मोठे लोक' कोण ते या कवितेत स्पष्ट झालेले नाही; पण 'कवीला उपदेश करण्याइतका मोठा जगात कोणी असू शकत नाही' हे मात्र केशवसुतांना येथे निक्षून सांगावयाचे आहे.कवीला आपल्या कवितेहून या जगात दुसरी कोणतीही मोठी वस्तू नाही. कवी आणि त्याची कविता यांतील प्रेम, 'युवा आणि युवती' यांच्यामधील प्रेमासारखे असते; स्वयंभू, उत्स्फूर्त, उत्कट आणि आत्मलीन असे हे प्रेम असते. प्रेमिकाला आपल्या प्रियेशी 'तू अशा अशा तऱ्हेने लाडीगोडी कर' हे सांगण्याचा जर कोणी शहाणपणा करीत नाही, तर मग कवीनेच आपल्या कवितेशी कसे वागावे हे सांगण्याचा अव्यापारेषु व्यापार या आगंतुकांनी का करावा ? असा प्रश्न केशवसुत टाकतात ! उपदेशकांच्या या आगाऊपणाची केशवसुतांना चीड आहे.

कविता ही कवीची प्रिया आहे, याचा अर्थ कविता म्हणजे कवीचा बहिश्चर प्राण आहे; कवीचे हे प्रकट हृदय आहे, असा होतो; आणि असे जर आहे तर ही कविता म्हणजे कवीच्या स्वतःच्या प्रबुद्ध भावनांचा अनावर उत्स्फूर्त उद्रेकच होय ! म्हणजे येथे तिऱ्हाइताने दिलेल्या, किंवा स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या विषयावर, समाजात रूढ झालेल्या लौकिक किंवा पौराणिक अशा लोकप्रिय कथेवर अथवा सामान्य जनांना हव्या असलेल्या नीत्युपदेशावर, सुभाषितरूप व्यवहारज्ञानावर, माहितीपर असे 'पद्य' बेतण्याची करामत केशवसुतांना नामंजूर होती. 'स्व' हे केशवसुतांचे स्फूर्तिकेंद्र होते आणि 'स्वानंद' हेच त्यांचे खरे काव्यप्रयोजन होते.

'स्वानंदा'ऐवजी 'लोकरंजन' हेच जर कवितेचे ध्येय असेल तर ती कविता, त्या कवीची प्रिया न राहता, सभारुचीप्रमाणे, जनस्तुतीप्रमाणे नर्तन करणाऱ्या सूत्रधाराच्या

हातातली नाचणारी नटीच होईल ! म्हणजेच तिला स्वतःची आवड नाही, आत्मस्वातंत्र्य नाही; ती एक पराश्रयी, परजीवी अशी निःसत्त्व बाहुली आहे. त्यात त्या बाहुलीला स्वतःला आनंद तर नसतोच पण जनमत केव्हा बदलेल आणि आपली निंदा होईल याचे भय मात्र सदैवच असते! अशी कविता पारंपरिक, सांकेतिक, आवर्तात फिरणारी अशी असते. या कवितेचे पढीक बोल ऐकून आज ना उद्या रसिकांना ( ?) उबग येईलच येईल, याची केशवसुतांना खात्री पटते! ह्या अशा पराज्ञापित,पररुचिप्रेरित, पढीक कवितेच्या पाठीराख्यांना व आग्रहकर्त्यांना केशवसुतांनी येथे चमकावले आहे.

कवितेचे माधुर्य हे तिच्या अंतरंगातून, सहजतेने, तिचे म्हणूनच अनुभवास आले पाहिजे; अशी जिवंत कविताच खऱ्या रसिकांना आवडते आणि जर ही असली जातिवंत, स्वभावसिद्ध माधुर्य असलेली कविता हवी असेल तर 'ती आणि तिचा प्रियकर' यांना एकमेकांच्या संगतीत राहू द्या—त्यांना मोकळे सोडा, आणि त्या आत्मानंदात गुंगलेल्या कवीच्या कवितेचे रूप पाहा. त्याच्या खिडकीखाली 'उगे' उभे राहून त्यांच्या गोड लीला श्रवण करा—तुम्हांस आनंद होईल हे केशवसुतांना सांगायचे आहे. खरी कविता ही 'स्वान्तःसुखाय' असते, पण ती 'रसिकसुखाय'ही होते, ते या दृष्टीने! केशवसुतांना यात शंका वाटत नाही.

कवीची स्वानुभूती, त्या स्वानुभूतीशी होणारी त्याची तन्मयवृत्ती ह्या तन्मयतेची उत्स्फूर्तपणे घडणारी अभिव्यक्ती, ह्या अभिव्यक्तीच्या आनंदातच गुंगून जाण्याची मनःस्थिती आणि ह्या मनःस्थितीलाच काव्याचा सुंदर हेतू मानण्याची प्रांजल बुद्धी, काव्यनिर्मिती आणि प्रयोजन — याविषयीच्या या तात्त्विक गोष्टी 'कविता आणि कवी' या कवितेत सुस्पष्टपणे व्यक्त झाल्या आहेत. केशवसुतांची कविता ही या तत्त्वांशी इमान राखणारी आहे. केशवसुत काव्य करीत होते; ते करून ते मनात दंग होत होते, गुंगत होते; आणि जे रसिक त्यांच्या खिडकीखाली जाऊन 'उगे' उभे राहात होते त्यांना त्यांची कविता आनंद देत होती. जे मर्यादा सोडून त्यांच्या एकान्तसुखात धृष्टपणे प्रवेश करीत आणि त्यांना शहाणपणा सुचवीत, त्यांना 'आम्ही कोण म्हणूनि काय पुसता-आम्ही असू लाडके देवाचे !' असा ठणठणीत जाब मिळत असे !

केशवसुतांची कविता ही ओठांतून निघाली नाही, ती त्यांचे हृदय फाडून निघालेली कविता आहे. 'हरपले श्रेय' या आपल्या कवितेसंबंधी ते लिहितात. ''You can guess my state of mind from my Piece in the last issue of Manoranjan. A crack in the heart! - But alas! where is the restorative?'' ही

आकाशीची वीज धरण्याचा नाद केशवसुतांनी घेतला तो जन्माचाच! त्यात ते होरपळले, पण तिला त्यांनी सोडले नाही; तिच्यावर त्यांनी 'फिर्याद' केली, पण तीही तिच्यावरील अपरंपार प्रीतीपोटी आणि प्रीतीसाठीच! कविता म्हणजे 'ट' ला 'ट', 'री'ला 'री' जुळविणारी 'वृत्तदर्पणा'ची बटीक नाही याची पुरेपूर जाणीव त्यांना होती. 'वृत्तदर्पण्ये कवी पैशा पासरी' आहेत हे ओळखून ह्या 'पैशा पासरीवाल्या'पासून केशवसुतांनी आपला बचाव केला, ते दूर राहिले.त्यांना 'वाणी' ह्या देवतेच्या आराधनेची खडतरता ठाऊक होती. स्व—प्राणाने फुंकल्याशिवाय कवितेला—वाणीला—अंतःसामर्थ्यच लाभत नाही. त्यांनी जी गोफण हाती घेतली ती स्वतः वळलेली. स्वतःच्या नखांनी स्वतःचे हृदय फाडून, त्याचे चिवट दोर काढले, असात्त्विकांच्या विषयीच्या द्वेषाचा त्या दोराला घट्ट पीळ भरला आणि त्यांच्या वैराची गाठ मारून टाकली; अशी की तो पीळ सुटता सुटू नये ! अशा ह्या 'गोफणीतून कठीण शब्दां'च्या धोंड्यांनी केशवसुत 'हाणाहाण' करीत राहिले; केशवसुतांच्या सामाजिक कवितांच्या मागे हा पीळ आहे. केशवसुतांच्या सामाजिक कवितांचे स्वरूप स्वतःच्या अतिप्रबळ भावनांच्या सहजोद्रेकाचेच आहे! त्या अनावर भावनांना आपल्या आविष्काराचे रूप अगदी सुंदरतेने आणि सहजतेने सापडलेले दिसते ! केशवसुतांची 'स्फूर्ती', 'नवा शिपाई', 'तुतारी' आणि ह्या जातीच्या इतर कवितांमध्ये केशवसुतांच्या सामाजिक भावनांचा प्रक्षोभ रसोद्रेकाने प्रकट झालेला आहे. येथे कवी आणि त्याची कविता यांचे नाते परकेपणाचे नाही; हे नाते एकजीव झालेल्या प्रेमी जिवांचे जसे असते, तसे अभेदरूप नाते आहे.

कवी आनंदीरमण यांना लिहिलेल्या पत्रात केशवसुत म्हणतात. ''तुम्हांस जगाच्या अंधारात आपल्या बुद्धीचा किरण पाडणे आहे काय? असेल तर तुमचे हृदय उललेले आहे काय? फाटले आहे काय? म्हणून मी विचारतो; कारण तो प्रकाश जेव्हा बुद्धी परावृत्त करून जगावर पाडते तेव्हा अंधारात चाचपडणारास वाट दिसू लागते. एरव्ही कागदावर दिव्याची चित्रे रंगवून 'अंधारातून चालला आहा, तर एवढा आमचा कंदील तर घेऊन जा' असे म्हणून आग्रहाने ते आपले दिवे—म्हणजे दिव्याची चित्रे लोकांच्या हाती देणारे स्वयंसेवक ऊर्फ स्व-सेवक—नाक्यानाक्यावर गर्दी करून उभे आहेत. त्यांच्या त्या दिव्यांच्या चित्रांनी त्यांना काय किंवा कोणाला काय, वाट थोडीच दिसणार आहे ?'' केशवसुतांची 'तुतारी' आणि 'तुतारी' मंडळा'ची कविता यांतील भेद या विचाराने स्पष्ट होईल. त्यांचे नाते ध्वनि—प्रतिध्वनीचे आहे.'तुतारी-मंडळा'चे कशाला, केशवसुतांचे कित्येक समकालीन कवी कशी 'दिव्यांची फोल चित्रे' काढण्यात रंगलेले होते.

**हृदयातून न जे बोल**
**निघती, ते सगळे फोल**

अशा फोल कविता, वृत्तदर्पणाची भूषा म्हणून निपजलेली कविता, केशवसुतांना कविताच वाटत नव्हती ! 'उगीच काही सतत लिहिलेच पाहिजे', असा काही कायदा नाही. 'लिहिले तर ते मनापासून, राहवेना म्हणून, उदात्ततेने भारावलो म्हणून लिहावे; नाहीतर जागच्या जागी गप्प बसावे'; असे केशवसुतांनी निःसंदिग्धपणे म्हटले आहे.

'I can sit in a corner and perish
but I will not move until I have
the highest command...'
... 'We will wait until the
universe beckons and calls us to work.'

हे इमर्सनचे उद्‌गारही या संदर्भात केशवसुतांनी उपयोजिले आहेत.

खरी कला जन्म पावते ती, जेव्हा हृदय आत्म्याला खेळविते; जेव्हा हृदय आत्म्याला आळविते तेव्हा ! ऐहिक, सांसारिक, व्यावहारिक चिंतानिराशा, मनोभंग पार मागे टाकून हृदय जेव्हा मुक्त होते, आणि आत्म्याला सामोरे जाते—या लौकिकाशी, पार्थिवतेशी ज्याचा प्रत्यक्ष संबंध नाही अशा आत्म्याशी क्रीडा करते—तेव्हा खरी कला जन्म घेते, 'कला म्हणजे स्वच्छंद हृदयाची आत्म्याशी चाललेली निर्हेतुक क्रीडा !' अशा कलेला तत्त्वज्ञानाची आवश्यकता नसते; उलट या भान हरपलेल्या उदात्त क्रीडाकाली हृदय तानसेन बनून जाते, असे केशवसुतांनी म्हटले आहे. ही तन्मयता आणि तिच्यातून सर्जन पावणाऱ्या कलेचे परमसुंदर अनुभूतिचित्र केशवसुतांनी 'झपूर्झा' या कवितेत काढले आहे. विश्वशांतीसाठी, मानव कल्याणासाठी झटणाऱ्या महात्म्यांच्या सर्जनशीलतेचे आणि सर्जनप्रक्रियेचे तादात्म्यचित्र म्हणजे 'झपूर्झा' हे गीत होय. निःसंगपणाने, फिरके-गिरके घेत नाचत—गुंगत 'झपूर्झा-अवस्थे'त 'व्यर्थी अधिकचि अर्थ' पाहणाऱ्या स्त्रष्ट्याचे ते मनश्चित्र आहे.

याउलट अशा तादात्म्याचा भंग करणाऱ्या आणि कविहृदयाला पुन्हा आपल्या विवंचनेच्या गर्तेत लोटणाऱ्या अनुभूतीचे सुंदर कल्पनाचित्र 'क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास' या कवितेत आपणांस पाहावयास मिळते. 'आत्माराम' आणि 'अक्का' यातील द्वंद्वाची, त्यातील अक्काच्या विजयाची आणि आत्मारामाच्या कटू विषादाची कहाणी म्हणजे ही कविता होय. व्यवहारवादी, केवळ ऐहिक, स्वार्थी बुद्धी म्हणजे ही 'अक्का' आणि अलौकिक स्वप्नांनी वेडावलेला आणि त्यांची विलसिते क्वचित प्रत्यक्षपणे अनुभविणारा, लौकिकाला ओलांडून जाऊ बघणारा कलावंताचा 'कलात्मा' म्हणजे हा 'आत्माराम' होय.

केशवसुतांची कविता म्हणजे हृदय, आत्माराम आणि अक्का यांच्यातील प्रीतीचे, रागाचे, हर्षाचे, खेदाचे, आशेचे, निराशेचे एक उदासरम्य गाणेच होय !

आत्मा जेव्हा आत्मलीन असतो तेव्हा त्याला काही अलौकिक जाणवत असते. एका उषःकाली डोंगरीवर उभा राहून सूर्यप्रतीक्षा करणाऱ्या उषेचे सौंदर्य न्याहाळीत असता ' पश्य अत्र अस्मि ' असा गंभीर ध्वनी कवीच्या कानी येतो... 'भो ! कुत्र असि ?' असे कवी विचारतो, तोच 'कुत्र अपि अस्मिच सर्व वस्तुषु' असे प्रत्युत्तर येते... शेजारच्या धोंड्याकडे कवी सहज पाहतो.तो त्याला त्यात या प्रत्युत्तराचा साक्षात्कार घडतो.धोंड्यातून तो मूर्ती निर्माण करतो.सौंदर्य सर्व सृष्टीत भरलेले आहे.मात्र आधी ते पाहणाऱ्याच्या दृष्टीत असावे लागते. कलावंत ही दृष्टी घेऊन जन्माला येतो.सारी सृष्टी हे त्याचे द्रव्य बनते आणि प्रतिभाबलाने तो या सृष्टिद्रव्यातून नवसृष्टीचे—स्वर्गसृष्टीचे—सर्जन करतो.

केशवसुत हे तेजाचे उपासक आहेत. कविप्रतिभा ही तेजोरूपच आहे.कवीच्या प्राणमय कोशात प्रतिभेचे हिरण्मयमंडल सदैव परिभ्रमत असते.त्याचे शब्द तेजाचे पंख घेऊन विहरत असतात, ते गाणारे असतात; हे गाणेच काव्य म्हणून प्रकटते.

केशवसुतांच्या कवितेमागे स्वतः केशवसुतच उभे असलेले दिसतात. त्यांची कविता ही त्यांच्या हृदयाचे ध्वनी आहेत; बोल आहेत. हे त्यांचे बोल कधी जड—बोजड असले तरी ते त्यांचे स्वतःचे आहेत; मग ती कविता दिसण्यात जुन्या वळणाची असो, अथवा नव्या वळणाची असो. केशवसुत गायले ते स्वतःचे—प्रायः स्वतःसाठीच. हे स्वतःसाठी गायिलेले इतके तन्मयतेचे, तळमळीचे, खरेखुरे होते की ते त्यामुळेच सर्वांचे झाले. केशवसुतांची कविता ही प्रथम त्यांची स्वतःची असते व मग ती इतरांची असते; याउलट क्रम तिला मान्य नाही; आणि 'केवळ इतरांसाठी' या धर्माचा तर ती धिक्कारच करते.

**अमुचा पेला दुःखाचा**
**डोळे मिटुनि प्यायाचा,**
**पिता बुडाशी गाळ दिसे,**
**त्या अनुभव हे नाव असे !**
**फेकुनि द्या तो जगावरी,**
**अमृत होउ तो कुणातरी !**

हे त्यांचे एक चिंतन त्यांच्या काव्यविचाराच्या संदर्भात सदैव विचार करण्यासारखे आहे. केशवसुतांची कविता ही स्वानुभवातून स्फुरलेली आणि वाढलेली असल्याने आणि हा

अनुभव एका 'सत्य, सौंदर्य आणि शिव' या तत्त्वाच्या उपासकाचा असल्याने, केशवसुतांच्या कवितेला अमृतत्व लाभलेले आहे!

'काव्याचे फल काय?' याचे केशवसुतांनी दिलेले उत्तर 'स्वानंद' हे आहे.'स्वानंद हे कवीचे उत्तम पारितोषिक होय' असे ते म्हणतात. 'खाज सुटली असताना खाजविल्याने जो आनंद होत असतो तसला आनंद काय कामाचा? सगळे ऐहिक आनंद याच मासल्याचे आहेत. त्यांच्या परिणामी हळहळच राहावयाची' असे सांगून ते पुढे म्हणतात, 'की हे उत्तम पारितोषिक, म्हणजे हा टिकाऊ स्वानंद, कसा मिळवायचा याचा विचार ज्याचा त्याने, स्वतः कवीनेच करायचा असतो.' काव्यकला ही शिकवून येणारी कला नव्हे, हे येथे केशवसुतांनी स्पष्ट केले आहे. कवी आनंदीरमण यांना त्यांनी अखेरीस समजावले आहे की, 'एकदा हा खरा स्वानंद मिळू लागला म्हणजे मग तुमची मजकडे किंवा कोणाकडेच पद्यलेख पाठविण्याची आतुरता जिरेल!' कवी आपल्या अनुभूतीशी तादात्म्य पावला व हे तादात्म्य त्याच्या अभिव्यक्तीच्या क्षणीही विशुद्धपणे टिकले, तरच हा 'स्वानंद' कवीला मिळू शकतो. अशा वेळी 'कविता अशी असावी आणि तशी नसावी' हे सांगणाऱ्याची कवीला गरजही पडत नाही.केशवसुतांनी काव्यक्षेत्रात कोणी गुरू केला नाही की, शिष्य म्हणून कोणी जोडलाही नाही. कलाप्रांतात असे नाते वस्तुतः नसतेच; नसावेच लागते. कवीचा 'स्वानंद' आणि रसिकाचा 'काव्यानंद' हे दोन्हीही तन्मयतेतून, निर्हेतुकतेतून, आत्मलीन वृत्तीतून जन्मलेले असावे लागतात! केशवसुतांचा 'भृंग' याचे सुंदर प्रतीक होय.

केशवसुतांनी कवींसाठी सारी सृष्टी, सारे आकाश मोकळे केले.त्यांना जराही कोठे प्रतिबंध उरू दिला नाही.कवींना आपापल्या कवितेबरोबर विहार करण्यासाठी सोडून दिले. अर्वाचीन मराठी कवितेच्या जनकाचे हे कार्य कलाक्षेत्रात सदैव स्वागतार्ह, मार्गदर्शक आणि स्फूर्तिप्रद ठरेल! 'कवीस सोडा कवितेबरोबरी' हा कलेचा आद्य महामंत्र केशवसुतांनीच प्रथम उच्चारला, हे त्यांचे मोठेपण!

* * *

मूळ लेख : 'कवीस सोडा कवितेबरोबरी'

'मांडवी' ऑक्टोबर १९६६

## ७. केशवसुत आणि दीर्घ कविता

'केशवसुत' हे नाव उच्चारताच प्राणपणाने तुतारी फुंकीत असलेला कोणीतरी एक नव्या युगाचा, नव्या दमाचा शूर शिपाई मनश्चक्षूंपुढे उभा राहतो; कठीण शब्दांच्या गोफणगुंड्यांनी हाणाहाण करणारा, पद्यपंक्तीच्या तरफेने जग उलथून देऊ पाहणारा, आकाशातील उडुरत्ने खेचून खाली आणणारा आणि पृथ्वीला सुरलोकसाम्य यावे म्हणून झटणारा, कोणी एक महाप्रज्ञाबलवन्त कवीश्वर दृष्टीसमोर स्थिरावतो. 'आम्ही कोण म्हणून काय पुसता?' असा खडा सवाल टाकणारा देदीप्यमान देवपुत्र दृष्टीपुढे येतो. केशवसुतांची कविता म्हणजे मानवाच्या महानतेचे महामंत्र गाणारी कविता! केशवसुतांची कविता म्हणजे कवीच्या अस्मितेची प्रखर जाणीव पदोपदी ठासून व्यक्त करणारी कविता! आणि मराठी कवितेत आत्मपरतेचा पहिला उद्दाम हुंकार प्रकटविणारी कविता म्हणजेही केशवसुतांचीच कविता!—' केशवसुतांचे आणि केशवसुतांच्या कवितेचे जनमानसात पिढ्यान् पिढ्या ठसलेले हे चित्र होय.

केशवसुतांच्या कवितेचे ते तळपते रूप सहजपणे मनात भरणारे असेच आहे; पण केशवसुतांची एवढी हीच एकमेव मानसप्रतिमा माझ्या मनश्चक्षूंपुढे येत नाही. घराकडील गोष्टी बोलणारे, अंगणातील रांगोळीत स्वर्गसमक्षता अनुभविणारे, जड जगाला काडीवजा लेखणारे, संध्यासमयी प्रणयाकुल सृष्टी पाहून स्वतःच्या वियोगस्थितीने उदास झालेले, आपल्या चुकांची क्षमायाचना करणारे, तेजाचे पंख हलवीत दूर निघून गेलेल्या गाणाऱ्या शब्दपंक्तीला 'मागुते या' म्हणून व्याकुळतेने विनविणारे, हरपल्या श्रेयासाठी अगतिक होऊन जीव पाखडणारे... अशा किती, कितीतरी रूपांनी केशवसुतांच्या प्रतिमा मनोभूमीवर उमटतात. आपल्या हृदयाच्या सुखदुःखांची गाणी गाणारे हे कविहृदय तन्मयतेने अवलोकिण्यात परमानंद आहे. पण अशी केवळ आत्मपर कविता म्हणजेच केशवसुतांची कविता किंवा त्यांची कवितेविषयीची संपूर्ण भूमिका नव्हे.

केशवसुतांच्या कवितेत या भावकवितेच्या प्रकृतीहून वेगळे काही आढळते, ते काय ? त्यामागे कवीची भूमिका कोणती आहे ? ते कलादृष्ट्या कशा स्वरूपाचे आहे ? याचा थोडा विचार करणे अगत्याचे आहे.

प्रा. भ. श्री. पंडित यांनी संपादिलेल्या 'समग्र केशवसुत' या ग्रंथात केशवसुतांच्या एका इंग्रजी पत्रातील एक उतारा पृ.३९२ वर दिलेला आहे. तो पुढीलप्रमाणे ः

'Please tell x x x that I request him to undertake a long poem and not to waste time in writing short poems only. A century has passed without producing a long Marathi poem worth the name; and it is for the geniuses like. ... and Mr. ... to wipe out the disgrace. I am sorry I am a dwarf and don't show any signs as yet of out-growing. I, therefore, hate myself and don't like others who attempt only small things.'

हे पत्र श्री. ज. बा. हर्षे ऊर्फ कवी 'आनंदीरमण' यांना लिहिलेले होते.आपल्या मृत्यूपूर्वी सहा-सात महिने अगोदर हे पत्र केशवसुतांनी लिहिलेले असल्यामुळे त्यामध्ये त्यांचे काव्यलेखनविषयक अखेरचे विचार ग्रथित झालेले आहेत, हे स्पष्ट आहे.

वरील उताऱ्यातील 'Long Poem', 'Long poem worth the name', - 'Short poem', 'Small things' ... 'dwarf' ... 'Signs of out-growing' म्हणजे काय, ते नीट पाहणे आवश्यक आहे.

'Long poem' म्हणजे 'Long Narrative Poem' असेच येथे केशवसुतांना अभिप्रेत असावे; कारण 'नाव घेण्याजोगी दीर्घ कविता होऊन एक शतक उलटले आहे' असे केशवसुत म्हणतात, तेव्हा शतकापूर्वी होऊन गेलेल्या मोरोपंतांची आणि त्यांच्या आधीची दीर्घ कविताच त्यांच्या डोळ्यांपुढे असणार. मोरोपंतांचा काळ इ. स. १७२९ ते १७९४ हा आहे; आणि मोरोपंतांची दीर्घ कविता प्राधान्याने 'दीर्घ कथनपर कविता' आहे. 'केकावली', 'संशयरत्नमाला' यासारखी कविता सोडली तर पंतांचे काव्य हे मुख्यतः आख्यानस्वरुपाचे तरी किंवा संस्कृत आर्ष महाकाव्याच्या मराठी रूपांतरस्वरूपाचे तरी आहे. 'नाव घेण्याजोगी मराठी Long Poem' म्हणताना केशवसुतांना मोरोपंतांची आणि तत्सदृश इतरांची 'दीर्घ कथनपर कविता' अथवा 'महाकाव्यसदृश' रचना अभिप्रेत असावी, असे मानावयाचे काय ?

मोरोपंतांच्यानंतर एका शतकात लिहिल्या गेलेल्या कवितांचे स्वरूप प्राधान्याने दीर्घच होते. काही स्तोत्रे-पदे किंवा उपदेशपर कविता वगळली तर बहुतेक सर्व कविता दीर्घ वर्णनपर किंवा दीर्घ कथनपर अशीच असल्याचे दिसते. त्यात स्थलवर्णने किंवा व्यक्तिवर्णने असतील; संस्कृत विदग्ध महाकाव्य किंवा खंडकाव्य, तसेच इंग्रजी दीर्घ कथनपर काव्य यांची भाषांतरे-रूपांतरे असतील, किंवा क्वचित स्वतंत्र कथानक असलेले दीर्घकाव्य असेल; म्हणजे दीर्घकाव्याची परंपरा मोरोपंतांच्यानंतर शतकभर चालू होती; तिला खंड पडलेला नव्हता. परशुरामपंततात्या, विठोबाअण्णा, कृष्णशास्त्री, गणेशशास्त्री, राजा सर टी. माधवराव, बापूसाहेब कुरुंदवाडकर, पांडुरंगशास्त्री पारखी, यांसारखे बहुशः जुन्या वळणाचे कवी किंवा बजाबा रामचंद्र प्रधान, डॉ. कीर्तिकर, चिंतामणि पेठकर, गो. वा. कानिटकर, वासुदेवशास्त्री खरे, यांसारखे नव्या-जुन्या वळणाचे कवी दीर्घ काव्यलेखनच करीत होते. शिवाय त्यांना आर्यावृत्तच वाहन म्हणून अधिक योग्य वाटल्याचेही पण आढळते.'राजा शिवाजी'सारख्या आधुनिक स्वतंत्र महाकाव्याचा प्रयत्नही याच काळात झालेला आहे.पण ही सारी दीर्घ कविता केशवसुतांना नाव घेण्याजोगी वाटलेली नसावी अथवा ती त्यांच्या नीट अवलोकनात आलेली नसावी. याचा अर्थ रघुवंश, मेघदूत, Princess, Lady of the Lake यांची भाषांतरे षड्ऋतुवर्णन, गंगावर्णन यांसारखी वर्णनपर काव्ये किंवा 'राजा शिवाजी'सारखे अर्वाचीन महाकाव्य, ही काव्ये सुदीर्घ असूनही 'नाव घेण्याजोगी' म्हणून केशवसुतांच्या डोळ्यांपुढे येत नाहीत. शतकापूर्वीची सुदीर्घ काव्ये म्हणजेच मोरोपंताची किंवा त्यांच्या आधीची सुदीर्घ महाकाव्येच त्यांना महत्त्वाची वाटली, असा यातून निष्कर्ष निघतो.

केशवसुतांच्या कवितासंग्रहात 'कचाप्रत देवयानी' आणि 'राजा शांतनु' या कविता आहेत. त्यांची धाटणी मोरोपंतांच्या कवितेची आहे. या दोन्ही कविता आर्यावृत्तात असून 'मोरोपंतांप्रमाणेच केशवसुतांनी (यांमध्ये) अन्त्ययमके व दामयमके साधली आहेत; समास व अनुप्रास यांची गर्दी केली आहे. शब्दांवर श्लेष साधले आहेत आणि उपमा, रूपक, विरोधाभास इत्यादी अर्थालंकारांची रेलचेल केली आहे,' असा त्यासंबंधी प्रा. भ. श्री. पंडितांनी जो अभिप्राय दिला आहे (समग्र केशवसुत-पृ. ३७५) तो आपल्याही अनुभवास येणारा आहे.या दोन्ही कवितांत 'अनुप्रास, यमके, शब्दसंग्रह, श्लेष इत्यादी गोष्टींनी मोरोपंतांची आठवण आर्येआर्येमधून झाल्याविना कशी राहात नाही,' हे प्रा.रा.श्री. जोग यांनी सविस्तरपणे उदाहरणे देऊन मार्मिकपणे स्पष्ट केले आहे.(केशवसुत-काव्यदर्शन, पृ. १५३-१५४). तेव्हा या दोन कवितांच्या रचनेचा व भाषेचा मोरोपंती थाट पाहून आणि

केशवसुतांच्या कवितांमध्ये अन्यत्र कोठेही, मोरोपंतांच्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्राचीन कथाकवींची रचनादी सादृश्ये आढळत नसल्याने 'शतकापूर्वीची नाव घेण्याजोगी दीर्घ कविता', म्हणून स्वतःसाठी, स्वतःपुरती तरी निदान मोरोपंतांची कविता, केशवसुतांनी स्वीकारली असावी, असे वाटते. शिवाय 'राजा शांतनु' या कवितेतील -

**'ये, ये ! धीर न धरवे, करवेना काज मज पहा काही ।**
**बाही तुज औत्सुक्ये, जाई नभ त्या भरून हाकाही ॥'**

ह्या शेवटच्या आर्येवरून 'मोरोपंती धर्तीवर रचना करण्यापलीकडे केशवसुतांना अधिक काही साधावयाचे नव्हते' असे प्रा. रा. श्री. जोग यांनी मत दिले आहे. प्रा. भ. श्री. पंडित यांनीही या आर्येचा उल्लेख याच हेतूसाठी केलेला आहे.

'कचाप्रत देवयानी' ही कविता दीर्घ, म्हणजे पंचेचाळीस आर्यांची कविता आहे. तिचे स्वरूप आपाततः कथात्मक कवितेचे असले तरी ते मूलतः भावकवितेचे आहे. हृदयभंग झालेली देवयानी कचाला उद्देशून जे प्रेमार्त उद्‌गार काढते, ते भावोत्कट उद्‌गार म्हणजेच ही कविता ! येथे कथाशरीर नाही. शिवाय या कथागीतातील प्रेमभावना विशुद्ध आणि मनोज्ञ वाटते. देवयानी म्हणते.

**'रत्नाला मुकल्यावरि कोण गणिल लाभ काच सापडणे ?**
**भग्न हृदय मम झाले संसृतिपाशी नको मला पडणे ॥'**

प्रियकराच्या स्मृतीशी एकनिष्ठ राहण्याइतकी ही प्रीती उदात्त आहे. तिला ओढवणाऱ्या दैवदुर्विलासाची कल्पना येते; सारे पटते; पण

**'करित्ये विवेक बहु, परि ठसली मूर्ति आत जी कान्त ।**
**भ्रान्त मला ती करिते, कापविते सर्व मन्मनःप्रान्त ॥'**

हीच तिची असहायता आहे.भावी प्रणयक्रीडांची तिची स्वप्नचित्रे केशवसुतांनी अतिशय नाजुकपणे चितारली आहेत. त्यात आधुनिकता आहे; वास्तवता आणि स्वाभाविक सुंदरता आहे.

**'मंदाकिनीत आपण जलकेली करुनि सुर-द्रुमाखाली ।**
**सेवित सुधा बसावे, हाय ! मनीषा निरर्थ ही झाली ।'**

तिला प्रणयलीलांचे स्मरण होते.

**‘चढुनी द्रुमी फुले तू खुडिली परडी मदीय भरण्यास,**
**पुष्पित ते बघुनि म्हणे व्यर्थ सुमे येति का बरे यास ?’**

ती पश्चात्तापदग्ध झाली आहे; मनाची समजूत घालण्याचा प्रयत्न करूनही ते तिला जमत नाही.‘कचाप्रत देवयानी’ ही कविता म्हणजे देवयानीच्या हृदयातून अनावरपणे बाहेर पडलेले एक भावगीतच वाटते.मूळ महाभारतातीलपेक्षा अधिक उदात्त, विवेकी, संयमी, विशुद्ध, एकनिष्ठ आणि स्वप्नसुंदर अशा प्रेमभावनेचे चित्रण करणारी ही कविता आहे. केशवसुतांना हवी असलेली दीर्घ कविता म्हणजे परहृदयप्रवेश करून त्याचे भावचित्र रंगविणारी रोमँटिक कविता, असा होऊ शकेल. मोरोपंतांसारख्यांच्या कथाकवितेत (Narrative Poem मध्ये) प्रसंग, घटना, व्यक्तिवर्णने, वातावरणनिर्मिती, संवादरचना-चातुर्य, इत्यादी कथाघटकांनाच महत्त्व असते. ‘कचाप्रत देवयानी’ या कवितेत यांपैकी काहीही नाही; पण देवयानीच्या हृदयातील भावनांच्या सूक्ष्म तंतूंचे झंकारमात्र खूप आहेत. ‘कचाप्रत देवयानी’ या कवितेचे वळण बाह्यतः जुने असले तरी त्यातील आशय जुनाट नाही. पौराणिक कथेचे येथे रोमँटिक प्रेमकवितेत रूपांतर झाले आहे.‘एक पौराणिक प्रेमकथा घेऊन केशवसुतांनी लिहिलेले हे प्रेमभावगीत हृद्य झाले आहे’ यात प्रा. रा. श्री. जोगांना शंका वाटत नाही.एक भावकविता म्हणून ‘कचाप्रत देवयानी’ या कवितेकडे प्रा. पंडित यांनी पाहिले नसले तरी ही कविता म्हणजे एक ‘नाट्यमय प्रेमकाव्य’ असून तीत ‘व्यथित देवयानीच्या अंतःकरणाचे पापुद्रे हळुवार हाताने उलगडल्याचे’ त्यांनाही जाणवले आहे.

‘कचाप्रत देवयानी’ ही कविता १९०२ मधली आहे. केशवसुतांचे ‘Long Poem’ यासंबंधीचे पत्र याच सुमाराचे असावे; हे प्रा. पंडितांचे अनुमान गृहीत धरावयास हरकत नाही.यानंतर दोनअडीच वर्षांनी केशवसुतांचा अंत झाला. या अडीच वर्षांत त्यांनी सात कविता लिहिल्या. ‘आईकरिता शोक’, ‘दूर कोठे एकला जाउनीया’, ‘राजा शांतनु’, ‘प्रतिभा’, ‘गोफण केली छान !’, ‘हरपले श्रेय’, ‘तुझे नाम मुखी’ या त्या कविता. यांतील ‘राजा शांतनु’ या कवितेखाली कालदर्शक काही नोंद नाही.इतर ज्या सहा कविता १९०२ नंतर केशवसुतांनी लिहिल्या त्यांचे रूप अस्सल भावकवितेचे आहे. आणि या कवितांतून केशवसुतांची भावकाव्यातील व्यक्तिमत्त्वाची सारी ठळक वैशिष्ट्ये व्यक्त झाली आहेत अगदी वैयक्तिक शोकानुभव, उदासीनता, एकान्ताची आवड, प्रतिभेची अत्यद्भुत गूढता-दिव्यता, पुरुषार्थहीनांची चीड, अलौकिकाची ओढ हे जे केशवसुतांच्या कवितेचे काव्यात्म अनुभूतीचे मूलभूत विशेष, तेच येथे प्रकट झाले आहेत. केशवसुतांनी अखेरपर्यंत स्वतःला

व्यक्त केले ते पूर्णांशाने नवकवितेतच. (Purely subjective lyrics मध्ये). मग मध्येच Long Poem संबंधी त्यांना जे उत्कटतेने वाटले त्याचे काय ?

केशवसुतांनी कवितालेखनाचा प्रारंभ केला तो रघुवंशातील काही श्लोकांच्या भाषांतराने.ती कविता म्हणजे एक प्रसंगचित्र आहे. यानंतर दोन वर्षांनी केशवसुतांनी 'किरातार्जुनीय'मधील पहिल्या सर्गाचे अंशतः भाषांतर केलेले आढळते. याच काळात, म्हणजे १८८५-८७ या दोन-तीन वर्षांत त्यांनी काही इंग्रजी भावकवितांची भाषांतरे आणि काही आत्मपर भावगीते केल्याचेही दिसून येते. तेव्हा केशवसुतांना 'दीर्घ कथनपर कविते'ची मूलतः आवड होती व पुढे भावकाव्याची (Lyric) आवड निर्माण झाली', असा निष्कर्ष यावरून काढावयाचा काय ? पाहू या. संस्कृत महाकाव्यातील जो भाग त्यांनी भाषांतरित केला आहे त्याला कथाशरीर नाही, केशवसुतांच्या अभ्यासक्रमात येणाऱ्या उताऱ्यांपैकी हे उतारे असावेत, असा संभवनीय तर्कही प्रा. पंडित यांनी केलेला आहे. शिवाय याच काळात ३० डिसेंबर १८८६ रोजी त्यांनी 'कविता आणि कवि' ही कविता केली आहे, आणि तीमध्ये 'अशी असावी कविता, फिरून-तशी नसावी कविता-, म्हणून...' कवीला सांगणारे असे तुम्ही कोण मोठे लागून गेला? असा खडसावून प्रश्न टाकला आहे.(केशवसुतांच्या कवितेचा कोणी आणि काय अधिक्षेप केला हे प्रत्यक्ष कळण्यास मार्ग नाही. पण कवितेच्या आशयावरून काही अनुमान करता येते.) कवी आत्मसुखार्थ काव्य करतो, कवीला आपल्या कवितेबरोबर सोडून द्या, कवी आणि त्याची कविता यांच्यातील एकान्तसौख्याआड रसिकाचा वारासुद्धा येता कामा नये, इतकी 'आत्मपरता' काव्यनिर्मितीच्या मुळाशी असते, हे त्या कवितेत केशवसुतांनी मनःपूर्वक सांगितले आहे. तेव्हा केवळ दीर्घ कथनपर काव्याची केशवसुतांना प्रारंभी खरीखुरी आवड होती, असे काही विधान करता येण्यासारखे नाही.

'मुळामुठेच्या तीरावर' (जुलै १८८७) आणि 'आगबोटीच्या काठाशी समुद्राच्या शोभेकडे पाहात उभ्या असलेल्या एका तरुणीस' (डिसेंबर १८८७), या कविता 'जून १८८७' मध्ये केलेल्या किरातार्जुनीयातील श्लोकांच्या भाषांतरानंतर अल्पावधीतच लिहिलेल्या आहेत. 'मुळामुठेच्या...' ही कविता वॉल्टर स्कॉटच्या Jack of Hazeldean या Ballad चे स्वैर आणि अपकृष्ट रूपांतर आहे. पण छोट्याशा कथारूपातून अथवा प्रसंगनिर्मितीतून प्रेमभावचित्रण करण्याचा येथे केशवसुतांनी प्रयत्न केलेला आहे.'आगबोटीच्या...' या कवितेत आर्नोल्डच्या Mermaid ची कल्पना आढळते, असा उल्लेख प्रा.रा.श्री. जोगांनी केलेला आहे. ह्या कवितेच्या प्रारंभी 'तरंग पहिला' असे लिहिले असल्याने येथे

केशवसुतांना अनेक तरंगांचे मिळून एक खंडकाव्य बहुधा लिहावयाचे असावे, असा तर्कही करता येतो. या तरंगातील उपलब्ध ओळींतून जे जाणवते ते कल्पनेचा स्वैर विहार केल्याचे आणि इच्छापूर्तीची स्वप्नचित्रे काढल्याचे ! हे निर्दय स्वार्थी जग, मानवाचे दुःखप्रभव शरीर, पृथ्वीवरील जड जिणे याचा उद्वेग-तिरस्कार आणि स्वर्ग लोकातील, वरुणलोकातील दिव्य रमणीय सुखस्वप्ने यांची केशवसुतांनी रंगून जाऊन, वेडावलेल्या मनाने काढलेली भावकल्पनाचित्रे, म्हणजे ही कविता.

**'स्वयंभू सृष्टीचे नियमचि सदा मानिति सुधी,**
**स्वयंभू सृष्टीचे नियम सुधरू पाहत असे**
**नराच्या ऐसा या कवण दुसरा मूर्ख गवसे ?**

हा विचारही या कवितेत येऊन जातो. केशवसुतांच्या काव्यात्म (Romantic) प्रकृतीची मूळ लक्षणे या कवितेत उत्तानपणे प्रकट झाली आहेत. 'आगबोटीच्या...' ही कविता एका संकल्पित खंडकाव्याचा भाग म्हणून येते; तिचे स्वरूप रोमँटिक भावकथा-काव्यासारखे - 'रोमॅन्ससारखे' - असल्याचे दिसते. संस्कृत किंवा प्राचीन मराठी दीर्घ कथनकाव्याची तिच्यावर छाया आढळत नाही. वाहन म्हणून उपयोजिलेले 'शिखरिणी' वृत्त हा अपवाद ! तसेच तोवर इंग्रजी दीर्घ अद्भुतरम्य कवितेची छटाही अस्पष्टच आहे.अशी, पण खास केशवसुतांची आदर्श स्वप्नसृष्टी प्रतिबिंबित करणारी ही कविता कदाचित केशवसुतांना 'अभिप्रेत असणाऱ्या दीर्घ कवितेचे स्वरूप सुचविणारी तर नसेल ना ? नसेल असे वाटते; तसेच केशवसुतांचे खंडकाव्या'संबंधीचे या लेखात आलेले इंग्रजी पत्रही या काळातले, म्हणजे १८८५-८७ मधले नसावे; कारण हा केशवसुतांच्या कवितेचा आरंभकाल आहे; तेव्हा small things ची चीड येण्याइतपत त्यांची भरपूर कवितानिर्मितीही तोवर झालेली नव्हती आणि त्यामुळे 'Signs of outgrowing' दिसत नसल्याची तक्रार करण्याइतका काळही गेला नव्हता किंवा आपली भावकविता 'स्थिति'रूप (Stagnant) झाल्याचे जाणवावे असेही काही नव्हते. शिवाय जर केशवसुतांना दीर्घ काव्याची अनावर ओढ याच काळात लागली असती तर त्यांनी पुढील १८-२० वर्षांत तशी एखादी रचना केली असती, निदान 'आगबोटीच्या...' या कवितेचा आणखी, किमानपक्षी, एक तरी तरंग लिहिला असता. यामुळे 'आगबोटीच्या...' ही कविता म्हणजे ऐन तारुण्यातील, एकविशीतील, केशवसुतांच्या रोमँटिक स्वप्नवृत्तीचा किंचित कथारूपाने झालेला स्वैर विहार आहे.

केशवसुतांच्या कवितेत एखादा प्रसंग कल्पून, एखादी घटना घडल्याचे दाखवून, एखादा संवाद मांडून, तीमधून एखादे मूलभूत तत्त्व साकार करण्याची रीती पुष्कळदा पाहावयास मिळते; हे तत्त्व प्रेमानुभूतीचे असेल, काव्यशास्त्रीय असेल अथवा गूढ साक्षात्कारासंबंधीचे असेल. ‘समृद्धि आणि प्रीति’, ‘मदन आणि मदनिका’, ‘सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि’, ‘स्वर्ग पृथ्वी आणि मानव’, ‘दिव्य ठिणगी’, रूढि-सृष्टि-कलि’, ‘शब्दांनो, मागुते या !’, ‘दिवा आणि तारा’, ‘क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास’, ‘चिन्हीकरण’, इ. कविता म्हणजे रूपककथाकाव्येच होत. संवाद, नाट्य, कथात्मक प्रसंग इत्यादीच्या साहाय्याने अमूर्त तत्त्वाचे मूर्तीकरण करण्याचा प्रयत्न केशवसुतांनी येथे केलेला आढळतो. ‘मुळामुठेच्या तीरावर’, ‘आगबोटीच्या...’, ‘कचाप्रत...’, ‘राजा शांतनु’ या कवितांतही कथानके नाहीत, पण एका विशिष्ट परिस्थितीत उद्‌भवणाऱ्या पात्रांच्या हृदयांतील भावोर्मीच त्यात चित्रिलेल्या आहेत. विशुद्ध प्रेम, त्याची एकनिष्ठता, त्यासाठी प्राणत्यागाची सिद्धता, इ. अनुभूती या कवितांतून पात्र रूपाने साकार झाली आहेत. पात्ररूपाने होणारी ही अभिव्यक्ती अधिक मूर्त, concrete, अधिक जिवंत आणि परिणामकारक होते. यासाठी केशवसुतांना Long Poem अधिक उपयुक्त वाटत असावी.महाभारतातील भावानुभूतीपेक्षा केशवसुतांच्या देवयानीची प्रेमानुभूती अधिक हृद्य वाटते, अर्वाचीन वाटते.पुराणातील कथांच्या आश्रयाने केशवसुत अर्वाचीन मनोभावना आणि अनुभूती व्यक्त करू पाहात आहेत; मराठी कवितेत हे नवे होते; हे वेगळेपण ध्यानी घेण्यासारखे आहे. (या काळात अल्पांशाने ‘सं. सौभद्र’ हेच करीत होते.) केशवसुतांच्या प्रारंभीच्या प्रेमकवितांत दिसून येणारी संस्कृत काव्यातील प्रेमानुभूतीची भावना आणि चित्रपद्धती या काव्यात नाही. केशवसुतांनी दीर्घ कवितेसाठी पुराणातील विषय न घेता अर्वाचीन जीवनातील एखादी स्वतंत्र अर्थपूर्ण अनुभूती घेतली असती तर मोरोपंती रचनेचा थाटही त्यांना करावा लागला नसता, असे वाटते. त्यांनी भावोत्कटतेने, अर्वाचीन काव्यशैलीने (जी त्यांची अखेरीअखेरीस सिद्ध झाली होती) ते खंडकाव्य निर्मिले असते.

केशवसुतांच्या भाषांतरित कवितांचा विचार करताना एक गोष्ट निदर्शनास येते की, संस्कृतातून मराठीत भाषांतर करताना त्यांना तितकेसे कठीण जात नसावे; त्या रचनेत सफाई, योग्य शब्दयोजना आणि एकंदरीत प्रसादपूर्णता येते. पण इंग्रजी कवितेला मराठी वेष देताना त्यांना अवघड जात असावे, कारण साधे, वास्तव अनुभव व्यक्त करण्याची मराठी कवितेला सवय नसल्याने, ती भाषांतरे बहुशः गद्यप्राय, विस्कळीत, चुकीच्या वाक्प्रचारांनी डागळलेली अशी आढळतात. पण हळूहळू केशवसुतांना वास्तव अनुभूतींचेही यथार्थ चित्रण करण्याचे सामर्थ्य लाभले. अशा वेळी भावोत्कट पण लहान लहान अनुभूतींना भावगीतरूप त्यांनी जसे

दिले तसे भावोत्कट पण विशाल अनुभूतींना महाकाव्यरूप देण्याची कल्पना त्यांच्या मनात आली असली तर ते अस्वाभाविक नव्हे.

केशवसुतांना मोरोपंतांची कविता नाव घेण्याजोगी वाटली, असे मानले तरी ती अगदी सर्वोत्कृष्ट, श्रेष्ठ आदर्श अशीच वाटली असेल, असे नसावे. केशवसुतांनी स्वतःसाठी मोरोपंती वळणाची Long Poem जरी पत्करली तरी स्वकालीन मानव व त्याचे जीवन, यातील काव्य जिवंतपणे उभे करणारी कथाकविता, त्यांना दीर्घ काव्य म्हणून हवी असावी. केवळ वैयक्तिक हर्षामर्षापेक्षा सर्व समाजाचे, राष्ट्राचे हर्षामर्ष त्यांना एखाद्या महाकाव्यासारख्या प्रचंड काव्यप्रकारातून द्यावयाचे असतील. पण त्यासाठी स्वतःच्या भावकोषातून बाहेर पडून, असंख्य व्यक्तिमनाशी समरस होण्याची, विविध घटना आणि प्रसंग यांच्याशी भावैक्यमय बनून, त्यांचा व्यापक अर्थ शोधण्याची, अर्थघनता व रसोत्कटता एकाच वेळी साधण्याची, प्रदीर्घ काव्यरचनेस लागणारी वस्तुनिष्ठ वृत्ती आणि दृष्टी केशवसुतांच्या ठायी होती की नाही हे पाहण्याची संधीच आपणांस लाभलेली नाही. पण 'मी माझा कोष फोडून, कवचभेद करून विशाल आणि वैविध्यपूर्ण जीवनाच्या अनंत अंबरात स्वैर विहार करू शकत नाही-माझ्याच सुखदुःखांची गाणी मी गातो आहे - I am dwarf. I don't show any signs of outgrowing' असे उद्गार स्वतः केशवसुतांनी मात्र काढले आहेत.

आंग्ल कवी कीट्सने एका पत्रात दीर्घ कवितेसंबंधी आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. तो म्हणतो, 'At any rate I have no right to talk until Endymion is finished. It will be a test, a trial of my powers of Imagination and chiefly of my invention which is a rare thing indeed-by which I must make 4000 lines of one bare circumstance and fill them with poetry... A Long Poem is a test of invention which I take to be the Polar Star of Poetry, as Fancy is the sails, and imagination the Rudder. Did our great poets ever write short pieces ? I mean in the shape of tales ? This same invention seems indeed of late years to have been forgotten as a Poetical Excellence. (The Letters of John Keats, ed. M. B. Forman, 1931, I. 55).

केशवसुतांना ही अशीच काही तहान लागली असावी.केशवसुतांनी कीट्सचे Endymion वाचल्याचा उल्लेख मिळतो. पण त्यांची वृत्ती मूलतः सौंदर्यवादी

भावकवीची (Romantic Lyricist) असल्याने त्यांना भव्य, विशाल आणि महान मानवजीवनपटावरील गूढ, गहन भावचित्रे रेखाटणे शक्य झाले नसावे, याची त्यांना खंत वाटत असावी. वैयक्तिक हर्षशोकाचे भावगीत त्यांना Small thing वाटत असावे आणि Long Poem हे विश्वमानवाच्या अनुभूतीचे उत्फुल्ल प्रतिभेने काढलेले रम्य चित्र वाटत असावे.

केशवसुत येथे 'भावगीत' ह्या काव्यप्रकाराची अंतिम महत्ता दीर्घ कथाकाव्याशी किंवा महाकाव्याशी त्याची तुलना करून ठरवीत नाहीत ना? जीवनानुभूती व्यक्त करण्याच्या या दोन्ही काव्यप्रकारांच्या स्वयंभू मूलभूत अंतःसामर्थ्यासंबंधी तर त्यांना येथे तरतमभाव व्यक्त करायचा नसेल ना?

भावकविता (Lyric) ही खोल परिपक्व, प्रगल्भ आणि जीवनाचे अतिव्यापक असे अनुभव व्यक्त करण्यास असमर्थ आहे काय ? केवळ दीर्घ कविता (म्हणजे येथे महाकाव्य अथवा दीर्घ कथाकाव्य) हीच असे अनुभव समर्थपणे व्यक्त करू शकते काय? तसे दिसत नाही. 'आत्मपरता' याचा अगदी 'वैयक्तिकता', 'स्वयंकेंद्रितता', 'केवळ स्वानुभव' असा संकुचित अर्थ केल्याने हा प्रश्न मूलतः संभवतो. ज्यांचे व्यक्तिमत्त्व वाढत जाते, ज्यांच्या सौंदर्यदृष्टीचा लोप होत नाही, ज्यांची प्रतिभाशक्ती कार्यप्रवण असते, त्यांना भावगीताच्या माध्यमातूनही, अगदी यथार्थपणे आपल्या अतिशय प्रगल्भ आणि उत्कट भावपूर्ण जीवनानुभूती व्यक्त करता आल्या आहेत. स्वतः केशवसुत यांची भावकविताच याची साक्ष देईल. केशवसुतांना चीड आली होती ती small things ची; टीचभर छोट्या छोट्या गोष्टींची आणि त्यांचे चित्रण करणाऱ्या Short Poemsची ! वास्तविक केशवसुतांना तशी खंत वाटण्याचे काही कारण दिसत नाही.त्यांची आत्मपर कविता खोल आणि उत्कट अधिकाधिक उत्क्रांत आणि विकासशील होत गेलेली आहे. पण केशवसुतांना स्वतःला मात्र आपली कवित्वशक्ती मर्यादित वाटली असावी. आत्महीनतेची छाया त्यांच्या हृदय-प्रांतावर पसरलेली असावी !

केशवसुतांची कविता मुख्यतः आत्मपर भावकवितात्मक असली आणि तिचे तेच खरे प्रकृतिवैशिष्ट्य असले तरी, तिला वस्तुनिष्ठतेचे महत्त्व जाणवले आहे, हे खरे ! वस्तुनिष्ठ दीर्घ कवितेने कवीचे व्यक्तिमत्त्व उंचावते किंबहुना हे व्यक्तिमत्त्व आधी उंचावल्याविना वस्तुनिष्ठ दीर्घ कविता निर्माणच होऊ शकत नाही, असे त्यांना वाटते. कवीचे व्यक्तिमत्त्व जर असे बहरून आले नाही, तर त्याची भावकविताही हळूहळू खुंटत जाते; केशवसुतांना

आपल्या 'मळ्यास कुंपण घातलेले' खपत नाही. अशा कुंपणात आपण अडकत आहोत, अशी जाणीव होताच त्यांनी आत्मधिक्कार केल्याचे दिसते. केशवसुतांच्या कवितेत वस्तुनिष्ठ दीर्घ कविता किंवा सुभाषिते, स्वकृतवचने, स्फुटविचार आणि प्रासंगिक अशा कितीतरी कविता आढळतात. केवळ परंपरेच्या त्या निदर्शक आहेत किंवा आपल्या काळातील काव्याभिरुचीच्या त्या अपरिहार्य खुणा किंवा अवशेष आहेत असे जाणवत नाही. मराठी कवितेत क्रांती करणाऱ्या केशवसुतांना वस्तुनिष्ठ कवितेचे जुने वळण पूर्णपणे त्याज्य वाटलेले नाही.[३]

कवीचा कलावंत म्हणून होणारा विकास हा त्याच्या खोल आत्मपर अनुभूतीबरोबर त्याच्या व्यापक आणि वस्तुनिष्ठ अनुभवग्रहणाच्या आणि चित्रणाच्या शक्तीवरही अवलंबून असतो – हे केशवसुतांनी ओळखले होते. केशवसुतांनी आपली दीर्घ कविता कोणत्या प्रकारची लिहिली असती हे खात्रीपूर्वक सांगणे कठीण आहे. संस्कृतातील अव्वल विदग्ध महाकाव्ये पूर्णपणे त्यांच्या वाचनात आली होती की नाही; तसेच इंग्रजी दीर्घकविताही भरपूर प्रमाणात त्यांना अभ्यासण्यास मिळाली की नाही, याची पुरेशी कल्पना नाही.

तसेच  केशवसुत स्फुटकवितेपेक्षा दीर्घ कविता लिहिण्याचे कोणाला सुचवीत आहेत आणि 'अशा प्रतिभावतांच्याच हातून नाव घेण्याजोगी मराठी दीर्घ कविता होऊ शकेल' असे त्यांनी कोणाला उद्देशून म्हटले आहे, तेही समजलेले नाही. हे समजले असते तर कदाचित याबाबत अधिक निश्चयाने काही तर्क करता आला असता. पण आहे ह्या परिस्थितीतही अर्वाचीन मराठी कवितेच्या जनकाला, आत्मपर निर्भरशील भाववृत्तीने लिहिणाऱ्या अर्वाचीन आद्य कवीला, वस्तुनिष्ठ दीर्घ कवितेची कलावंताच्या व्यक्तित्वविकासाच्या दृष्टीने मातब्बरी वाटते; आत्मकोषापेक्षा विशाल आणि वैविध्यपूर्ण अनंत अंबराची ओढ लागते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

* * *

मूळ लेख : 'केशवसुतांची दीर्घकविता'

'वसंत' - एप्रिल, १९६६

---

[३] परिशिष्ट २ पाहावे.

## ८. केशवसुत-संप्रदाय : एक वदतोव्याघात !

केशवसुतांनी मराठी कवितेला जुन्या सहा-सात शतकांच्या चाकोरीतून, बंधनातून मुक्त केले.तिच्या विहाराला सारे विश्व खुले झाले. कवितेच्या स्वातंत्र्याआड ते कधीही आले नाहीत. त्यांनी नवी चाकोरी पाडण्याचा यत्न केला नाही; नवा साचा घडविला नाही; स्वतःही आवर्तात ते कधी फिरत राहिले नाहीत. त्यांची कविता स्थूलतेकडून सूक्ष्मतेकडे, स्पष्टतेकडून गूढतेकडे, लौकिकातून अलौकिकाकडे हळूहळू पण निश्चयाने वाटचाल करताना आढळते. अर्वाचीन मराठी कवितेला केशवसुतांनी नवा रस्ता घालून दिला आहे, असे म्हणण्यापेक्षा तिला तिचा प्रकृतिधर्म काय, ह्याची जाणीव करून दिली; प्रतीती घडविली.

केशवसुतांनी स्वतः नवा साचा निर्माण केला नाही, हे खरे असले तरी, हा साचा घडविण्याचा प्रयत्न त्यांच्या पुढिलांनी, त्यांच्या चेल्यांनी मात्र केला. 'केशवसुत' आणि 'तुतारी' यांचे समीकरण त्यांनी घातले; काळानेही त्याला मदत केली आणि 'तुतारी मंडळा'ची स्थापना झाली. हे मंडळ अत्यल्पकाळ टिकले खरे, पण 'केशवसुतां'च्या कवितेवर त्याने 'सामाजिक क्रांतीच्या संदेशा'च्या हेतूची एक मोठी, ढोबळ, भडक मुद्रा मारण्याचे काम कायमचे करून ठेवले ! केशवसुतांना त्यांच्या चेल्यांनी आणि आप्तेष्टांनी जी काव्यश्रद्धांजली वाहिली, तीमध्ये प्राधान्याने केशवसुतांच्या 'तुतारी'चाच गौरवोल्लेख झालेला दिसतो. शिवाय गोविंदाग्रज, रेव्ह. टिळक, यांसारख्या मान्यवर कवींनी 'तुतारी'च्या धर्तीवर 'दसरा', 'रणशिंग' यांसारख्या कविता लिहिल्या, पुढे तर 'केशवसुत-संप्रदाय' हा शब्द काव्यरसिकांमध्ये रूढ झाला आणि आधुनिक 'कविपंचक' म्हणून रेव्ह. टिळक, केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी आणि विनायक यांना समानधर्मी मानून त्यांचा अभ्यास करण्याचा पायंडा पडला. मराठी काव्यप्रेमी लोकांचे कमालीचे आवडते कवी 'गोविंदाग्रज' यांनी तर आपले केशवसुतांचे 'सच्चे चेले'पण अनेकवार आपल्या काव्यातून उद्घोषित केले आणि त्यांच्या 'तुतारी'ची महती पुकारली —

**चला निघू द्या असली स्वारी;**
**जुनाट पोकळ नगारखाना**
**उंटावरला कुणी शहाणा**
**वाजविता त्या आधी हाणा**
**घ्या कृष्णाची करी 'तुतारी' ॥**

**रूढीच्या किल्ल्यावर स्वारी,**
**'आगरकरां'ची झडवा नौबत ।**
**'भागवतां'ची धराच हिंमत ।**
**'केशवचंद्रा'चे घ्या चिलखत ।**
**फुंका 'कृष्णा'चीच 'तुतारी' ॥**

गोविंदाग्रजांच्या या ललकारीचा ध्वनी फार काळ मराठी मनात दुमदुमत राहिलेला दिसून येतो ! कवी रेंदाळकर तर भीत भीत केशवसुतांच्या गायनाची साथ करण्यास बसले.

पण 'तुतारी' म्हणजेच केशवसुतांच्या कवितेचा आत्मा असे नाही. केशवसुतांची कविता संख्येने विपुल नसली तरी तिच्यातील भावनानुभूतींची विविधता रमणीय आहे. तीत प्रतिभामाहात्म्य, नव्या सामाजिक जाणिवा, गूढानुभव, कुटुंबप्रेम, प्रणयभावना, निसर्गदर्शन आहे; तर काही कथाकविता, काही व्यक्तिपर, काही उपदेशपर, काही पारंपरिक, अशी रचनाही आहे. यातील प्रतिभामहात्म्य, नव्या सामाजिक जाणिवा आणि गूढानुभव हीच केशवसुतांच्या कवितेची अनन्यसाधारण अशी वैशिष्ट्ये आहेत; तीच त्यांची बलस्थाने आहेत. या अनुभूतींबाबत त्यांचे तादात्म्य इतके झटकन आणि सर्वस्वाने झालेले दिसते की, त्यांच्या शब्दांना अनिवार वेग येतो, धार येते; प्रामुख्याने आणि तीव्रतेने याच भावोत्कट कवितांचा प्रभाव पुढिलांच्यावर पडला आणि त्यांनी त्यांचे अनुकरण करून पाहिले; पण 'समानधर्मित्वच मुळात नसल्याने पुढिलांच्या या जातीच्या कविता अनुकरणात्मक व क्षीण पडसाद उमटविणाऱ्या वाटत राहिल्या; कोठे कोठे तर त्या कृत्रिम व खोटारड्याही असल्याचे प्रत्ययास येत राहिले. सामाजिक जाणिवांच्या संदर्भात 'दसरा' (गोविंदाग्रज), 'रणशिंग' (रेव्ह. टिळक) यांचा उल्लेख झालाच आहे.'फुटकी तपेली'मध्ये आत्मानुभव मुळातच

नसल्याने तो गळून जाण्याचाही प्रश्न उद्‌भवत नाही; ‘कविवेडा’ची गीतेही करण्याची टूम पुढे पडत गेली. किंबहुना या तिन्हींवरही कविता केल्याविना कवीला आपण कवी आहोत, असे मनातून वाटेचना ! आणि अनुभवावाचून शब्दांचे घुंगुरवाळे वाजविण्याची जुनी-पुराणी प्रथा याबाबत सुरू झाली-केशवसुत म्हणजे तुतारी’, ‘आम्ही कोण’, ‘हरपले श्रेय’, ‘झपूर्झा’, ‘नवा शिपाई’, ‘स्फूर्ती’, ‘सतारीचे बोल’, ‘पुष्पाप्रत’, ‘भृंग’, ‘गोफण’, ‘मूर्तिभंजन’ असे काहीसे केवळ ‘तुतारी’पेक्षा बरेच अधिक असे आहे, हे पुढे पटत गेले. पण या कवितांतील अनुभूतींचा जिवंतपणा, तीव्रता आणि प्रत्यक्षता पुढिलांच्या ठायी नसल्याने त्यांच्या पदरी याबाबत अपयशच आले.

आपला स्वतःचा संप्रदाय स्थापण्याची कल्पनाही केशवसुतांनी मनात आणली नसावी. संप्रदाय तर जाऊच द्या : साधे कवि-सम्मेलन घ्या. केशवसुत कवि-सम्मेलनाबाबत काय मत देतात ते अवश्य पाहण्यासारखे आहे.

‘‘As to the idea of annual gathering of poets - Practical men meet periodically for practical purposes. Poets as dreamers should sit aloof listening to the ethereal voice of silence and trying to render it into their uncouth vernaculars, whenever the Muse favours them. Some two or three congenial spirits may at times come together to sip the rainbow drops of the nector ! But more would certainly spoil its flavour-That is my idea !’’

केशवसुत, रेव्ह. टिळक, गोविंदाग्रज, बालकवी, रेंदाळकर इत्यादी कवींकडे संप्रदाय-सदस्य म्हणून पाहण्यापेक्षा Congenial Spirits म्हणून पाहण्यात अधिक स्वारस्य आहे. केशवसुतांनी आपल्या स्वभावधर्मानुसार तर खरेच, पण सहेतुक प्रयत्नांनी जे केले त्यामुळे ह्या कविप्रभृतींना नवे ‘Congenial’ जगच जणू शुद्ध रूपात लाभले. ‘केशवसुत हे युगधर्माचे प्रवक्ते, युगकर्ते होते की नाही’, हा वाद आता मिटावा.

‘रोमँटिक संप्रदाय’ हा शब्दप्रयोग, वस्तुतः वदतोव्याघाताचे सुंदर उदाहरण ठरेल. केशवसुतांचे क्रांतिकार्याचे माहात्म्य ओळखून, पण ‘केशवसुत संप्रदाय’ अशी झापड दृष्टीला न लावता केशवसुतांच्या समकालीनांच्या आणि त्यांच्या ‘चेल्यांच्या’(?) कवितांकडे पाहणे इष्ट ठरेल.

केशवसुतांच्या कवितेनंतर जी मराठी कविता निर्माण झाली, तीमध्ये रोमँटिक गुणाचा आणि आत्मपरतेचा-म्हणजे जिवंत भावकवितेच्या प्राणभूत तत्त्वाचा आढळ अटळपणे झालेला दिसतो.दत्त, रेव्ह. टिळक, गोविंदाग्रज, बालकवी, रेंदाळकर इत्यादी कवींमध्ये जे Romantic Spirit सळसळते, ते पृथकत्वाने आस्वाद्य आहे. केशवसुतांमुळे प्रवर्तित झालेल्या युगधर्माची विलक्षणता हीच आहे, की हे सर्व कवी एकाच धर्माचे—spirit चे असून, त्यांतील प्रत्येक कवीची कविता आपली पृथगात्मताही (Identity) सहजपणे सांभाळून आहे. सदैव नित्यनूतन अनुभव घेण्याची, त्या अनुभवाकडे निर्मळ नेत्रांनी पाहण्याची, त्या अनुभवामध्ये बालांप्रमाणे रमून जाण्याची, तो अनुभव उत्कटतेने अनावरपणे सांगण्याची, त्या आत्माविष्कारातच कृतार्थतेचा आनंद भोगण्याची नवी शक्ती केशवसुतांनी प्रकट करून दाखविली.

केशवसुतांच्या नंतर मराठी कविता शास्त्री-पंडितांच्या काव्यानुकरणातून सुटली, ती कायमची सुटली. लेंभे-मोगरे-लोंढे-आदी अर्वाचीन कवींच्या कवितांचीही चलती संपली; नव्हे, त्यांचे कविता-यंत्रच इतिहासजमा झाले.मराठी कवितेला नवनवोन्मेषशाली प्रज्ञेचे कवी लाभले; नवी अनुभवसृष्टी प्राप्त झाली; नवा रूपशृंगार लाभला.मराठी कवितेला अविषय क्षेत्र राहिले नाही.मराठी कवितेच्या विकासाला अमर्याद विश्व उपस्थित झाले; या विश्वाकडे पाहणाऱ्या प्रत्येकाच्या दृष्टीला स्वतंत्र महत्त्व प्राप्त झाले.ओघानेच त्याच्या आविष्कार-तंत्रालाही स्वतंत्र मूल्य लाभले.मराठी कविता ३०-३५ वर्षांत, एक-दीड पिढीमध्ये एकदम बहरली. सहा शतके ज्या काही आवर्तात ती परिभ्रमत होती, त्यातून बाहेर पडली; आपल्या स्वतःच्या घरी आली. केशवसुतांनी मराठी भावकवितेला माहेरी आणले 'कलावंताची आत्मपरता' हे ते माहेर ! या माहेरी मराठी कविता किती विश्वासाने, मोकळेपणाने, सहजतेने हसली, खेळली, वाढली, मोठी झाली, ते पाहणे मनोरंजक आहे.

कवी दत्त हे एक सुंदर, स्वतंत्र स्फुरण होते.'सशरीर आणि सजीव प्रणयिनीवर जितके उत्कट प्रेम करावे तितके उत्कट प्रेम कवी दत्तांनी कवितेवर केले', ह्यात शंका नाही. संस्कृत आणि इंग्रजी काव्य यांच्या सुंदर संगमातून त्यांची रसिकता आणि भाषाशैली सिद्ध झाली असल्याने त्यांच्या कवितेतील प्रणयभावचित्रणाला खास स्वतःचा असा वेगळा रंग आला आहे. मराठी लावणीचा ढंगही त्यात मध्येच कोठे उमटून जातो.त्यांच्या गीतातील ईश्वरप्रेम, महाराष्ट्राभिमान आणि भारतभक्ती अगदी अस्सल असल्याचा प्रत्यय येतो. निसर्गानुभूती आणि तिची आविष्कारपद्धती याबाबत दत्त हे बालकवींच्या आधीचे 'बालकवी' वाटतात;

तर प्रणयभावना आणि तिचे चित्रण याबाबत ते गोविंदाग्रजांच्या आधीचे, म्हणूनच 'पहिले प्रेमाचे शाहीर' ठरतात. निसर्ग आणि प्रणय यांच्या अनुभूतींचे चित्रण करणारी केशवसुतोत्तर मराठी कविता ही केशवसुतांच्या कवितेपेक्षा दत्तांच्या कवितेशी अधिक जवळीक दाखविते, हे लक्षात घेण्यासारखे आहे. कवी दत्त हे वस्तुनिष्ठ पातळीवरही समरसतेने कविता करीत. त्यांची बालगीते तर आजही ताजी, टवटवीत वाटतात. मराठी काव्यानुभवसृष्टीत खास दत्तांची म्हणून कितीतरी नवनवी फुले फुलली आहेत.

रेव्ह. टिळकांनी रणशिंग फुंकिले, हे खरे ! पण स्वप्राणाने फुंकिलेली त्यांची कविता ही बंडखोरीची कविता नाही; ती प्रेमधर्मी कविता आहे. रेव्ह. टिळकांना घराचे, माणसाचे, पशु-पक्ष्यांचे, निसर्गाचे अलोट प्रेम आहे.त्यांच्या प्रेमानुभवामागे आस्तिक्यबुद्धी, ईश्वरनिष्ठा अचलपणे उभी आहे. ही निष्ठा अतिव्यापक आणि मूलगामी अर्थाने आध्यात्मिकच आहे. रेव्ह. टिळक हे प्रेमवादी, प्रेमपूजक आणि प्रेममार्गी कवी आहेत. भूतदयावादी, सेवाधर्मी, सद्धर्मोपदेशक रेव्ह. टिळकांना गद्य जगाला काडीवजा लेखता येणेच शक्य नव्हते; ते त्यांच्या हृदयधर्माशी विसंगत होते. त्यांच्यातला सुधारक 'मनात' उग्र आणि खंबीर असला तरी 'जनात' सौम्य आणि सेवाधर्मीच होता. त्यांच्यातला कवी या प्रकृतीशी इमान राखून होता. रेव्ह. टिळकांच्या पुष्कळ कवितांमध्ये अवाङ्‌मयीन हेतूंचा आणि प्रयोजनांचा संकर झालेला आहे, हे खरे; पण त्याविना त्यांची जी इतर काही कविता आहे ती आत्मपर, सौंदर्यवादी वृत्तीची, उच्च प्रतीची भावकविता म्हणूनच मनात भरते. रेव्ह. टिळकांना केशवसुतांच्या 'तुतारी' ऐवजी 'झपूर्झा' या कवितेचेच केशवसुतांच्या निधनोत्तर स्मरण व्हावे, हेही या संदर्भात विशेषार्थप्रद ठरेल ! माणसांचे अपरंपार प्रेम असणारे रेव्ह. टिळक हे एक तत्कालीन काही कवींचे प्रेरणाकेंद्र होते, हे विसरून चालणार नाही.

गोविंदाग्रजांची कल्पनेची कुबेरशाही आणि शब्दांची आतषबाजी नेत्रांना दिपविणारी आणि कानांना सुखविणारी असली तरी त्यात त्यांचे खरे काव्य नाही.गोविंदाग्रजांची प्रतिभा निराश प्रेमाचे आणि त्या प्रेमाच्या जातीचे चित्रण करताना स्वभावनिष्ठ होते. प्रेमाचे आणि प्रेमासाठी मरणाचे वेड ज्या कवितेला लागले आहे, ती कविता गोविंदाग्रजांची म्हणून निवडून काढावी ! 'दीप-पतंग प्रीती' अर्वाचीन मराठी कवितेत गोविंदाग्रजांनीच अमर केली; आणि त्याचबरोबर वास्तव जीवनातील भयानक, काही बीभत्स, लज्जास्पद, नकली म्हणून जे आहे त्याचेही तसेच भयाण-भीषण चित्र काढताना गोविंदाग्रजांच्या प्रतिभेला दिक्कत वाटली नाही. उपहास, उपरोध आणि विनोद यांचे एक नवे शक्तींद्रिय मराठी कवितेला त्यांनी मिळवून

दिले. हे आजच्या संदर्भात विशेष लक्षणीय आहे. आणि त्याहूनही हे सारे काही An April Fool's Work म्हणून ब्रह्माग्नीत झुगारून देण्याची कलंदरी गोविंदाग्रजांच्या ठायी होती, हे अधिक विशेष! तल्लख बुद्धीने आणि जिव्हाग्री बसलेल्या सरस्वतीने जगाला हसत आणि हसवीत, पण आतल्या आत आपल्या भंगलेल्या मनाचे अश्रू गिळीत, 'प्रेम' आणि 'मरण' यांच्या मधल्या रम्य-भीषण मार्गावर उलट-सुलट पावले टाकणाऱ्या एका Tragic Heroची हृदयगीते म्हणजे 'वाग्वैजयंती' होय!

आणि बालकवी? निसर्गातून मानवी भावनांचा अनुभव घेत जाणारे, निसर्गाचे जणू मूलच होऊन गेलेले एक वेगळे कविरूप! त्यांच्या 'अरुण', 'संध्यारजनी', 'फुलराणी' या निसर्ग-कविता म्हणजे खऱ्याखुऱ्या प्रेमकविताच, प्रेम-कथाच आहेत; आणि या प्रेमरसात पार्थिवतेचा लवलेशही नाही; आणि त्याला मृत्यूचा अंगुलीस्पर्शही घडणार नाही. बालकवी अशा अपार्थिव स्वर्गीय प्रेमाचे भाट आहेत. प्रौढत्वाची धास्ती घेतलेला हा बालकवी या जगातला खरा रहिवासी वाटत नाही/तो येथे परका वाटू लागतो; या जगाच्या स्वार्थाच्या बाजारात त्यांचे गाणे कोमेजले; वाढत्या वयाबरोबरची त्यांची कविता दुःखाने करपून गेली आहे; उदासीनता अंतर्बाह्य त्यांना व्यापून टाकते! हर्षातिरेकाने नाचणाऱ्या अणि दुःखावेगाने ऊर फाटणाऱ्या बालकवींच्या कवितेचे 'हर्ष' आणि 'शोक' हेच दोन स्थायीभाव आहेत. बालकवी खिन्न, उदास, अगतिक आणि मृत्यूगामी बनतात ते, 'विमुक्त चैतन्याला' जखडून टाकणाऱ्या देहाच्या 'जडते'मुळे! ह्या जडतेच्या शापाने होरपळलेला हा बालकवी 'पारव्या'च्या रूपाने त्यांच्या कवितेत अमर झाला आहे. बालकवींची समग्र कविता हातावेगळी करताना मनश्चक्षूंपुढे स्थिरावतो फक्त 'तो' पारवा-उद्ध्वस्त धर्मशाळेत 'कौलारी' बसून खिन्न, नीरस एकान्तगीत गाणारा! हरिततृणाच्या मखमलीच्या हिरव्या हिरव्या गार गालिचावरील 'फुलराणी' अखेरीअखेरीस धूसर, अस्पष्ट झालेली असते!

सावरकरांची कविता ही गोविंदाग्रज-बालकवी यांच्याच काळातली कविता आहे; पण ती स्फुरली आहे चाफेकरांच्या फाशीतून! भागवत संतांनी 'देवा'साठी जे केले, ते सावरकरांनी 'देशा'साठी केले! प्राचीन कविता ही 'देव'भक्ताची कविता होती; तर सावरकरांची कविता ही 'देश'भक्ताची कविता आहे.'भगवती स्वतंत्रतेचे स्तोत्र गाणारे मराठीतले पहिले कवी सावरकर हेच होत! त्यांची भावकविता 'स्वतंत्रतादेवी'ची केवळ सूक्त आहेत, असे नव्हे तर ती 'हौतात्म्याची गाथा'ही आहे. वयाच्या विशीबाविशीत हृदयात पेटलेल्या देशभक्तीच्या

अनावर ज्वाळांचे प्रत्यक्ष तांडव सावरकरांच्या कवितेत आहे; बाहेर पेटलेल्या राजकीय वणव्याचे प्रतिबिंब किंवा छायाचित्र तेथे नाही. 'सागरास', 'माझे मृत्युपत्र', 'सान्त्वन' इत्यादी कविता ह्या नुसत्या आत्मपर (Subjective) आहेत असे नाही तर त्या स्व-विषयकही (Personal) आहेत; पण 'आपल्यामाजी सारे भारतीय हौतात्म्य' पाहून त्या 'हौतात्म्याचा' गौरव करणाऱ्या ह्या कविता आहेत. ह्या मृत्युंजय-स्तोत्रातून सावरकर आत्मबल मिळवितात; सतीचे वाण हाती घेऊन मृत्यूचे रूप डोळ्यास डोळा देऊन पाहतात! सावरकरांच्या भावकवितेतून 'गीतारहस्य'च रसरूप होऊन अभिसरत आहे. 'आत्म्याचे अमरत्व' आणि 'निष्कामकर्मयोगित्व' मराठी भावकवितांच्या रूपाने साकार झाले ते सावरकरांच्याच कवितेत ! सावरकरांची भावकविता म्हणजे स्वदेशस्वातंत्र्यापासून ते मानवातल्या 'मी'च्या मुक्तीपर्यंतची स्तोत्रे गाणारी कविता आहे! 'हुतात्मा' हाच 'मुक्तात्मा' म्हणून पाहणारी ही अगदी वेगळ्या अनभूतीची स्वतंत्र मराठी कविता आहे!

मराठी कवींची आस्तिक्यबुद्धी सुप्रसिद्धच आहे; अज्ञेयवादी केशवसुत हा अपवादच खरोखरी; यामुळे कवी तांबे, कवी बी यांच्या कवितेतील गूढवाद हा केशवसुतांच्या गूढवादाहून तत्त्वतःच वेगळा असा उठून दिसतो. 'This world is an expression of Joy itself' अशी अचल निष्ठा असणारे कवी तांबे प्रेमानुभवातून गूढवादाची अभिव्यक्ती करतात. ते रवींद्रनाथ टागोरांच्या प्रमाणे Love-mystic, प्रेममार्गी गूढवादी-आहेत; तर केशवसुत हे निसर्गाच्या सेंद्रिय साक्षात्कारातून त्याच्या अतींद्रिय सौंदर्याचा वेध घेऊ पाहणारे Nature-mystic होत. 'हे जग त्या सच्चिदानंदाचाच मूर्त आविष्कार असल्याने येथे दुःखाला स्थानच नाही; ते परके आहे' हेच कवी तांबे यांचे मूळ तत्त्वज्ञान असल्याने त्यांची कविता मानवी जीवनाच्या हर्षशोकांकडे, यशापयशाकडे, किंवा गुण-दोषांकडे पाहते, ती एक विशुद्ध क्रीडा म्हणूनच, आणि त्यामुळे तांबे यांची कविता नितांत रसमयही झाल्याचे दिसून येते! त्यांच्या 'महाप्रस्थाना'तून आकांत नाही, वारुणी किंवा उर्वशी स्तोत्रात विकृत संकोच नाही; विश्वात चाललेल्या महान सूत्रधाराचे लीलानाट्य पाहणाऱ्या एका रसिक प्रेक्षकाचे रम्योद्‌गार म्हणजे भास्कररावांची कविता होय!

दत्त, रेव्ह. टिळक, गोविंदाग्रज, बालकवी, तांबे, सावरकर हे केशवसुतांच्या इतकेच स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे, स्वतंत्र जीवनदृष्टीचे, भिन्न अनुभवसृष्टीत विहरणारे असे कवी आहेत. आपल्या अनुभवाला प्रमाण मानून, त्यातून जीवनाचे सत्य आणि सौंदर्याचा शोध घेणारे आणि त्यांचा तितक्याच उत्कटपणे आणि इमानदारीने आविष्कार करण्यात हर्ष मानणारे,

हे कवी आहेत. ज्याचे त्याचे स्वतःचे बलस्थान आहे, आणि तीच त्याच्या पृथगात्मतेची खूण आहे. एकमेकांच्या संदर्भात यांना पाहावे; पण ज्याचे त्याचे आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन अगदी स्वतंत्रपणेच करावे, हे अधिक योग्य! केशवसुतांच्या सामाजिक, गूढवादी आणि काव्यगौरवपर कवितांच्या प्रकाशात आणि त्यांच्या संप्रदायाच्या (?) रंगीत भिंगातून यांच्याकडे पाहण्यात त्यांच्या कवितांचा खरा रंगही दिसणार नाही आणि अंतरंगही समजणार नाही!

केशवसुतांनी मराठी कवितेला कोणताच 'संप्रदाय' दिला नाही, तर त्यांनी जातिवंत कलावंत अंतर्यामी कसा स्वतंत्र असतो, जिवंत असतो, भावोत्कट असतो, केवळ स्ववश असतो हे परोपरीने सांगितले; आणि स्वतः ते जगून दाखविले, हेच खरे! आणखी एक विशेष म्हणजे केशवसुतांनी तर्कशुद्ध पद्धतीने, शास्त्रीय रूपाने काव्यविचार बांधून ठेवला नाही; उत्स्फूर्त काव्यमय उद्रेकातच त्यांनी कवी, काव्य आणि कला यासंबंधीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या; यामुळे त्या लवचिक, बह्वर्थसूचक आणि सदैव जिवंत राहणाऱ्या अशा ठरल्या; त्यांना गणिती घट्ट दृढ रूप आले नाही. त्यामुळे परंपरेचे वळण थोडेसे गिरवून होताच प्रत्येक कवी आपल्या प्रकृतिधर्मानुसार स्वतःची (Original) कविता गाऊ लागला! केवळ कालौघाला याचे श्रेय देता येणार नाही; ते प्राधान्याने केशवसुतांनी प्रवर्तित केलेल्या नवकाव्यदृष्टीला व स्वतः निर्मिलेल्या नवकाव्याला द्यावे लागेल! फार काय, विनायक आणि चंद्रशेखर यांसारख्या परलक्षी कवींनाही आत्मपरतेची गोडी वाटावी, यातच या नव्या दृष्टीचे व कवितेचे यश आहे. शिवाय 'कृष्णाकाठी कुंडल' (गोविंदाग्रज), 'निःश्वास' (बालकवी), 'कमळा' (बी) यांसारख्या ज्या काही वस्तुनिष्ठ कथा-कविता पुढे लिहिल्या गेल्या त्यांचे स्वरूप भावकवितेशी बरीच जवळीक साधणारे आहे.

केशवसुतांनी कवींना त्यांच्या स्वातंत्र्याची जाणीव करून दिली; ते स्वतः स्वतंत्र राहिले आणि दुसऱ्यासही त्यांनी स्वतंत्र राखले. कवी हा मुक्त मानव आहे; तो कोणाकडे पाहून काही बोलत नसतो; तो स्वतःकडे पाहून जे सांगायचे ते सांगत असतो. केशवसुतांनी कवींना आपल्या कवितेबरोबर मोकळे राहण्याची दृष्टी दिली.केशवसुतांनी कवींची अस्मिता जागी केली; त्यांचे परप्रकाशित्व घालविले; त्यांना स्वयंप्रकाशाचे वेड लावले.मराठी कवींना स्वानुभव चित्रित करण्याचे धैर्य आले; त्यांचा आत्मविश्वास वाढला.'कवी' या पदवीला विशेषार्थ प्राप्त झाला. 'कवी' ही जाती सामान्याहून वेगळी आहे, तिच्या आशा-आकांक्षा, ध्येये-स्वप्ने अगदी भिन्न आहेत. ह्याची जाणीव झाली, सृष्टीचे अर्थ वेगळे लागू

लागले; पक्ष्यांचे गायन, आकाशीचे रंग, गवताचे पाते किंवा झऱ्यांचे झुळझुळणे यांनाही नवे असीम सौंदर्य लाभले. कविप्रतिभेचे नवनवोन्मेष उदयास येऊ लागले. केशवसुतांनी मराठी कविदृष्टीची जीर्णता, नीरसता निपटून टाकली आणि प्रत्येक अनुभवाच्या सत्यदर्शनाने आणि सौंदर्यप्रतीतीने पुलकित होणाऱ्या वृत्तीचे, मनोधर्माचे उद्‌गान केले. केशवसुतांनी कलावंतांना खेळण्यासाठी हे सारे जग खुले करून दिले, आणि आपल्या पाणिस्पर्शात असणाऱ्या दिव्यतेची जाण त्यांना करून दिली. 'कवी' 'वाग्देवीसुत' या अभिधानाला त्यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली; आणि त्याचबरोबर ही 'प्रतिष्ठा' म्हणजे सुळावरची पोळी आहे, याचीही कल्पना देण्यास ते विसरले नाहीत; वाणी ही फार मोठी देवता आहे; तिच्या आराधनेसाठी फार जपावे लागते. स्वतः जळल्याशिवाय ती 'दिव्य ठिणगी' लाभत नाही. 'वृत्तदर्पणे कवी' आणि 'खरा कवी' यांतील भेदच केशवसुतांनी मूर्तिमंत प्रगट केला.खरा कवी प्रौढत्वी निजशैशव जपतो. (He retains the spirit of infancy even into the era of Mankind.) केशवसुतांनी जातिवंत कवीची अंतर्बाह्य मूर्ती सारखी तळपत, तेजाळत ठेवली आणि सत्कवीच्या सद्धर्माचे प्रवर्तन केले; ईश्वराने निर्माण केलेल्या जगाच्या हेतूची पूर्तता पाहणाऱ्या कवीच्या स्वप्नाचे सतत मानसचित्र रंगविले.

**देवांचे हेतु न पुरले,**
**अर्धेच कार्य जे उरले,**
**ते येथे करुनी गेले,**
**अवतरुनी फिरुनी शेले ।**
**केशवसुत गाउनी गेले ॥**

हे गोविंदाग्रज गाऊन गेले खरे; पण केशवसुतांचे स्वप्न अजून पुरे व्हायचेच आहे.

केशवसुत फार भव्य आणि विशाल स्वप्न हयातभर पाहात होते - त्यांना स्वप्ने पडत होती ती पृथ्वीची, स्व-भू-मीलनाची! साऱ्या पृथ्वीची वेदना त्यांच्या शब्दात उमटू पाहात होती; स्वर्ग केव्हा खाली लवेल आणि स्वर्गधरा यांचे चुंबन-मीलन होईल, याची उत्कंठा केशवसुतांइतकी कोणासच लागली नव्हती! आपले हे आदि-अंतीचे जीवनस्वप्न अखेर स्वप्नच ठरणार याची त्यांना खंत वाटत होती. अर्वाचीन मराठी कवितेच्या आद्य प्रवर्तकाच्या ह्या भव्योदात्त स्वप्नाची परिपूर्ती आणि कवींचा राजा ज्ञानेश्वर यांची पसायदान-प्राप्ती यात भेद असलाच तर तो हाच की, ज्ञानेश्वरांची भूमिका शुद्ध पारमार्थिक आहे आणि केशवसुतांची

प्राधान्याने आधिभौतिक आहे. पण केशवसुतांच्या आधिभौतिकतेचा पाया शांती, समता, विश्वबंधुत्व, सत्त्वगुणोत्कर्ष या दैवी गुणांनीच घातलेला आहे. केशवसुतांनी रूढ पारंपरिक देवसंस्था आणि भक्तिमार्ग यांचा ध्यास धरला नाही. पण माणूस देवगुणी व्हावा, ह्याचा केशवसुतांच्या कवितेला अनावर ध्यास आहे! हे विराट स्वप्न साकार होईतो केशवसुतांची कविता मुकी होणार नाही. तिचे तुतारीचे तीव्रोच्च स्वर, सतारीचे शांतिबोल आणि भृंगाचे आत्मलीन अक्षयगान प्रतिध्वनित होणार आणि ह्या 'वाग्देवीसुताचा जयजयकार' सुरांच्या कानी पडतच राहणार!

* * *

मूळ वाचन : 'केशवसुत-संप्रदाय-पुनर्विचार'

केळकर मंडळ, पुणे, ९ जून १९६६

## परिशिष्ट : १

### केशवसुतांचे भृंगप्रेम

भृंगाची रसज्ञवृत्ती आणि भृंग-कमलिनी-भावबंध यांची चित्रणे केशवसुतांच्या 'स्फुटश्लोका'तूनही (कविता क्र. ६१) पाहावयास मिळतात. ह्या श्लोकांचे स्वरूप-रचनादृष्ट्या आणि कल्पनादृष्ट्याही-संस्कृतातील सुभाषित-अन्योक्ती यांच्यासारखे आहे; त्यातील अर्थचमत्कृतीत सांकेतिकताही जाणवण्यासारखी आहे.

या तेरा स्फुट श्लोकांपैकी सहा श्लोकांतून भुंग्याचे मधुसेवनव्रत केशवसुतांनी गायिले आहे. पहिल्या दोन श्लोकांत भुंग्याची 'सत्य रसज्ञवृत्ती' प्रकट होते. 'भुंगा सुगंधित सुवर्णचम्पक धिक्कारतो, रसालमंजरी अणि पुष्पवाटिका अव्हेरितो, आणि करीरपुष्पाचाच आस्वाद घेतो; तेव्हा त्याला बाह्यसौंदर्यापेक्षा अंतरंग सौंदर्याचीच खरी गोडी आहे,' असे या दोन श्लोकांत स्पष्टीकरण केलेले आहे, तर भृंग-कमलिनी-सामरस्याचे चित्र हंसान्योक्तीच्या चमत्कृतिपूर्ण आणि विनोदी रूपाने आपणास दुसऱ्या एका श्लोकात पाहावयास मिळते. एका हंसाने आपल्या चोचीत एक विकसलेले कमळ धरले आहे आणि तो हंस मोठ्या डौलाने विहरतो आहे, पण त्याच्या हे ध्यानात येत नाही की तिकडे कमलिनीत भुंगा बसलेला आहे, आणि तो तिच्या अंतःकोषातील जीवनमधू चाखीत आहे. पुढील एका श्लोकात (स्फुट 12 मध्ये) कमलिनी ब्रह्मदेवास प्रार्थना करीत आहेकी —

**'रसज्ञांचा राजा मधुप दिसतो श्यामल जरी**
**मला आहे भारी प्रिय, धवल तो हंस न तरी;**
**बिसे भक्षी, पद्मे अरसिक सवे तो कुसमुडी,**
**विधे ! तद्हस्ती मत्कमल कधिही बा न दवडी.'**

'भृंगान्योक्ती'तून भृंगाची कमलिनीसंबंधीची आसक्ती, ओढ, दृग्गोचर होते.तर याउलट, एखादा भृंग, कमलिनीला सोडून (ती काय आपलीच आहे म्हणून), हत्तीच्या गंडस्थलातील दानोदकामागे लागला तर त्याची 'विषयी' म्हणून केशवसुतांनी अवगणना केली आहे.

केशवसुतांच्या स्फुट श्लोकांकडे गंभीरपणे पाहण्याचे कारण नाही.ती एक कल्पनाचमत्कृती म्हणूनच त्यांचा आस्वाद घेणे योग्य होय, यात शंका नाही; पण अशा कल्पनाचमत्कृतीतूनही केशवसुतांचे भृंगप्रेम दिसून येते. विविध रीतींनी भृंगस्तुती करताना ते कंटाळत नाहीत, हे ध्यानी घेतले पाहिजे.

हा 'भृंग-कमलिनी-भावबंध' केशवसुतांच्या आत्मपर कवितांत काही वैयक्तिक स्वरूपाच्या भावना व्यक्त करण्यासाठी अलंकाररूपाने योजिलेलाही आढळतो. कान्तेला भेटण्याची समुत्सुकता, विशेषतः तिची गोड ओष्ठवटिका सेविण्याचा आवेग अभिव्यक्त करतांना, 'भृंगाने अथवा जशी कमलिनी नाही कधी चोखिली... तैशी सेविन...' असे दृष्टान्तस्वरूपाचे ते लिहून जातात. ('नाही ज्यापरि...' क्र. १३) तसेच 'गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' (क्र. १५) या कवितेमध्ये मित्रवियोगाचे दुःख आणि त्याच्या पुनर्भेटीचे आशास्वप्न भृंग-कमलांच्याच उपमानाने त्यांनी साकार केले आहे.

**झाल्यानंतर अस्त तो कमल ते पाहूनिया लागले,**
**''उद्या मित्र करील तो निजकरे येऊनि याला खुले,''**
**ऐसे बोलुनि ज्यापरी भ्रमर तो जातो श्रमाने दुरी,**
**जातो बोलुनि या स्थलासहि तसे, मित्रा ! अता मी घरी.''**

दृढ भावबंधाला शब्दरूप देताना भृंग-कमलिनी यांच्यातील सामरस्य, एकजीवित्व केशवसुतांच्या मनश्चक्षूंपुढे येत राहते.कवी आणि त्याची कविता यांचे नाते या भृंग-कमलिनीसारखे असावे, असे केशवसुतांना वाटते.

* * *

## परिशिष्ट : 2

## केशवसुतांची जुन्या वळणाची कविता

केशवसुतांना जुनी कल्पनाचमत्कृतिप्रधान, अलंकारिक, श्लेषयुक्त, अन्योक्तिरूप, अक्षरगणवृत्तात्मक कविता अगदी अप्रिय होती असे नाही; ती त्यांना रचना येत नव्हती, असे तर नाहीच नाही. त्यासाठी त्यांना इरेस पडण्याचेही कारण नव्हते.एक क्रीडा म्हणून त्यांनी अशा प्रकारची स्फुट श्लोकरचना केलेली आहे. त्याचे स्वरूप संस्कृत काव्यातील 'मुक्तका'सारखे आहे.त्यात सूचक विनोद- गर्भ शृंगार आहे; तर यौवनातील रासविलासाचे कल्पनापूर्ण चित्रण आहे. उत्तान शृंगारचित्रांचेही सुंदर नमुने आहेत. संस्कृत काव्यातील भृंग-कमलिनी-संकेतांचा मुक्त वापर केलेला आहे. सुभाषिते, चाटूक्ती आणि त्याबरोबर अन्तर्लापिका स्वरूपाची कूट रचनाही आहे. आणि हे सारे आपल्या समकालीन कवींपैकी जुने वळण गिरविणाऱ्या लेंभे, मोगरे, लोंढे आदी कवींच्या कवितेहून अधिक कल्पनारम्य, चातुर्ययुक्त, सुश्लिष्ट आणि सुखद स्वरूपात अवतरलेले आहे. जुन्या वळणाची कविता जरी केशवसुत करीत राहिले असते तरी तीमध्ये ते आपल्या समकालीन जुन्या वळणाच्या कवींपेक्षा उच्च प्रतीचे ठरले असते.

**ऐन्यामध्ये महाली निरखित असता रूपशृंगार बाला,**
**आला मागूनि भर्ता, पुढति बघुनिया बिम्बयोगे तयाला,**
**बिम्बाच्या बिम्बभावा विसरुनि सरली लाजुनी त्यास मागे,**
**कान्ते तो आयती ती कवळूनि हृदयी चुम्बिली गाढ वेगे !**

यातील शृंगार-विनोदाची जात ही अव्वल इंग्रजीतील मराठी कवितेच्यापेक्षा प्राचीन पंडित कवींच्या किंवा त्याहीपेक्षा संस्कृतातील स्फुट काव्याची आठवण करून देणारी आहे. फार काय, संस्कृत संकेताबाहेर जाऊन गुलाबपुष्प आणि कंटक यांवर आधारित एक

श्लोकरचनाही या जुन्या वळणात केशवसुतांनी करून ठेविली आहे.

केशवसुतांच्या ‘कचाप्रत देवयानी’, ‘राजा शांतनु’ यांसारख्या कथाकवितांचे वरवर स्वरूप हे जुन्या आख्यान कवितेसारखे असले तरी त्याचे अंतःस्वरूप हे भावकवितेशी अधिक जवळीक साधू पाहणारे आहे; हे मागे आलेच आहे. ‘मुळामुठेच्या तीरावर’, ‘आगबोटीच्या काठाशी समुद्राच्या शोभेकडे पाहत उभ्या असलेल्या एका तरुणीस’, ‘समृद्धी आणि प्रीती’, ‘प्रियेला सादर केलेली पुष्पमाला’ किंवा ‘कर्तव्य आणि प्रीती’ या कविता तर त्यांतील कथांगापेक्षा त्यांतील प्रेमभावचित्रणासाठी, नाविन्यदर्शनासाठी, आधुनिक भावप्रकटनासाठीच ध्यानात राहणाऱ्या आहेत. संवादमाध्यमही या कवितांतील आधुनिक तंत्र ठरू शकेल. केशवसुतांच्या स्फुट श्लोकरचनात्मक कवितांतील सकसपणा आणि दीर्घ कथारूप कवितांतील आधुनिकता ह्यांमुळे जुन्या वळणातीलही त्यांचे मोठेपण आणि वेगळेपण सुस्पष्ट होते.

‘विद्यार्थ्याप्रत’ आणि ‘उत्तेजनाचे दोन शब्द’ या कवितांतील बोधपरता किंवा उपदेशस्वरूप हे उसने वाटत नाही. सत्याचे अनुपम तेज, सच्छीलाचे अगणित मोल आणि ज्ञानाचे अमोघ सामर्थ्य या विद्यार्थ्याच्या ठायी असणाऱ्या महतीच्या बीजांचा गौरव केशवसुतांच्या इतर महत्त्वपूर्ण आत्मपर भावकवितांतूनही प्रबळतेने झालेला आहे. ह्या भावना स्वतः केशवसुतांच्याच आहेत; त्यांची सत्यनिष्ठा, ज्ञाननिष्ठा, सच्छीलनिष्ठा हे त्यांच्या नव्या शिपायाचेच हृदयधर्म आहेत. ‘उत्तेजनाचे दोन शब्द’ मधील अभिव्यक्तीचा जोर त्यांच्या भावनोद्रेकाची, त्यांच्या प्रामाणिकतेची ग्वाही देणारा आहे. रूढ उपदेश थंड मनाने पद्यरूप करण्याच्या निःसत्त्व व्यापारात केशवसुत कधीच पडले नाहीत.

‘सुमारे १२-१३ वर्षांच्या एका निजलेल्या मुलीस पाहून सुचलेले विचार’ आणि ‘रांगोळी घालताना पाहून’ या कविता दीर्घ आहेत. या कविता शार्दूलविक्रीडित अक्षरगणवृत्तात रचलेल्या आहेत. त्यांतील अनुभूती ह्या चर्मचक्षूंना घडलेल्या केवळ बाह्य ठोकळ दृक्-संवेदनात्मक नाहीत. पृथ्वीवर स्वर्गाचे रूप-रहस्य शोधण्याचे दिव्य वेड लागलेल्या मनश्चक्षूंनी जे पाहिले त्याचे तन्मयतेने रेखाटलेले भावचित्र म्हणजे या कविता होत. लौकिकातून अलौकिकतेची अनुभूती घडणाऱ्या आधुनिक कवीचे हे अंतरंगदर्शन आहे. या कविता पद्यरूपात गद्यविचार ग्रथित करणाऱ्या नाहीत, तर उलट उत्कट भावना अक्षरगणवृत्तात व्यक्त करू पाहणाऱ्या आहेत.

‘फुकट दवडलेला तास’, ‘दिवस आणि रात्र’, ‘दिवा आणि तारा’ यांसारख्या कविता

विचारकथन करणाऱ्याच आहेत; पण हा विचार रूपकाच्या आश्रयाने, कल्पनाचमत्कृतिपूर्णतेने मांडलेला आहे. फार काय, केशवसुतांनी आपली काव्यविषयक तत्त्वे प्रकट केली आहेत, ती एखादी घटना, प्रसंग अथवा चमत्कृतिपूर्ण अनुभूती कल्पून, तिच्याच रूपाने, अधिक चित्रमय स्वरूपात! काव्यविषयक तत्त्वज्ञान यामुळे जिवंत आणि लवचिक झाले आहे. सहज तुलनेसाठी म्हणून विनायक कोंडदेव ओक, विष्णु मोरेश्वर महाजनी किंवा मोरो गणेश लोंढे यांच्या कविता या संदर्भात पाहाव्यात. 'उद्योगाची त्वरा करा', 'मनुष्य आणि घड्याळ', 'मग पाहिजे तसा वाग', 'विचारशक्ती हाच देव' इत्यादी वि. कों. ओक यांच्या कविता; 'बालपण', 'सृष्टी', 'चंद्र', 'साध्वी नदी', 'धन्य नर', 'जीवितसार' इत्यादी महाजनींच्या कविता;... 'काम कर', 'मधमाशी', 'ओढा', 'आई', 'जन्माचे सार्थक', 'आयुष्य' इत्यादी लोंढे यांच्या कविता वाचल्या की केशवसुत या मंडळींच्याहून प्रकृतीने किती भिन्न होते, ते झटकन आणि परिणामकारक रीतीने मनावर ठसते. लोंढे, मोगरे, लेंभे, ओक आदींनी नवे लौकिक विषय घेतले, आणि त्यांच्या गद्यप्राय लौकिक तपशिलातच त्यांना उलगडून, पसरून दाखविले; उपदेशकाचा कोरडा, गंभीर, थंड आणि कंटाळवाणा काव्यशून्य सूर लावून ठेवला.

केशवसुतांनी काही व्यक्तींविषयीच्या आपल्या भावना काही कवितांतून व्यक्त केल्या आहेत. या कविता अक्षरगणवृत्तातल्या असून त्यांतील एका कवितेत तर अनेकदा वृत्तबदलही केलेला आहे. वा. ब. पटवर्धन (कवी वसंत), बळवंत अप्पाजी दाते आणि ''पण लक्षात कोण घेतो'च्या कर्त्यास'' या कवितांतून अभिनंदनाचा किंवा गौरवाचा केवळ उपचार पाळलेला नाही. दात्यांच्यावरील कविता प्रासंगिक असली तरी ती 'उत्स्फूर्त' आहे, आणि त्यात 'दाते' या व्यक्तीऐवजी त्याने व्यक्त केलेल्या भावनेसंबंधीचे उत्कटपणे आपली भावना मांडली गेली आहे. इतर दोन कवितांतूनही व्यक्तिविषयक माहिती भरण्याचा गद्य मामला आढळत नाही, तर त्यांच्या महनीय कृतीबद्दल वाटणारी गाढ हार्दिकता, यालाच खरे स्थान लाभले आहे. त्यांतून त्यांच्या प्रिय विषयासंबंधीच्या भावना उत्कटपणे आलेल्या आहेत.

* * *

□ □ □

केशवसुतांची 'सामाजिक कविता' ही पृथ्वीला स्वर्ग बनू न देणाऱ्या कृतघ्न, दुष्ट, स्वार्थी मानवावर चाल करून जाणारी, उद्दाम, आवेगी अशी 'क्रांती-कविता' आहे;

तर केशवसुतांची 'कविविषयक कविता' ही पृथ्वीला स्वर्गसौंदर्य प्राप्त करून देऊ शकणाऱ्या उदारमनस्क, उदारचरित, प्रज्ञाचक्षू, प्रतिभासंपन्न, आदर्शरूप कलावंतांचे माहात्म्य गाणारी अनिवार 'स्तोत्रगीते' आहेत;

आणि त्यांची 'गूढवादी कविता' म्हणजे मानवी मर्यादा सोसणाऱ्या पण अमर्याद होऊ बघणाऱ्या एका बद्ध-मुक्त जीवात्म्याची करुण-रम्य निश्वसिते आहेत.

या त्रिविधरूपातील केशवसुतांची कविता एकात्मतेने पाहण्यातच खरे स्वारस्य आहे.

□ □

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई